सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १४९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मोदी, पुतिन आणि शी जिनपिंग यांचे लक्षवेधी हस्तांदोलन; बदलत्या जागतिक राजकारणाचे संकेत

**नवी दिल्ली:** नवी दिल्लीत सुरू असलेल्या १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यातील एकत्रित छायाचित्र आणि हस्तांदोलन संपूर्ण जगात चर्चेचा विषय ठरले आहे. तिन्ही नेत्यांचे हातात हात घेतलेले हे छायाचित्र सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले असून, बदलत्या जागतिक राजकारणाच्या पार्श्वभूमीवर त्याला विशेष राजनैतिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

**ब्रिक्स परिषदेचे महत्त्व आणि विविध नेत्यांची उपस्थिती:**

भारताच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या शिखर परिषदेमध्ये व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान, जागतिक प्रशासनातील सुधारणा आणि 'ग्लोबल साउथ'चा (Global South) आवाज अधिक प्रभावीपणे मांडण्यावर भर दिला जात आहे. ११ सदस्यीय ब्रिक्स संघटनेमध्ये जगातील जवळपास निम्म्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व होते. पंतप्रधान मोदींनी 'एक्स'वर शेअर केलेल्या छायाचित्रांमध्ये पुतिन आणि शी जिनपिंग यांच्यासह इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेशकियान आणि इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्यासोबतचे क्षणही झळकले आहेत.



**मोदी-पुतिन द्विपक्षीय बैठक:**

शिखर परिषदेच्या पूर्वसंध्येला (११ सप्टेंबर रोजी) पंतप्रधान मोदी आणि व्लादिमीर पुतिन यांच्यात महत्त्वाची द्विपक्षीय बैठक पार पडली. यामध्ये राजकीय, आर्थिक, संरक्षण, ऊर्जा आणि अंतराळ या क्षेत्रांतील सहकार्याचा आढावा घेण्यात आला. दोन्ही देशांमधील व्यापार वाढवण्यासाठी २०३० पर्यंतच्या आर्थिक सहकार्य कार्यक्रमावर चर्चा झाली. तसेच, पुतिन यांनी पंतप्रधान मोदींना रशिया भेटीचे दिलेले आमंत्रण मोदींनी स्वीकारले आहे.

**शी जिनपिंग यांचा तब्बल ७ वर्षांनंतर भारत दौरा:**

चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग शनिवार, १२ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत दाखल झाले. २०२० मधील गलवान संघर्षानंतर त्यांचा हा पहिलाच भारत दौरा असल्याने याकडे विशेष लक्ष लागले आहे. ऑक्टोबर २०२४ मधील सैन्य माघारीच्या करारानंतर दोन्ही देशांच्या संबंधांत सुधारणा होत असून, थेट विमानसेवा आणि आर्थिक संबंधांमध्ये काहीशी हालचाल वाढली आहे. या भेटीत प्रत्यक्ष नियंत्रण रेषा (LAC), व्यापार आणि द्विपक्षीय विश्वास पुनर्स्थापित करण्याच्या मुद्द्यांवर चर्चा अपेक्षित आहे.

**जागतिक राजकारणावर पडणारे टप्प्याटप्प्याचे पडसाद:**

रशिया, भारत आणि चीन हे तीन देश मोठ्या जागतिक शक्तींचे प्रतिनिधित्व करतात. युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष आणि अमेरिका-चीन तणावाच्या पार्श्वभूमीवर, ब्रिक्सच्या मंचावर तीन नेत्यांचा हा एकत्रित क्षण बहुपक्षीय व्यासपीठावरील संवाद आणि समन्वयाची गरज अधोरेखित करणारा ठरला आहे. मात्र, याला कोणतीही औपचारिक नवीन त्रिपक्षीय आघाडी न म्हणता, अस्थिर जागतिक वातावरणात बहुध्रुवीय व्यवस्थेचा आग्रह धरणारे एक महत्त्वपूर्ण प्रतीक मानले जात आहे.

## महाबोधी महाविहारमुक्तीसाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहांना निवेदन

**नवी दिल्ली:** बुद्धगयेतील ऐतिहासिक महाबोधी महाविहार पूर्णपणे बौद्ध धर्माच्या ताब्यात असावे आणि त्याचे सर्व विश्वस्त व चेअरमन बौद्धच असावेत, या प्रमुख मागणीसाठी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. रामदास आठवले यांच्या नेतृत्वात बौद्ध भिक्षू संघाच्या एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली.

नवी दिल्लीतील ६-ए, कृष्णा मेनन मार्ग येथील निवासस्थानी झालेल्या या बैठकीत, महाबोधी महाविहाराच्या व्यवस्थापनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

**कायदेशीर दुरुस्तीची मागणी:** बौद्ध धम्माचे सर्वोच्च श्रद्धास्थान असलेल्या महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बौद्धांकडेच असावे, यासाठी बिहार विधानसभेच्या १९४९ च्या 'महाबोधी विहार टेम्पल ॲक्ट'मध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्याची मागणी शिष्टमंडळाने केली.



**शिष्टमंडळातील उपस्थिती:** या शिष्टमंडळात पूज्य भंते करुणानंद महाथेरो, भंते डॉ. राहुल बोधी महाथेरो, भंते थेरो ज्योती आणि भंते आनंद यांसह अनेक मान्यवर भिक्षू उपस्थित होते.

**पंतप्रधानांच्या निर्देशानुसार भेट:** यापूर्वी रामदास आठवले यांनी या महत्त्वपूर्ण विषयाबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही भेट घेतली होती. पंतप्रधानांच्या सूचनेनुसारच आज या शिष्टमंडळाने अमित शहा यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात दिल्यास देशभरातील बौद्ध बांधवांमध्ये केंद्र सरकारबाबत अतिशय सकारात्मक संदेश जाईल, असे या वेळी आठवले यांनी स्पष्ट केले.

**सकारात्मक प्रतिसादाचे आश्वासन:** आठवले यांनी मांडलेली भूमिका आणि महाबोधी महाविहाराच्या इतिहासाबाबतची सविस्तर माहिती अमित शहा यांनी अत्यंत आस्थेने ऐकून घेतली. या संपूर्ण प्रकरणाची सखोल माहिती घेऊन आणि अभ्यास करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन या वेळी अमित शहा यांनी शिष्टमंडळाला दिले.

## ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान मोदी आणि अबू धाबीच्या युवराजांची महत्त्वपूर्ण भेट; भारत-यूएई संबंधांवर भर

**नवी दिल्ली:** १८ व्या ब्रिक्स परिषदेच्या निमित्ताने १२ सप्टेंबर २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अबू धाबीचे युवराज शेख खालिद बिन मोहम्मद यांची भेट घेतली. या बैठकीत दोन्ही नेत्यांनी भारत आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) मधील 'सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी'च्या महत्त्वावर पुन्हा एकदा भर दिला. राजनीतिक, सांस्कृतिक, व्यापारी, ऊर्जा आणि नागरिकांमधील परस्पर संबंधांवर ही भागीदारी आधारलेली आहे. यावर्षी जानेवारीमध्ये यूएईचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नहयान यांचा भारत दौरा आणि मे महिन्यात पंतप्रधान मोदींचा यूएई दौरा या दोन यशस्वी भेटींचे त्यांनी यावेळी स्मरण केले.



**ब्रिक्स सहकार्य आणि गुंतवणूक:**

भारताच्या ब्रिक्स अध्यक्षतेखाली यूएईने घेतलेल्या सक्रिय व सकारात्मक सहभागाबद्दल पंतप्रधानांनी प्रशंसा केली. ब्रिक्स व्यासपीठावर झालेल्या प्रगतीचे स्वागत करत, सामायिक हितसंबंधांसाठी भविष्यातही एकत्रित काम करण्याची सहमती दोन्ही नेत्यांनी दर्शवली. याशिवाय, यूएईच्या 'इंटरनॅशनल होल्डिंग कंपनी'तर्फे ओडिशामध्ये ११.५ अब्ज अमेरिकन डॉलरच्या एकात्मिक ग्रीनफिल्ड ॲल्युमिनियम प्रकल्पाच्या घोषणेचे नेत्यांनी स्वागत केले. हा भारतातील ॲल्युमिनियम क्षेत्रातील आतापर्यंतचा सर्वात मोठा गुंतवणूक प्रकल्प असून, यामुळे ओडिशा जागतिक स्तरावर ॲल्युमिनियम निर्मितीचे मुख्य केंद्र म्हणून उदयास येईल.

**धोरणात्मक क्षेत्रांमध्ये सहकार्य:**

भारत-यूएई भागीदारी परस्पर फायद्यासाठी दृढ करण्यात यूएईची नवी 'सोव्हरेन इन्व्हेस्टमेंट फंड' संस्था 'एल इमाद' (L'Imad) अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावेल, यावर नेत्यांचे एकमत झाले. या बैठकीत संरक्षण, अवकाश तंत्रज्ञान, अणुऊर्जा, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांत सहकार्य वाढवण्याच्या संधींवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. या उच्चस्तरीय संवादामुळे भारत आणि यूएईमधील पिढ्यानपिढ्यांचे चिरंतन संबंध अधिक बळकट झाले आहेत.

## बनावट मृत्यू प्रमाणपत्र अन्...... कोटींचा फ्लॅट विकला; मुंबईत बायकोचा धक्कादायक कारनामा!

**मुंबई:** 'मढ्याच्या टाळूवरचं लोणी खाणं' ही म्हण आपण अनेकदा ऐकली असेल किंवा त्या म्हणीचा कोणाला बोलण्यासाठी सुद्धा केला असेल. पण मुंबईमध्ये ही म्हण एका महिलेने तिच्या रिअल लाईफमध्ये तंतोतंत वापरली आहे. जिवंत पतीला मृत दाखवून त्याचं खोटं मृत्यूचं प्रमाणपत्र दाखवून एका महिलेने १.११ कोटींचा फ्लॅट परस्पर विकल्याचा प्रकार मुंबईमध्ये घडला आहे. या घटनेमुळे अनेकांच्या पायाखालची जमीनच सरकली आहे. घडलेला प्रकार पोलिसांना समजताच महिलेला अटक केली असून तिच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

हा संपूर्ण प्रकार, मुंबईतल्या बोरिवली परिसरामध्ये घडलेला आहे. एका खासगी कार्यालयामध्ये नोकरीला असणाऱ्या रायन क्रास्टा नावाच्या व्यक्तीसोबत हा संपूर्ण प्रकार घडला आहे. रायनने २०१६ साली बोरिवलीतील एल.एम.रोडवरील 'राज व्हिला को. ऑपरेटिव्ह हौ. सो. लि'मध्ये ७३.८० लाखाला १ बीएचके फ्लॅट खरेदी केला होता. हा फ्लॅट रायन आणि त्याची पत्नी शालिनी डायना क्रास्टा ह्या दोघांच्याही एकत्रित नावावर होता. ह्या फ्लॅटसाठी रायन आणि शालिनीने ५६ लाखांचं होम लोन घेतलं होतं. दोघांनीही एकत्रित रूमचं लोन सुद्धा फेडलं. पण कालांतराने त्यांच्यामध्ये काही कारणामुळे कौटुंबिक वाद झाला आणि त्यामुळे ते दोघंही वेगळे राहू लागले. दरम्यान, मे २०२६ मध्ये हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले. रायनचा मित्र प्रसाद पाताडे याने त्याला, त्याचा बोरिवलीतला फ्लॅट एका खाजगी बँकेकडे गहाण ठेवण्यात आल्याची माहिती दिली. धर्मेश जगदीश तन्ना आणि त्यांची पत्नी धारा धर्मेश तन्ना यांना १.११ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करून घेतल्याचे त्यांना समजले. त्यानंतर रायन आणि त्याच्या आईने खाजगी बँकेशी संपर्क साधला असता, शालिनीने ११ एप्रिल २०२५ रोजी एका नोंदणीकृत दस्तऐवजाद्वारे तो फ्लॅट धर्मेश तन्ना यांना विकल्याची धक्कादायक माहिती समजली. शालिनीने रायनचं खोटं मृत्यू प्रमाणपत्र आणि इतरत्र खोटी कागदपत्रे तयार करून मालमत्ता विकली होती.

या संपूर्ण प्रकरणामुळे रायन आणि त्यांच्या आईची पायाखालची जमिनच सरकली. फ्लॅट विकण्यासाठी शालिनीने रायनचे मृत्यू प्रमाणपत्राव्यतिरिक्त, सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) ते सुद्धा बनावट होते. इतकंच नाही तर, शालिनीने रायनची कायदेशीर वारसदार असल्याचं खोटं प्रतिज्ञापत्र सुद्धा बनवून घेतलं होतं. रायनने सोसायटीचे अध्यक्ष गौतम पुरोहित, सचिव पूजा पाताडे आणि खजिनदार एस. पाटील यांच्याकडे सोसायटीच्या ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) ची चौकशी केली असता, अशी कोणतीही एनओसी दिली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिवाय, त्या एनओसीवर असलेल्या स्वाक्षऱ्या सुद्धा खोट्या असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. बनावट मृत्यू प्रमाणपत्र आणि ना हरकत प्रमाणपत्र (NOC) तयार करण्यासाठी शालिनीला कोणी मदत केली?

## मध्य पूर्व युद्ध रोखण्यासाठी ब्रिक्सने मध्यस्थी करावी; नवी दिल्लीतील परिषदेत शी जिनपिंग यांचे आवाहन

**नवी दिल्ली :** नवी दिल्लीत पार पडलेल्या १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेत बोलताना चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी मध्य पूर्वेतील युद्ध तात्काळ थांबवण्यासाठी ब्रिक्स देशांनी शांतता दूताची भूमिका बजावावी, असे आवाहन केले आहे. चिनी सरकारी वाहिनी 'सीसीटीव्ही'ने (CCTV) दिलेल्या माहितीनुसार, हा संघर्ष आंतरराष्ट्रीय शांततेसाठी घातक असून चीन यावर तोडगा काढण्यासाठी इतर ब्रिक्स सदस्यांसोबत काम करण्यास तयार आहे. याच परिषदेत त्यांनी पुढील (१९ व्या) ब्रिक्स शिखर परिषदेचे यजमानपद चीन भूषवणार असल्याचे जाहीर केले.

**मध्य पूर्वेतील तणावावर भाष्य**

पश्चिम आशियातील युद्धावर चिंता व्यक्त करताना जिनपिंग म्हणाले की, या संघर्षाची मोठी किंमत तिथल्या सर्वसामान्य जनतेला मोजावी लागत आहे. यामुळे जागतिक सुरक्षेला धोका निर्माण झाला असून ब्रिक्स देशांनी केवळ प्रेक्षक न राहता शांततेसाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. कोणत्याही




देशाच्या सार्वभौमत्वावर होणाऱ्या आक्रमणाचा ब्रिक्सने एकत्र येऊन विरोध केला पाहिजे, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

**अमेरिकेच्या टॅरिफ धोरणावर टीका आणि तंत्रज्ञानात सहकार्याचा प्रस्ताव**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या जाचक टॅरिफचा (आयात शुल्क) थेट उल्लेख न करता जिनपिंग यांनी जागतिक व्यापारातील या मनमानी धोरणांवर कडाडून टीका केली. मुक्त व्यापारात अडथळे आणणाऱ्या अशा धोरणांविरोधात ब्रिक्स देशांनी एकत्रितपणे उभे राहण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यासोबतच, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सर्व ब्रिक्स देशांनी एकत्र काम करावे, असा प्रस्ताव त्यांनी मांडला. AI च्या मदतीने सदस्य देशांमध्ये नव्या औद्योगिक क्रांतीला गती देता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**सात वर्षांनंतर शी जिनपिंग यांचा भारत दौरा :** महत्त्वाचे टप्पे

चिनी अध्यक्षांचा हा भारत दौरा दोन्ही देशांतील संबंधांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. ऑक्टोबर २०१९ ला महाबलीपुरम (चेन्नई) येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शी जिनपिंग यांची अनौपचारिक भेट झाली होती. जून २०२० ला गलवान खोऱ्यातील हिंसक चकमकीनंतर भारत आणि चीनमधील द्विपक्षीय संबंध कमालीचे ताणले गेले आणि सीमेवर तणाव वाढला. ऑक्टोबर २०२४ ला रशियातील कझान येथे आयोजित ब्रिक्स परिषदेत दोन्ही नेत्यांमध्ये सकारात्मक द्विपक्षीय चर्चा झाली. त्यानंतर ऑगस्ट २०२५ ला चीनमधील तियानजिन येथे पार पडलेल्या 'एससीओ' (SCO) परिषदेत पंतप्रधान मोदींनी शी जिनपिंग यांना २०२६ च्या ब्रिक्स परिषदेसाठी भारत दौऱ्याचे निमंत्रण दिले होते.

## 'नमो एक्स्प्रेस' आणि विशेष बसेसच्या माध्यमातून दीड हजारांहून अधिक भाविक कोकणाकडे रवाना

**मुंबई:** गणेशोत्सवानिमित्त मुंबईतील चाकरमान्यांना आपल्या गावच्या बाप्पाच्या दर्शनासाठी कोकणात जाता यावे, यासाठी लोढा फाउंडेशनच्या वतीने यंदाही विशेष 'नमो एक्स्प्रेस'ची व्यवस्था करण्यात आली आहे. शनिवारी सकाळी ११ वाजून ५ मिनिटांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) येथील फलाट क्रमांक १८ वरून ही विशेष ट्रेन कोकणाकडे रवाना झाली. मुंबई भाजप अध्यक्ष तथा आमदार अमित साटम यांच्या हस्ते या विशेष रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या ट्रेनमधून १५०० हून अधिक गणेशभक्तांनी सावंतवाडीपर्यंतचा प्रवास केला. सीएसएमटी स्थानकावर चाकरमान्यांनी मोठी गर्दी केली होती आणि हक्काचे आसन मिळाल्यानंतर 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.या उपक्रमाबाबत माहिती देताना मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले की, गणेशोत्सव हा प्रत्येक मराठी माणसाच्या भावविश्वाशी जोडलेला सण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी गणेशभक्तांसाठी विशेष रेल्वे आणि बससेवेची व्यवस्था करण्यात येते, जेणेकरून मुंबईत नोकरी-व्यवसायानिमित्त राहणाऱ्या चाकरमान्यांना आपल्या कुटुंबीयांसोबत गावी सण साजरा करता येईल.

## एससीआय पुनर्वसन मेळाव्यातून स्वावलंबनाची नवी दिशा

**सांगली, ता. ९ :** पाठीच्या कण्याला दुखापत झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन रुग्णालयातून घरी परतल्यानंतरही सुरू राहते. हे पुनर्वसन घर, समाज, कामाचे ठिकाण आणि दैनंदिन जीवनाशी जोडण्याच्या उद्देशाने असोसिएशन ऑफ पीपल विथ डिसॅबिलिटी (एपीडी) यांच्या वतीने दुसरा 'स्पायनल कॉर्ड इंज्युरी (एससीआय) पुनर्वसन मेळावा-२०२६' सांगलीत आयोजित करण्यात आला.



या तीन दिवसीय मेळाव्यात पाठीच्या कण्याला दुखापत झालेले जवळपास ९० व्यक्ती, त्यांचे कुटुंबीय, आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ, विद्यार्थी आणि पुनर्वसन तज्ज्ञ सहभागी झाले. आरोग्य तपासणी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, अनुकूलित क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम, अनुभवकथन, वैद्यकीय कार्यशाळा आणि ज्ञानाची देवाणघेवाण असे विविध उपक्रम घेण्यात आले.

'काळजीशी जोडणारे- स्वावलंबनाला प्रेरणा देणारे' या संकल्पनेतून आयोजित मेळाव्याने समाजआधारित पुनर्वसनाचे महत्त्व अधोरेखित केले. एपीडीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुकांतो ऐच यांनी पुनर्वसनाला केवळ वैद्यकीय उपचारांपुरते मर्यादित न ठेवता व्यक्तीचा आत्मविश्वास आणि स्वावलंबन वाढविण्यावर भर असल्याचे सांगितले.

बजाज फायनान्सच्या सीएसआर सहकार्याने आयोजित करण्यात आलेला हा एससीआय पुनर्वसन मेळावा भारती विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल, सांगली; भारती विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), स्कूल ऑफ फिजिओथेरपी; आणि सेंट जॉन्स नॅशनल अकॅडमी ऑफ हेल्थ सायन्सेस, बेंगळुरू यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला.

# ग्लोबल साउथने आता नियम पाळणारे नव्हे तर 'नियम बनवणारे' व्हावे! - ब्रिक्स शिखर परिषदेत पंतप्रधान मोदींचे आवाहन

**नवी मुंबई :** संयुक्त राष्ट्रांच्या (UN) सुरक्षा परिषदेत आता अजिबात विलंब न करता लवकरात लवकर सुधारणा केल्या पाहिजेत, असा ठाम आणि स्पष्ट संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. या सुधारणांसाठी होणाऱ्या चर्चेला एका ठराविक वेळेची मर्यादा असली पाहिजे आणि त्यातून ठोस परिणाम बाहेर आले पाहिजेत, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

नवी दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे आयोजित १८ व्या ब्रिक्स (BRICS) शिखर परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी पंतप्रधान मोदी बोलत होते. जागतिक व्यवस्थेवर भाष्य करताना ते म्हणाले की, "सुरक्षा परिषदेतील सुधारणांचा विषय आता पुढे ढकलणे शक्य नाही. मसुद्यावर आधारित वाटाघाटी एका ठराविक कालमर्यादेत पूर्ण झाल्या पाहिजेत." तसेच, 'ग्लोबल साउथ' म्हणजेच विकसनशील आणि गरीब देशांनी केवळ जगाचे नियम पाळणारे न राहता, आता स्वतः नियम बनवणारे (Rule-shapers) बनले पाहिजे. यासाठी ब्रिक्स संघटना महत्त्वाची भूमिका बजावू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विकसनशील देशांना सक्षम करण्यासाठी पंतप्रधान मोदींनी एक महत्त्वाचा प्रस्ताव मांडला. ते म्हणाले की, ब्रिक्स संघटनेच्या माध्यमातून ग्लोबल साउथच्या देशांमधील तरुण मुत्सद्दींना (Diplomats) आंतरराष्ट्रीय वाटाघाटींचे कौशल्य, कायदेशीर ज्ञान आणि व्यावहारिक प्रशिक्षण दिले जावे, जेणेकरून ते जागतिक स्तरावर आपल्या देशांचे प्रतिनिधित्व सक्षमपणे करू शकतील. योगायोगाने हा कार्यक्रम संयुक्त राष्ट्रांच्या 'दक्षिण-दक्षिण सहकार्य दिना'च्याच दिवशी पार पडला. याबद्दल आनंद व्यक्त करत मोदी म्हणाले की, विकसनशील देशांच्या हिताचे निर्णय अशा महत्त्वाच्या दिवशी घेतले जाणे अत्यंत अर्थपूर्ण आहे आणि या बदलांचे नेतृत्व करण्यासाठी भारत पूर्णपणे तयार आहे.

ब्रिक्सचा २०वा वर्धापन दिन

ब्रिक्स संघटनेच्या २० वर्षांच्या यशस्वी प्रवासाची तुलना पंतप्रधानांनी एका तरुणाच्या आयुष्याशी केली. "माणूस जेव्हा विसाव्या वर्षात पदार्पण करतो, तेव्हा त्याच्यामध्ये एक नवी प्रगल्भता आणि जबाबदारीची जाणीव येते. हा असा टप्पा असतो जिथे स्वप्नांना जबाबदारीची साथ मिळते. आज आपली ब्रिक्स संघटनासुद्धा याच प्रगल्भतेच्या टप्प्यावर पोहोचली आहे," असे ते म्हणाले. एकमेकांच्या दृष्टिकोनाचा आदर करत आणि सहमतीने निर्णय घेत ब्रिक्सने गेल्या दोन दशकांत जगभरात आपली एक मजबूत ओळख निर्माण केली आहे.

आगामी २० वर्षांचा नवा आराखडा

पुढील काळात ब्रिक्सने केवळ चर्चेपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष काम करून दाखवले पाहिजे, असा सल्ला त्यांनी दिला. आगामी २० वर्षांसाठी ब्रिक्सने एक नवीन आणि महत्त्वाकांक्षी अजेंडा तयार करून काम केले पाहिजे, असे ते म्हणाले. दरवर्षी ब्रिक्सचे अध्यक्षपद बदलत असले तरी कामाचा वेग थांबायला नको; यासाठी त्यांनी 'ब्रिक्स कॉँटिन्युटी अँड इम्प्लिमेंटेशन मेकॅनिझम' ही नवी यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव मांडला.

जागतिक प्रशासनात बदलाची जोरदार मागणी

सध्याची जागतिक सत्ता ही मोजक्याच प्रगत देशांच्या हातात केंद्रीत असल्याबद्दल मोदींनी चिंता व्यक्त केली. "आज ग्लोबल साउथचे देश विविध समस्यांचा सामना करत सर्वात पुढे आहेत, पण निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत त्यांना स्थान दिले जात नाही. ही मूठभरांच्या हातात असलेली व्यवस्था बदलून आपल्याला समान भागीदारांचे व्यासपीठ तयार करावे लागेल, जिथे प्रत्येक देशाचा आवाज ऐकला जाईल आणि मानवी विकास हाच केंद्रबिंदू असेल," अशा शब्दांत त्यांनी जागतिक प्रशासनात सर्वसमावेशक बदलांची जोरदार मागणी केली.

## अंबाजोगाईत स्लॅब भराईदरम्यान काळाचा घाला : विजेच्या धक्क्याने दोन कामगारांचा मृत्यू...!



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरातील पंचायत समितीसमोरील बांधकामावर स्लॅब भराईचे काम सुरू असताना 33 ‘केव्ही’ वीजवाहिनीला मशीनचा धक्का लागल्याने झालेल्या विजेच्या दुर्घटनेत दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने अंबाजोगाई शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

मृतांमध्ये बबन चंद्रकात वाघमारे (वय 50) आणि यशवंत कोंडिराम वाघमारे (वय 33), रा. मंगळवार पेठ, (चांभार गल्ली) अंबाजोगाई यांचा समावेश आहे. स्लॅबची भराई मशीनच्या सहाय्याने सुरू असताना मशीनचा अचानक 33 'केव्ही' वीजवाहिनीला संपर्क झाला. यावेळी दोन्ही कामगारांना विजेचा जोरदार धक्का बसला. या दुर्घटनेत दोघांचाही मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरात नागरिकांची गर्दी झाली. एकाच परिसरातील दोन कामगारांचा अशाप्रकारे दुर्दैवी मृत्यू झाल्याने चांभार गल्ली परिसरात शोककळा पसरली आहे.

## मराठवाडा साहित्य परिषद केज कडून आदर्श शिक्षकांचा सत्कार



**केज :** केज तालुक्यातील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा मराठवाडा साहित्य परिषद केज शाखेच्यावतीने गुरुवार रोजी सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ कविता गीते कराड ,प्रोफेसर डॉ. सुनील राऊत यांना स्व. केशवराव नाळवंडीकर आदर्श शिक्षक पुरस्कार , अश्रुबा सोनवणे यांना स्व. केशवराव नळवंडीकर आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच डॉ. हनुमंत सौदागर यांना सिद्धिविनायक शैक्षणिक संस्था आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार, भागवत सोनवणे यांना सिद्धिविनायक शैक्षणिक संस्था आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार व प्रा. हनुमंत भोसले यांना सिद्धिविनायक शैक्षणिक संस्था आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. विविध पुरस्काराने सन्मानित झालेल्या शिक्षकांचा मसापच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो डॉ नवनाथ काशीद,

प्रमुख पाहुणे केज मसापचे संस्थापक अध्यक्ष ईश्वर मुंडे हे होते.

यावेळी उपस्थितांनी

गुणवैशिष्ट्ये असलेली शिक्षक मंडळी चांगली पिढी घडवतात. विद्यार्थ्यांसाठी ज्ञानगंगा सतत वाहत ठेवणारा शिक्षक असतो. स्वयंप्रकाशीत असलेले गुरुजी कायम स्मरणात राहतात.

सृजनशील शिक्षकांची आज समाजाला गरज आहे.आधुनिक तंत्रज्ञान यामुळे नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत.

वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी शिक्षक कार्य करतात. राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने केजची मान उंचावली असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

ईश्वर मुंडे म्हणाले बीड जिल्हा गुणवत्तेची खान आहे असे मत व्यक्त केले. डॉ काशिद म्हणाले मसापच्या विविध उपक्रमातून साहित्य विचार पुढे घेऊन जाण्याचे कार्य मसाप करत आहेत.

कार्यक्रमास महादेव ढाकणे प्रा डॉ महादेव सुवर्णकार , बालासाहेब लोखंडे , दादासाहेब कराड, विक्रम डोईफोडे , श्री कोथिंबीरे , जनार्दन सोनवणे , श्रीमती कोकाटे आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक विक्रम डोईफोडे यांनी केले . सूत्रसंचालन कवी हनुमंत घाडगे यांनी केले.आभार प्रो डॉ नवनाथ काशीद यांनी केले.

## तुलसी महाविद्यालयात विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग क्विज संदर्भात मार्गदर्शन सत्र संपन्न




**बीड:** (प्रतिनिधी) : युवकांच्या सहभागातूनच विकसित भारताचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी राष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या माय भारत पोर्टलवरील उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे प्रतिपादन बीडचे जिल्हा युवा अधिकारी सागर उज्जैनकर यांनी केले.

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या अंतर्गत माय भारत पोर्टलवर आयोजित विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग क्विज संदर्भात विशेष विद्यार्थी संवाद व मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. या मार्गदर्शन सत्रात ते विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डी. जी. निकाळजे हे होते. या प्रसंगी माय भारत युथ आयकॉन सिद्धार्थ वाघमारे आणि सनी गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सागर उज्जैनकर यांनी माय भारत पोर्टलचे स्वरूप, त्यावरील विविध उपक्रम तसेच विकसित भारत क्विजच्या विविध टप्प्यांची सविस्तर माहिती दिली. देशाच्या विकासात तरुणांचे योगदान किती महत्त्वपूर्ण आहे, यावर त्यांनी प्रकाश टाकला. विशेष अतिथी सिद्धार्थ वाघमारे यांनी माय भारत पोर्टलच्या माध्यमातून तरुणांसाठी उपलब्ध असणाऱ्या विविध संधी आणि राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डी.जी.निकाळजे यांनी सर्व विद्यार्थ्यांना विकसित भारत क्विज मध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन आपल्या ज्ञानाला आणि विचारांना राष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.योगिता लांडगे यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोडशेडींग बंद करा, स्मार्ट मीटरची सक्ती थांबवा

### वाढीव बिलाबाबत योग्य ती कारवाई करा - माजी आ. पृथ्वीराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख



**अंबाजोगाई :** ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले लोडशेडींग तात्काळ बंद करा, स्मार्ट मीटरची सक्ती थांबवा आणि वाढीव वीज बिलाबाबत योग्य ती कारवाई करा अशी मागणी माजी आमदार पृथ्वीराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी केली आहे. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे वतीने शुक्रवारी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) च्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे व अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) च्या कार्यकारी अभियंत्यांना शुक्रवार, दिनांक ११ सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अंबाजोगाई शहर व ग्रामीण भागातील नागरिक तसेच शेतकरी बांधवांना महावितरणच्या गलथान कारभारामुळे मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. सध्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर लोडशेडिंग सुरू असून रात्रंदिवस वीज खंडित होत आहे. यामुळे पिकांना वेळेवर पाणी देणे कठीण झाले असून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे, तसेच रात्रीच्या वेळी शेतात पाणी देताना सर्पदंश आणि वन्यप्राण्यांच्या हल्ल्याचा मोठा धोका निर्माण होतो. यासोबतच शहरात आणि ग्रामीण भागात कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय सतत वीज खंडित होण्याचे प्रमाण वाढल्याने नागरिक. येत असलेल्या नवीन स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांमध्ये प्रचंड असंतोष असून विद्यार्थी व व्यापारी त्रस्त झाले आहेत. याशिवाय महावितरणकडून बसविण्यात कोणत्याही ग्राहकांवर हे मीटर बसविण्याची सक्ती करण्यात येऊ नये. ज्या ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटर बसविले आहेत. त्यांना अवाजवी आणि दुप्पट - तिप्पट वीज बिल येत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. त्यामुळे या वाढीव बिलांची योग्य चौकशी करून तात्काळ आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच सध्या गौरी - गणपती व आगामी उत्सव काळ सुरू असल्याने सार्वजनिक मंडळांची व नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी संपूर्ण परिसरात अखंड व नियमित वीज पुरवठा बहाल करण्यात यावा, तरी प्रशासनाने या सर्व दिवसा पूर्ण दाबाने वीज पुरवणे, वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा सुरळीत गंभीर समस्यांची तातडीने दखल घेऊन लोडशेडिंग बंद करून शेतकऱ्यांना करणे. स्मार्ट मीटरची सक्ती थांबवून वाढीव बिलांबाबत योग्य ती कारवाई करणे आणि सण - उत्सवाच्या काळात नियमित वीज पुरवठा सुरू ठेवणे याबाबत तात्काळ ठोस पावले उचलावीत. अशी मागणी सदरील निवेदनाद्वारे केली आहे. निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अमर देशमुख, संजय भोसले, कल्याण भिसे, ॲड.इस्माईल चौधरी, अंकुशराव ढोबळे, ॲड.प्रशांत पवार, महेश जगताप, निळकंठ गडदे, महेमूद करीम शेख, लखन चामनर, राजेभाऊ देवकते, शाम गडदे, गोविंद गडदे, जावेद पप्पूवाले, सुशील उमाप, पांडुरंग देशमुख आदींसह अनेकांची उपस्थिती होती.

## जिल्ह्यातील युवकांनी विकसित भारत क्विझ मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : सागर उज्जैनकर यांचे आवाहन

केज/प्रतिनिधी

भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या वतीने स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त दरवर्षी १२ जानेवारी रोजी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवाची पुनर्रचना करून विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग (VBYLD) २०२७ चे आयोजन करण्यात आले आहे.मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत @२०४७ या संकल्पने ला साकार करण्या साठी हा उपक्रम राबवला जात असून, या अंतर्गत आयोजित विकसित भारत क्विझ २०२७ मध्ये बीड जिल्ह्यातील १५ ते २९ वयोगटातील युवक-युवतींनी मोठ्यासंख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन बीडचे जिल्हा युवा अधिकारी सागर उज्जैनकर यांनी केले आहे.

राष्ट्रीय संमेलन नवी दिल्ली येथे ३० व्या राष्ट्रीय युवामहोत्सवाचे (NYF-VBYLD- 2027) राष्ट्रीय संमेलन दि.१० ते १२ जानेवारी २०२७ दरम्यान भारत मंडपम,नवी दिल्ली येथे होणार आहे.या संमेलनासाठी राष्ट्रीय, राज्य व केंद्रशासित प्रदेशातील प्रतिनिधींची निवड ४ ट्रॅक अंतर्गत केली जात आहे

१.विकसित भारत चॅलेंज ट्रॅक - क्विझ

२.सांस्कृतिक ट्रॅक (Cultural Track)

३.इनोव्हेट फॉर भारत (डिजाइन,हॅकाथॉन, युवा उद्योजक)

४.विकसित भारत युवा संसद (Youth Parliament)

ऑनलाइन क्विझ आणि निवडीचे टप्पे

या उपक्रमाचा पहिला टप्पा म्हणजे ऑनलाइन 'विकसित भारत क्विझ'.

पात्रता- १७ ऑगस्ट २०२६ रोजी वय १५ ते २९ वर्षे असणारे सर्व युवा.

मुदत-३० सप्टेंबर २०२६ पर्यंत.

**माध्यम- माय भारत (MY Bharat) पोर्टलवर ([http://** mybharat.gov.in] (http://mybharat.gov.in)) २२ भारतीय भाषांमध्ये ही स्पर्धा मोफत उपलब्ध आहे.

स्वरूप-२० बहुपर्यायी प्रश्न आणि १० मिनिटांचा वेळ.

या क्विझमधील देशभरातील अव्वल १० टक्के (जास्तीत जास्त ४ लाख) गुणवंत युवकांची पुढील टप

## आमदार नमिता मुंदडांविरोधात आक्षेपार्ह पोस्ट; केज पोलीस ठाण्यासमोर भाजप कार्यकर्त्यांचा ठिय्या, एकावर गुन्हा दाखल




**केज :** केज विधानसभेच्या भाजप आमदार नमिता मुंदडा यांच्याबद्दल सोशल मीडियावर बदनामीकारक आणि आक्षेपार्ह पोस्ट प्रसिद्ध केल्याने केजमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी आक्रमक झालेल्या भाजप कार्यकर्त्यांनी आरोपीवर तत्काळ गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी केज पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केले. कार्यकर्त्यांच्या आक्रमक पवित्र्यानंतर पोलिसांनी संबंधित पोस्ट करणाऱ्या मोहन कुलकर्णी (रा. अंबाजोगाई) याच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा (NC) नोंदवला आहे.

काय आहे नेमके प्रकरण?

मिळालेल्या माहितीनुसार, मोहन कुलकर्णी नामक व्यक्तीने आपल्या फेसबुक खात्यावरून आमदार नमिता मुंदडा यांच्याबाबत अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन बदनामीकारक व आक्षेपार्ह मजकूर पोस्ट केला होता. ही पोस्ट कार्यकर्त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर शुक्रवारी सायंकाळी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी केज पोलीस ठाण्यात धाव घेतली.

संबंधित व्यक्तीवर कडक कारवाई करण्याची मागणी करत संतप्त कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्याच्या आवारातच ठिय्या मांडला. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे पोलीस ठाण्याच्या परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

अदखलपात्र गुन्हा दाखल

कार्यकर्त्यांची आक्रमक भूमिका आणि मागणीची दखल घेत पोलिसांनी परिस्थिती हाताळली. भाजपचे तालुकाध्यक्ष भगवान केदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून केज पोलिसांनी संशयित आरोपी मोहन कुलकर्णी याच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५६ (३) नुसार अदखलपात्र गुन्हा (NC) दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस नाईक त्रिंबक सोपणे करत आहेत. दरम्यान, लोकप्रतिनिधींविरोधात

## महावितरणने स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती करू नये - डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई :** महावितरणने कायद्याचा बडगा दाखवून सर्वसामान्य गोरगरीब जनतेला स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती करू नये अन्यथा याविरूद्ध विद्युत ग्राहकांचे आंदोलन उभे केले जाईल असा इशारा अंबाजोगाई नगरपरिषदेचे माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे.

इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २०२३ चे कलम ४७ (पाच ) अन्वये विद्युत ग्राहकाने मागणी केली तरच वितरण कंपनीने त्याला स्मार्ट प्रीपेड मीटर द्यावे याचाच अर्थ स्मार्ट प्रीपेड मीटर ही ग्राहकाची निवड आहे सक्ती नाही. हा कायदा संसदेने केलेला आहे आणि तो सर्व नियमानपेक्षा वरचढ आहे. सरकारने आर.डी. एस.एस अंतर्गत देशामध्ये २० कोटी, स्मार्ट मीटर ग्राहकांच्या माती मारण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे. संबंधित कंपनीला याद्वारे अब्जावधी रूपयांचा फायदा होणार आहे तसेच मधल्या दलालांना सुद्धा यामध्ये दलालीचे कोट्यावधी रूपये मिळणार आहेत. त्याकरिता सर्वसामान्यांच्या माथी हा भुर्दंड मारण्याचे पाप हे सरकार करत आहे.

ठरवलेल्या २० कोटी स्मार्ट मीटर बसविण्याच्या उद्दिष्टापैकी ६.१३ कोटी मीटर बसून झालेले आहेत आणि उर्वरित मीटर बसविण्याची लगीन घाई हे सरकार करीत आहे. यामध्ये कोट्यावधींचे कमिशन मिळत असल्याचा अंदाज अनेक जाणकार लोकांनी व्यक्त केलेला आहे. या मीटरला न बसविण्याचा अधिकार सर्वसामान्य विद्युत ग्राहकांना कायद्याने दिलेला आहे. संबंधित स्मार्ट मीटर मुळे वीज बिलामध्ये किमान २० टक्केची तफावत असल्याचे ज्यांच्याकडे हे स्मार्ट मीटर बसवले आहेत अशा ग्राहकांनी तक्रारी दाखल केलेल्या आहेत. त्यामुळे अंबाजोगाई मधील सर्वसामान्य नागरिकांनी हे स्मार्ट मीटर बसवायचे नसेल तर महावितरणच्या मीटर बदलण्यासाठी आलेल्या लोकांना स्पष्टपणे नकार द्यावा. ते जर सक्ती करत असतील तर महावितरणला लेखी तक्रार अर्ज करा त्याची पोच घ्या आणि तरीही त्यांनी ऐकले नाही तर महाराष्ट्र विद्युत नियमक आयोगाकडे किंवा विद्युत ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे आपली अधिकृत तक्रार करावी व भविष्यामध्ये येणाऱ्या ज्यादा बिलापासून स्वतःचा बचाव करावा असे आवाहन डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी अंबाजोगाई शहरातील नागरिकांना केले आहे. हायकोर्ट मध्ये स्मार्ट मीटर बसविण्याबाबत अनेक पीआयएल दाखल असताना महावितरणने सर्वसामान्य जनतेला शक्तीने हे मीटर बसविण्याची घाई करू नये अशी अपेक्षा देखील सामाजिक कार्यकर्ते डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केली आहे.

## नवगण राजुरी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**नवगण राजुरी दि. 12 (प्रतिनिधी):-** मंगलमूर्ती देवस्थान नवगण राजुरी येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी गणेश जन्म महोत्सवा निमित्त दि. 12 ते 19 सप्टेंबर या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्याच्या माजी खासदार स्व.केशरकाकू क्षीरसागर आणि सोनाजीराव क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून आरंभ झालेल्या आणि आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणाऱ्या या सप्ताहात दैनिक कार्यक्रमात पहाटे 4 ते 5 काकडा आरती, सकाळी 10 ते 12 गाथा भजन, दुपारी 3 ते 5 गणेशपुराण, सायंकाळी 5 ते 6 हरिपाठ, रात्री 9 ते 11 हरिकीर्तन त्यानंतर भजन, भारुड होणार असून यात ह.भ.प. जनार्दन महाराज शिंदे मत्सेंद्रगड यांचे हरिकीर्तन संपन्न झाले तर ह.भ. प. सुधाकर महाराज वाघ पैठण, रामकृष्ण महाराज रंधवे पाटोदा, दीपक महाराज बादाडे काडीवडगाव, पुष्कर महाराज गोसावी, राधाताई महाराज सानप महासांगवी, भरत महाराज जोगी परळी यांचे हरिकीर्तन होणार असून सोमवार दि. 14 रोजी श्री गणेशास गंगेच्या कावडीने जलाभिषेक घालण्यात येईल. रात्री 11 ते 12 या वेळेत आरती, उपासना व गणेश जन्माचे भजन होईल. शुक्रवार दि. 18 रोजी महाद्वारचा अनादिकाला होईल व नंतर श्रींच्या पालखीची गावातून भव्य मिरवणूक निघेल. या सप्ताहाची सांगता शनिवार दि. 19 रोजी ह.भ.प. प्रेममूर्ती महंत शिवाजी महाराज श्रीक्षेत्र संस्थान नारायण गड यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून त्यानंतर महाप्रसाद होईल तरी भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताहाचा अवश्य लाभ घ्यावा. असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळ नवगण राजुरी यांनी केले आहे.

## केज रोटरीच्या वतीने गौरी सजावट स्पर्धेचे आयोजन

**केज प्रतिनिधी :** प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रोटरी क्लब ऑफ केज यांच्या वतीने गौरी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेचे परीक्षण शुक्रवार दि 18 सप्टेंबर व शनिवार दि 19 सप्टेंबर 2026 रोजी दुपारी 2 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंतच्या वेळेत केले जाईल. सजावटीसाठी यावर्षी सामाजिक ऐक्य, पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, महिला सक्ष्मीकारण व पारंपारिक सजावट इत्यादी विषय राहणार आहेत. या स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी (परिवारांतील एका व्यक्तीने) आपले नांव, पूर्ण पत्ता, मोबाईल नंबर व परीक्षणासाठी अनुकूल दिवस आणि वेळ इत्यादी माहितीसह आपले प्रवेश गुरुवार दि 17सप्टेंबर 2026पूर्वी रोटरी क्लब ऑफ केज कडे पाठवणे बंधनकारक आहे. या स्पर्धेत केज शहरातील जास्तीत जास्त गौरी सजावट प्रेमीनी सहभागी व्हावे असे आवाहन रोटरी क्लब ऑफ केज चे अध्यक्ष असरार खुरेशी, सचिव हनुमंत भोसले व प्रोजेक्ट चेअरमन अरुण अंजान आणि मंगेश नेहरकर, दादा जमाले पाटील यांनी केले आहे.

प्रवेश व संपर्कासाठी हनुमंत भोसले (9423733888),

अरुण अंजान ( 94206 58811 ), मंगेश नेहरकर ( 97665 05856) व दादा जमाले पाटील (9823771333 ) यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन केज रोटरीच्या वतीने करण्यात आले आहे.

## चातुर्मास उत्सवानिम्मित सोमवारी ह. भ. प. पांडुरंग रांजवण महाराज यांचे प्रवचन



**बीड :** बीड शहरातील स्वराज्य नगर येथील ज्ञानेश्वरी अभ्यासक श्री.ह.भ.प. भागवताचार्य माधव महाराज डाके यांच्याकडे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही चातुर्मास उत्सव मोठ्या भक्तिमय वातावरणात व आनंदात सुरू आहे.

या चातुर्मास उत्सवात प्रत्येक सोमवारी रात्री ८.०० ते ९.०० या वेळेत बीड जिल्ह्यातील नामवंत,प्रज्ञावंत ज्ञानेश्वरी अभ्यासक व कीर्तनकार महाराजांच्या रसाळ व प्रासादिक प्रवचन सेवा आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

यावर्षीच्या चातुर्मास उत्सवातील प्रतिसोमवार प्रवचन सेवा दिनांक १४ सप्टेंबर 2026 सोमवार रोजी ह भ प पांडुरंग महाराज रांजवण आहेर वडगाव यांची प्रवचन सेवा आयोजित करण्यात आली आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके या फेसबुक चॅनल वरती केले जाणार आहे. याची भाविकांनी नोंद घ्यावी. या प्रवचन सेवेचा लाभ बीड शहर व परिसरातील परिसरातील भाविक भक्तांना होत असुन जास्तीत जास्त भाविकांनी मोठ्या संख्येने सदरील प्रवचन सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजक श्री.ह.भ.प. माधव महाराज डाके काठवडेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## डॉक्टर जीवनदान देतात, तर फिजिओथेरपिस्ट आनंदाने जगण्याची ताकद : डॉ. आदिती सारडा

**बीड :** धावपळीच्या आणि बदलत्या जीवनशैलीमुळे आज लहान वयातच गंभीर आजार वाढले आहेत. अशा वेळी औषध अथवा शस्त्रक्रियेविना रुग्णाला पुन्हा स्वावलंबी बनवण्याचे महान कार्य फिजिओथेरपी करते. डॉक्टर रुग्णाला जीवनदान देतात, पण फिजिओथेरपिस्ट त्यांना ते जीवन पुन्हा आनंदाने आणि हालचालींसह जगण्याची ताकद देतात,असे प्रतिपादन आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.

**वर्ल्ड फिजिओथेरपी या जागतिक संघटनेच्या ८ सप्टेंबर १९५१ रोजी झालेल्या स्थापनेचे औचित्य साधून आदित्य एज्युकेशन ग्रुप कॅम्पसमध्ये जागतिक फिजिओथेरपी दिन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला. ९ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३०** वाजता आयोजित या कार्यक्रमात आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजार तसेच पक्षाघात यांसारख्या गंभीर आजारांवर प्रतिबंध, व्यवस्थापन आणि पुनर्वसनात फिजिओथेरपीचे महत्त्व विशद करणारे प्रभावी पथनाट्य सादर केले. कार्यक्रमाचे उद्घाटन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते पार पडले. व्यासपीठावर आदित्य कृषीचे प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य आयुर्वेदचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, आदित्य दंत महाविद्यालयाचे डॉ. हिमांशु श्रीवास्तव, डॉ. विकास गर्जे, प्रा. प्रदीप काठोळे व प्रा. बालाजी बाहीरवाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ. आदिती सारडा म्हणाल्या, आजच्या धावपळीच्या युगात चुकीची जीवनशैली आणि व्यायामाच्या अभावामुळे लहान वयातच सांधेदुखी, पाठदुखीचे आजार वाढले आहेत. औषध व शस्त्रक्रियेविना पुन्हा निरोगी बनवण्याचे काम फिजिओथेरपी करते. डॉक्टर जीवनदान देतात, पण फिजिओथेरपिस्ट ते जीवन हालचालींसह आनंदाने जगण्याची ताकद देतात. स्ट्रोक किंवा हृदयविकारानंतर रुग्णाला सामान्य आयुष्यात आणण्यासाठी फिजिओथेरपिस्टचे मार्गदर्शन संजीवनी ठरते असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमास कॅम्पसमधील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. बालाजी बाहीरवाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रा. रामेश्वर ढोबळे, डॉ. धनश्री टाकसाळे, डॉ. संदेश दळवी, डॉ. श्वेतजा चोपडे, डॉ. रजनी शिंदे यांच्यासह विविध संस्थांचे प्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## विवो बड्‌ससह आयओटी क्षेत्रात विवोचा प्रवेश

नवी दिल्ली– विवो इंडियाने आज विवो बड्स लॉंच केले, जे एक वजनाने हलके, रोजच्या वापरासाठीचे ऑडिओ साथीदार असून दीर्घकाळ टिकणारी बॅटरी लाईफ, इमर्सिव्ह साउंड, इंटेलिजेंट कॉल नॉईज कॅन्सलेशन आणि सुलभ कनेक्टिव्हिटीसह येतात. संगीत, कॉल्स, गेमिंग आणि मनोरंजनासाठी वापरकर्त्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने डिझाइन केलेले, विवो बड्स कॉम्पॅक्ट डिझाइनमध्ये एकूण ५० तासांची बॅटरी लाईफ, १ सेमी हाय-रिझोल्यूशन स्पीकर ड्रायव्हर्स, ड्युअल-माइक एआय कॉल नॉईज कॅन्सलेशन आणि ४२ एमएस गेमिंग लेटन्सी यांसारखी वैशिष्ट्ये देतात.

## नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडचा आयपीओ

**नाशिक :** नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडने आपल्या पहिल्या सार्वजनिक भागविक्रीसाठी (आयपीओ) ₹१ दर्शनी मूल्य असलेल्या प्रति इक्विटी शेअरसाठी ₹१,७०० ते ₹१,७८५ चा किंमतपट्टा निश्चित केला आहे. कंपनीचा हा आयपीओ सबस्क्रिप्शनसाठी १७ सप्टेंबर २०२६ रोजी उघडेल आणि २१ सप्टेंबर २०२६ रोजी बंद होईल.गुंतवणूकदार किमान ८ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ८ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली (Bid) लावू शकतात.आजच्या तारखेनुसार आऊटस्टँडिंग इक्विटी शेअर्सची संख्या ₹१ दर्शनी मूल्याचे २,४७५,०००,००० इक्विटी शेअर्स आहे.

## आयएसएसओ राष्ट्रीय क्रीडा बुद्धिबळ स्पर्धा 2026 चे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** शालेय क्रीडा परिसंस्था अधिक सक्षम करण्यासाठी कटिबद्ध असलेल्या अदाणी इंटरनॅशनल स्कूलने (एडीआयएस) इंडियन स्कूल्स स्पोर्ट्स ऑर्गनायझेशन (आयएसएसओ) राष्ट्रीय क्रीडा बुद्धिबळ स्पर्धा 2026 चे आयोजन केले आहे.या स्पर्धेत 10 हून अधिक राज्यांमधील 100 हून अधिक शाळांमधील 425 हून अधिक युवा बुद्धिबळपटू सहभागी झाले आहेत. या दोन दिवसीय स्पर्धेला 800 हून अधिक विद्यार्थी, पालक, प्रशिक्षक आणि शाळांचे प्रतिनिधी अहमदाबाद येथे उपस्थित आहेत.

## आर्थिक समावेशनाला चालना देण्यासाठी नवकल्पनांचा शुभारंभ केला

**मुंबई :** वित्त मंत्रालय, भारत सरकारच्या वित्तीय सेवा विभागाचे सचिव, श्री. संजय लोहिया यांनी आज देशातील आर्थिक समावेशनाला चालना देण्यासाठी ग्लोबल फिनटेक फेस्ट 2026 मध्ये अनेक नवकल्पनांचा शुभारंभ केला. या उपक्रमांमध्ये त्वरित रुपे कार्ड आणि व्यापाऱ्यांसाठी यूपीआय क्यूआर जारी करण्यासाठी ओपन-सोर्स एटीएम, निवडक सरकारी समर्थित कर्ज योजनांसाठी ‘युपीआय वरील क्रेडिट लाइन’ची सुविधा, तसेच आधार सक्षम पेमेंट प्रणाली थ्री-पार्टी कॅश डिपॉझिट या सुविधांचा समावेश आहे. हा कार्यक्रम भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी , श्री. सौरभ विजय यांच्या उपस्थितीत पार पडला.

## आईकू ने जेड 11 एक्सए 5 जी लॉंच केला

**नवी दिल्ली :** उच्च-कार्यक्षमता असलेल्या स्मार्टफोन ब्रँड आईकू ने आजआईकू जेड 11 एक्सए 5 जी लॉंच केला, जो आजच्या विद्यार्थ्यांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केला आहे. हा स्मार्टफोन अशा विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केला आहे जे एकाच वेळी अनेक कामे करतात—ज्यात ऑनलाइन क्लासेस, संशोधन, असाइनमेंट्स, मनोरंजन, गेमिंग आणि प्रवासातही कनेक्टेड राहणे यांचा समावेश आहे. हा स्मार्टफोन त्यांच्या वेगवान, डिजिटल-फर्स्ट जीवनशैलीला समर्थन देण्यासाठी शक्तिशाली कार्यक्षमता, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, मजबुती आणि एआई -सक्षम वैशिष्ट्ये एकत्र आणतो. आईकू च्या जेड -सिरीज लाइनअपला अधिक मजबूत करत, आईकू जेड 11 एक्सए 5 जी मध्ये 4एनएम प्रक्रियेवर तयार केलेला मीडियाटेक डाइमेंशन 7400-टर्बोप्रोसेसर, 44डब्ल्यू फ्लॅशचार्जसह 7200एमएएच बॅटरी आणि आई पी 68 व आई पी69 धूळ आणि पाणी प्रतिरोधक क्षमता आहे.

## रेझ़रपे ने 'मेड-इन-इंडिया' एआय पेमेंट मॉडेल सादर

मुंबई - मुंबईतील ग्लोबल फिनटेक फेस्ट ( २०२६ मध्ये वित्त आणि तंत्रज्ञानाच्या भविष्यावर चर्चा करण्यासाठी भारताची फिनटेक परिसंस्था एकत्र आली असताना, माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी मुंबईतील GFF मध्ये रेझ़रपे टीमची भेट घेतली, जिथे कंपनीने भारताचे पहिले एआय पेमेंट पायाभूत मॉडेल, "रेझरपे व्हल्कन" सादर केले. खिलन हरिया, सीपीओ, रेझरपे, माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांना रेझरपे व्हल्कन सादर करताना. व्हल्कन ही रेझ़रपे सॉफ्टवेअरमधील एकच एआय पेमेंट प्रणाली आहे, जी केवळ पेमेंटवर प्रक्रिया करत नाही, तर ते समजूनही घेते – भारतातील प्रत्येक डिजिटल पेमेंट अधिक जलद, सुरक्षित आणि स्मार्ट बनवण्याच्या उद्देशाने, ४ अब्ज पेमेंटमधील अंदाजे ३.३ ट्रिलियन डेटा पॉइंट्सवर प्रशिक्षित. एआयचा वापर करून, ते व्यवसायांना ऑनलाइन व्यवहारांचे यश दर रिअल-टाइममध्ये वाढविण्यात, फसवणूक होण्यापूर्वीच ती शोधण्यात आणि ग्राहकांना एक अखंड ऑनलाइन पेमेंट चेकआउट अनुभव प्रदान करण्यात मदत करते.

## गणेश चतुर्थी विक्रेत्यांच्या सहभागात वाढ

**मुंबई :** यंदाच्या गणेश चतुर्थीच्या खरेदीसाठी महाराष्ट्र हा मीशोच्या प्रमुख सणासुदीच्या बाजारपेठांपैकी एक ठरला आहे. राज्यात मुंबई आणि पुणे या सणासुदीच्या खरेदीसाठीच्या प्रमुख बाजारपेठा ठरल्या. विशेष म्हणजे, सणासुदीची ऑनलाइन खरेदी केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित न राहता लहान शहरांमध्येही मोठ्या प्रमाणात विस्तारल्याचे दिसून आले. देशभरातील मीशोवरील गणेश चतुर्थीच्या एकूण ऑर्डर्सपैकी तब्बल ५३% ऑर्डर्स टियर-४ बाजारपेठांमधून आल्या. यामुळे छोट्या शहरांमध्येही सणासुदीच्या ई-कॉमर्सला मिळणारी वाढती पसंती अधोरेखित झाली आहे.

## मेडिकव्हर हॉस्पिटलला राष्ट्रीय स्तरावरील एनएबीएच मानांकन

**छत्रपती संभाजीनगर :** रुग्णांना सुरक्षित, गुणवत्तापूर्ण आणि उच्च दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना महत्त्वपूर्ण मान्यता मिळाली असून, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, छत्रपती संभाजीनगर यांना राष्ट्रीय स्तरावरील एनएबीएच मानांकन प्राप्त झाले आहे. एनएबीएच हे रुग्णालयांमधील रुग्ण सुरक्षा, उपचारांची गुणवत्ता, संसर्ग नियंत्रण, औषध व्यवस्थापन, वैद्यकीय नोंदी, आपत्कालीन सेवा, कर्मचारी प्रशिक्षण तसेच विविध रुग्णालयीन प्रक्रियांमध्ये निर्धारित गुणवत्ता निकषांचे पालन यांचे मूल्यांकन करणारे देशातील महत्त्वाचे मानांकन आहे. हे मानांकन मिळविण्यासाठी रुग्णालयातील विविध विभागांमध्ये निर्धारित मानकांनुसार प्रक्रिया राबविणे, त्यांचे सातत्याने परीक्षण करणे आणि रुग्णांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असते. मेडिकव्हर हॉस्पिटलच्या डॉक्टर, नर्सिंग, पॅरामेडिकल, तांत्रिक आणि प्रशासकीय टीमच्या सातत्यपूर्ण योगदानामुळे ही उल्लेखनीय कामगिरी साध्य झाली आहे.

## गब्बी ची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली

मुंबई - भारतातील आघाडीच्या प्रीमियम बाथ फिटिंग्ज आणि सॅनिटरीवेअर ब्रँडपैकी एक असलेल्या जल बाथ फिटिंग्जने आपली नवीन डिजिटल ब्रँड फिल्म प्रदर्शित केली आहे आणि प्रसिद्ध अभिनेत्री वामिका गब्बी ची अधिकृत ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती जाहीर केली आहे. ही भागीदारी ब्रँडची राष्ट्रीय उपस्थिती मजबूत करण्याच्या आणि डिझाइनची जाण असलेल्या भारतीय ग्राहकांच्या नवीन पिढीशी जोडले जाण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

# माटरगावातील कथित कत्तलखान्यावर खुलताबाद पोलिसांचा ‘सर्जिकल स्ट्राईक’; 47 जनावरांची सुटका

### जेसीबीने शेड हटविले; चार आरोपींवर गुन्हा दाखल, 42 लाख 75 हजारांचा मुद्देमाल जप्त



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद तालुक्यातील माटरगाव येथे गोवंशाची कथित अवैध कत्तल व वाहतूक होत असल्याच्या माहितीवरून खुलताबाद पोलिसांनी शुक्रवारी (दि. ११) पहाटे कारवाई केली. माटरगाव येथील अजिम शेख यांच्या घरासमोरील पत्री शेडवर टाकलेल्या छाप्यात ४२ जिवंत जनावरांची सुटका, कापलेल्या गोवंशाचे अवशेष, वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली वाहने व कत्तलीसाठी वापरले जाणारे हत्यार असा एकूण ४२ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांच्या माहितीनुसार, ११ सप्टेंबर रोजी पहाटे सुमारे ५ वाजता पोलीस अंमलदारांना माटरगाव येथील एका पत्री शेडमध्ये गोवंशाची अवैधरीत्या कत्तल केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन पोलीस पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. शेडची तपासणी केली असता तेथे जिवंत गोवंश तसेच कापलेल्या अवस्थेतील गोवंश आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले.

या कारवाईत अजिम बाबू शेख (वय ३६, रा. माटरगाव), मोईन रजाक कुरेशी (वय ४५), अनिस अजिज कुरेशी आणि वाजिद अजिज कुरेशी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये विविध जाती व रंगांची गायी व वासरे, मारुती सुझुकी अल्टो कार, अशोक लेलँड वाहन/ट्रक आणि होंडा सिटी कार यांचा समावेश आहे. याशिवाय गोवंश कत्तलीसाठी वापरण्यात येणारे हत्यारही पोलिसांनी जप्त केले आहे. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ४२ लाख ७५ हजार रुपये असल्याचे पोलिस कागदपत्रांत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३२५ तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारणा २०१५) मधील कलम ५, ५(ब), ५(क) व ९(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई ग्रामीण पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी आणि सहायक पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोलीस हवालदार योगेश ताठे, सिद्धार्थ सदावर्ते, नवनाथ कोल्हे, दिलीप बनसोड, सुनील लहाने, योगेश क्षिरसागर, दादाराव तिडके, राम राठोड आदींच्या पथकाने केली.याप्रकरणी पुढील तपास पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील हे करीत आहे.

# भास्कर कुलकर्णी यांची ‘राष्ट्रीय आदर्श मुख्याध्यापक व शाळा पुरस्कार २०२६’साठी निवड



**तभा वृत्तसेवा पैठण दि ०९ :** आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिर, पैठणचे मुख्याध्यापक भास्कर रामराव कुलकर्णी यांच्या शैक्षणिक, सामाजिक व सेवाभावी कार्याची दखल घेत स्विफ्ट अँड लिफ्ट फाउंडेशन पुणे यांच्या वतीने दिला जाणारा ‘राष्ट्रीय आदर्श मुख्याध्यापक व शाळा पुरस्कार २०२६’ जाहीर झाला आहे. विशेष म्हणजे वेदमंगल प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित ‘मराठवाडा रत्न आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार’ यासाठीही त्यांची निवड झाली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याला एकाच वेळी दोन प्रतिष्ठित पुरस्कारांची सलामी मिळाली आहे.

मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांनी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अंमलबजावणी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेले कार्य उल्लेखनीय ठरले आहे.

‘विद्यार्थी केंद्रस्थानी आणि गुणवत्ता हेच ध्येय’ या विचारातून त्यांनी शाळेच्या विकासाला नवी दिशा दिली. शैक्षणिक उपक्रमांसोबतच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, नेतृत्वगुण, क्रीडा, कला, विज्ञान, स्पर्धात्मक परीक्षांची तयारी आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे.मुख्याध्यापक म्हणून केवळ प्रशासकीय जबाबदारी न निभावता शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यात समन्वय साधत शाळेला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणारे नेतृत्व म्हणून भास्कर कुलकर्णी यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण आणि सेवाभावी कार्याची पावती म्हणून दोन प्रतिष्ठित पुरस्कारांसाठी झालेली निवड ही आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिरसह संपूर्ण पैठणसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. या निवडीबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, उपाध्यक्ष श्रीमती ज्योती ठाकूर, विद्यासभा अध्यक्ष डॉ. जयंत जोशी, संकुलाचे पालक उमेश जगताप, स्थानिक व्यवस्था समितीचे अध्यक्ष डॉ. पद्मकुमारजी कासलीवाल, कार्यवाह जुगलकिशोर लोहिया, प्राथमिक शाळा समितीचे अध्यक्ष शिवाजी मारवाडी, माध्यमिक शाळा समितीचे अध्यक्ष नंदकिशोर मालाणी, तसेच विजय चाटुपळे, डॉ. राम लोंढे, मनोज शुक्ल, किशोर भाकरे, विजय पापडीवाल, दत्तात्रय पोहेकर, रविंद्र साळजोशी, मुख्याध्यापिका श्रीमती ज्योती जोशी यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

भास्कर कुलकर्णी यांच्या या दुहेरी पुरस्कार निवडीबद्दल शैक्षणिक, सामाजिक तसेच विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या कार्याचा आणि नेतृत्वाचा हा गौरव शिक्षक क्षेत्रासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

# मानसिक आरोग्याची लक्षणे वेळीच ओळखा; संवाद साधा

### 10 ते 17 सप्टेंबरदरम्यान जिल्ह्यात मानसिक आरोग्य जनजागृती सप्ताह; शाळा-महाविद्यालयांत विविध उपक्रम

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** शारीरिक आरोग्यासोबत मानसिक आरोग्याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे असून, मानसिक ताण, नैराश्य, चिंता किंवा वर्तनातील बदलांकडे दुर्लक्ष न करता वेळीच मदत घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यात मानसिक आरोग्याबाबत जनजागृती, समुपदेशन आणि आवश्यक आरोग्य सेवा नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या नेतृत्वाखाली हे उपक्रम राबविण्यात येत आहेत. मानसिक आरोग्याबाबत जनजागृती अधिक व्यापक करण्यासाठी १० ते १७ सप्टेंबरदरम्यान जिल्ह्यात मानसिक आरोग्य सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या काळात शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती शिबिरे, समुपदेशन, संवाद सत्रे आणि विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत.

सतत उदास किंवा चिंताग्रस्त वाटणे, पूर्वी आवडणाऱ्या गोष्टींमध्ये रस कमी होणे, चिडचिड, झोप किंवा भुकेतील बदल, एकाग्रतेचा अभाव, सतत थकवा, कुटुंबीय व मित्रांपासून दूर राहणे, अभ्यास किंवा कामावर परिणाम होणे, तसेच स्वतःबद्दल नकारात्मक विचार वाढणे ही मानसिक आरोग्याच्या समस्यांची संभाव्य लक्षणे आहेत. अशी लक्षणे सातत्याने जाणवत असल्यास त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

मानसिक आरोग्याची समस्या असणे म्हणजे व्यक्ती कमकुवत आहे असे नाही. योग्य वेळी समुपदेशन, मानसोपचार, आवश्यकतेनुसार औषधोपचार आणि कुटुंबीयांचा आधार मिळाल्यास अनेक समस्यांवर प्रभावीपणे मात करता येते. स्वतःला इजा करण्याबाबत किंवा आत्महत्येबाबत बोलणाऱ्या व्यक्तीला एकटे न सोडता तिच्याशी शांतपणे संवाद साधावा आणि तातडीने तज्ज्ञांची मदत घ्यावी, असेही आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे दररोज मोफत मानसिक आरोग्य तपासणी व उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. मानसोपचार तज्ज्ञ डॉ. जगदीश टेकाळे, क्लिनिकल मानसशास्त्रज्ञ डॉ. महेश मरकड व त्यांच्या टीममार्फत ही सेवा दिली जाते. तसेच नागरिकांनी जवळचे शासकीय रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा आयुष्मान आरोग्य मंदिराशी संपर्क साधावा.

नियमित झोप, संतुलित आहार, व्यायाम, योग-ध्यान, विश्वासू व्यक्तींशी मोकळा संवाद, काम व विश्रांतीचा समतोल आणि व्यसनांपासून दूर राहणे यामुळे मानसिक आरोग्य चांगले राखण्यास मदत होते. मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबतचे गैरसमज व सामाजिक कलंक दूर करून गरजू व्यक्तीला आधार देणे ही सामूहिक जबाबदारी आहे.

# आत्महत्येबद्दलचा दृष्टिकोन बदला; संवादाला सुरुवात करा

### नैराश्य, तणाव आणि एकटेपणाची लक्षणे वेळीच ओळखण्याचे जिल्हा रुग्णालयात आवाहन



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त जिल्हा रुग्णालयातील मानसोपचार विभाग आणि जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमाच्या वतीने जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आत्महत्येच्या विचारांशी झुंजणाऱ्या व्यक्तीला दोष देण्याऐवजी तिचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, भावनिक आधार देणे आणि गरजेनुसार तज्ज्ञांची मदत घेणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुदाम लगास होते. अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पद्मजा सराफ, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बढे, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. जितेंद्र डोंगरे, मंगल मुळे, जगदीश टेकाळे, डॉ. म्हस्के, डॉ. अपर्णा डिकोंडवार, असिस्टंट मेट्रन यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना डॉ. जितेंद्र डोंगरे यांनी सांगितले की, नैराश्य, एकटेपणा, तणाव तसेच कौटुंबिक आणि सामाजिक समस्यांमुळे व्यक्तीच्या मनात आत्महत्येचे विचार निर्माण होऊ शकतात. अशावेळी संबंधित व्यक्तीशी संवेदनशीलतेने संवाद साधून तिचे म्हणणे ऐकून घेणे महत्त्वाचे आहे. “बोला, ऐका आणि आधार द्या. संवादाची सुरुवात हीच मदतीची पहिली पायरी आहे,” असा संदेश त्यांनी दिला.

अचानक एकटे राहणे, समाजापासून अलिप्त होणे, सतत नकारात्मक बोलणे, झोप व भुकेमध्ये लक्षणीय बदल होणे, स्वतःला निरुपयोगी किंवा इतरांवर ओझे समजणे तसेच मृत्यू किंवा जीवन संपविण्याबाबत वारंवार बोलणे ही धोक्याची लक्षणे असू शकतात. अशी लक्षणे आढळल्यास व्यक्तीला एकटे न सोडता भावनिक आधार द्यावा आणि गरज भासल्यास तातडीने मानसिक आरोग्य तज्ज्ञ किंवा जवळच्या आरोग्य संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी ‘टेली-मानस’ (Tele-MANAS) टोल-फ्री क्रमांक १४४१६ बाबतही माहिती देण्यात आली. मानसिक आरोग्याशी संबंधित अडचणी, तणाव किंवा भावनिक संकटाच्या परिस्थितीत मदत घेण्यास संकोच करू नये, असे सांगण्यात आले.

## दशलक्षण पर्व निमित्त वेरूळ गुरुकुल मध्ये भव्य तत्वार्थ सूत्र महामंडळ विधान आयोजन

छत्रपती सभाजीनगर पार्श्वनाथ ब्रह्मचर्या श्रम जैन गुरुकुल मध्ये जैन धर्मीयांचा सर्व श्रेष्ठ धार्मिक पर्व म्हणून दक्षलक्षण महापर्व प्रख्यात आहे.दिनांक 16 सप्टेंबर ते 26 सप्टेंबर पर्यंत वेरूळ गुरुकुल मध्ये या पर्वाचे साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमात दिनांक 15 रोजी मंडप शुद्धी घट यात्राचे आयोजन करण्यात येणार आहे तर दिनांक 16 पासून दररोज सकाळी 6.00 वाजता अभिषेक पूजन बोल्या करण्यात येणार आहे.याच निमित्ताने या दश दिवसात तत्वार्थ सूत्र महामंगल विधानाचे आयोजन केले. तसेच परम पूज्य 108 नियम सागर महाराज व सुपार्शसागर महाराज यांच्या मंगल प्रवचनाचे देखील दररोज दुपारी 3.00 आयोजन करण्यात आले आहे.दिनांक 19 सप्टेंबर रोजी पुष्पदंत भगवान मोक्ष कल्याणक निमित्ताने तसेच दिनांक 25 सप्टेंबर रोजी वासपूज्य भगवान मोक्ष कल्याणक निमित्ताने भव्य निर्वाण लाडू चढविण्यात येईल.दिनांक 26 रोजी विश्व शांती हेतुन होम हवन करण्यात येणार आहे. बाहेरून येणाऱ्या सर्व भाविकांची यावेळी निवास व शुद्ध भोजन व्यवस्था करण्यात येणार आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन बाल ब्रह्मचारी मनीष भैय्या यांच्या मार्गदर्शनात करण्यात येणार आहे.तरी या कार्यक्रमासाठी सकल जैन समाजानी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे मार्गदर्शक वर्धमान पांडे अध्यक्ष दिनेश गंगवाल महामंत्री प्रेमचंद पाटणी सहसचिव गौतम ठोले कोषाध्यक्ष सुमित ठोले मदनलाल पांडे निर्मलकुमार ठोले गुलाबचंद बोराळकर पर्यवेक्षक सुकुमार नवले यांनी केले आहे अशी माहिती अतुल बांदे सुहास मिश्रीकोटकर पियूष कासलीवाल नरेंद्र अजमेरा यांनी दिली.

## प्रभावती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचा 7 वा वर्धापनदिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

**बिडकीन, दि. ११ सप्टेंबर :** पैठण तालुक्यातील चितेगाव येथील प्रभावती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., चितेगाव यांचा ७ वा वर्धापनदिन शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रभावती पतसंस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर उत्तम शिंदे, उपाध्यक्ष रामभाऊ गिधाने , संचालक नंदू कुमार गिधिने,यांच्या हस्ते सत्यनारायण पूजन करून करण्यात आली. यावेळी अध्यक्ष व उपाध्यक्ष पतसंस्थेचे सर्व सभासद ,संचालक, खातेदार व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी पतसंस्थेला वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर उत्तम शिंदे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. पतसंस्थेचे व्यवस्थापक व कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## विचार-अविचाराच्या उंबरठ्यावरचा थरार; ‘देवघर ऑन रेंट’चा टिझर प्रदर्शित




तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आध्यात्म, गूढरहस्य आणि थरारक ॲक्शनचा अनोखा मिलाफ असलेल्या ‘देवघर ऑन रेंट’ या आगामी मराठी चित्रपटाचा टिझर प्रदर्शित झाला आहे. शीर्षकापासूनच चर्चेत असलेल्या या चित्रपटाच्या टिझरने प्रेक्षकांची उत्सुकता वाढवली आहे. दाट गूढ वातावरण, पोलिसांचा तपास, रक्तरंजित घटनांचे संकेत आणि देवाच्या दाराशी येऊन थांबणारे अनाकलनीय कथानक टिझरमध्ये पाहायला मिळते. ‘कर्म काहीही असो, सगळ्या वाटा देवाच्या दारात जातात’ या विचाराभोवती चित्रपटाची कथा गुंफली गेल्याचे दिसते. ‘विचार आणि अविचाराच्या उंबरठ्यावरची गोष्ट’ अशी चित्रपटाची ओळख करून देण्यात आली आहे. आनंदी पिक्चर्स अमरावती प्रस्तुत आणि राधाकृष्ण प्रोडक्शन निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन स्वरूप सावंत यांनी केले आहे. सचिन रोडे पाटील व पूनम चौधरी पाटील निर्माते आहेत. निखिल चव्हाण, अंकित मोहन, भाऊ कदम, शशांक शेंडे, अश्विनी चवरे आणि गौतमी पाटील यांच्यासह ‘केजीएफ’फेम गरुडा राम यांच्या भूमिका आहेत. चित्रपट २५ सप्टेंबरला महाराष्ट्रासह बेळगाव, हैदराबाद, इंदूर व बडोदा येथे प्रदर्शित होणार आहे.

## छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा हटवून ‘कमळ चौक’ करण्याचा भाजपचा डाव - स्वाभिमानीचा आंदोलनाचा इशारा

छत्रपती संभाजीनगर - महानगरपालिकेने सिद्धार्थ उद्यानालगत हॉटेल कार्तिकी चौकातील ऐतिहासिक शेतकरी पुतळा हटवून त्या ठिकाणी ‘कमळ चौक’ करण्याचा घाट घातला आहे. सत्ताधारी भाजपच्या या निर्णयाचा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने तीव्र शब्दात निषेध केला आहे.हा पुतळा केवळ शिल्प नसून बळीराजाच्या कष्टाचे आणि त्यागाचे प्रतीक आहे. नगरपालिका काळापासून हातात ज्वारीचे कणीस घेतलेला हा पुतळा उभा आहे. एकीकडे शेतमालाला हमीभाव नाही, अतिवृष्टी व दुष्काळाने शेतकरी मेटाकुटीस आला असताना, दुसरीकडे त्याच्याच अस्मितेवर हातोडा चालवण्याचे काम पालिका करत आहे. शहराच्या सौंदर्यीकरणाच्या नावाखाली भाजपच्या पक्षचिन्हाचा चौक उभारणे म्हणजे शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळ आहे.

## बिडकीन पोलीस ठाण्यात गणेशोत्सव अनुषंगाने शांतता समिती बैठक



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १२ सप्टेबर बिडकीन पोलीस ठाणे हद्दीतील गणेश मंडळ अध्यक्ष/पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, शांतता समिती सदस्य, पोलीस पाटील व पत्रकार बांधव यांची शांतता समिती व समन्वय बैठक घेण्यात आली.सदर बैठकीमध्ये गणेश उत्सव २०२५ सर्वोत्कृष्ट गणेश मंडळ यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले तसेच एक गाव एक गणपती या गावाचे गणेश मंडळ यांना देखील प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहे. तसेच सदर बैठकीत डीजे/डॉल्बीमुक्त गणेशोत्सव, ग्रामपंचायत NOC व पोलीस विभागाची ऑनलाइन परवानगी, मिरवणूक मार्ग व वेळ, वाहतूक व्यवस्था, CCTV व स्वयंसेवकांची व्यवस्था, अग्निशमन व विद्युत सुरक्षा तसेच सोशल मीडियावरील अफवा व आक्षेपार्ह संदेशांबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. गणेशोत्सव शांततेत, उत्साहात व कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून साजरा करण्याबाबत उपस्थितांना आवाहन करण्यात आले.

## अग्रलेख

# ब्रिक्स : औचित्य आणि गरज

ब्रिक्सच्या ऐतिहासिक अशा द्विदिवसीय शिखर परिषदेला शनिवार, १२ सप्टेंबरपासून राजधानी दिल्लीतील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या भारत मंडपममध्ये प्रारंभ होत आहे. या परिषदेकडे ब्रिक्स देशांचेच नाही तर जगाचे लक्ष लागले आहे. चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग, रशियाचे राष्ट्रपती व्लादिमिर पुतिन यांच्यासह जवळपास डझनभर देशांचे राष्ट्रप्रमुख वा सरकारप्रमुख या परिषदेत सहभागी होणार आहेत. ब्रिक्सचे यजमानपद यंदा भारताकडे असल्यामुळे या परिषदेची अध्यक्षता पंतप्रधान नरेंद्र मोदी करणार आहेत. ही समस्त भारतीयांच्या दृष्टीने आनंदाची आणि अभिमानाची बाब म्हटली पाहिजे. अशा आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करण्याची संधी मिळणे म्हणजे जगात भारताचे महत्त्व आणि दबदबा वाढत असल्याचे द्योतक म्हटले पाहिजे.

चीन आणि रशिया या जगातील दोन महासत्तांच्या सहभागाने ब्रिक्सला महत्त्व आले, हे कोणाला नाकारता येणार नाही. त्यामुळे परिषदेनंतर ब्रिक्सचे संयुक्त घोषणापत्र काय म्हणते, याकडे सगळ्यांचे लक्ष लागणे स्वाभाविक म्हणावे लागेल. २० सप्टेंबर २००६ ला न्यू यॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या एका बैठकीत ब्रिकची स्थापना करण्यात आली होती. २०११ मध्ये दक्षिण आफ्रिकेचा यात समावेश झाला, त्यामुळे आतापर्यंत ब्रिक असलेल्या या संघटनेचे नाव 'ब्रिक्स' असे झाले. जानेवारी २०२४ मध्ये ब्रिक्सचा विस्तार करीत त्यात इजिप्त, इराण, सौदी अरब, इथिओपिया, इंडोनेशिया आणि संयुक्त अरब अमिरात या पाच देशांचा समावेश करण्यात आला. ब्रिक्सचा प्रवास आता ११ देशांपर्यंत पोहोचला आहे. याशिवाय क्युबा, युगांडा, थायलंड, बेलारूस, बोलिव्हिया, मलेशिया, नायजेरिया, व्हिएतनाम, कझाकिस्तान आणि उज्बेकिस्तान या आणखी १० भागीदार देशांना ब्रिक्समध्ये सामावून घेण्यात आले आहे. लवचीकपणा, नवाचार, सहकार्य आणि स्थिरतेसाठी विकास ही ब्रिक्स शिखर परिषदेची संकल्पना आहे. आज जगातील जवळपास अर्ध्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व ब्रिक्स करीत आहे. यावरून या परिषदेची जगातील व्याप्ती लक्षात येते. वैश्विक जीडीपीत ब्रिक्स देशांचा वाटा ४० टक्के आहे तर जागतिक व्यापारात ब्रिक्सचा हिस्सा २६ टक्के आहे. ब्रिक्स आता ग्लोबल साऊथचा आवाज बनत आहे. संयुक्त राष्ट्र तसेच विश्व बँक आणि आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीत काळानुरूप बदल करण्याची मागणी ब्रिक्स देशांकडून केली जात आहे. ब्रिक्सने आपल्या सदस्य देशांसाठी न्यू डेव्हलपमेंट बँक सुरू केली आहे.

गेल्या काही दिवसात जगातील भूराजकीय परिस्थिती वेगाने बदलत चालली आहे. या जगातील इतिहास आणि भूगोलही वेगाने बदलत आहे. या पृष्ठभूमीवर ब्रिक्ससारख्या संघटनेचे महत्त्व आणि आवश्यकता आणखी वाढते. ब्रिक्सचे महत्त्व वाढत असले, तरी त्याला जी-७ देशांची जागा घ्यायला आणखी बराच वेळ लागणार आहे. ब्रिक्स शिखर परिषदेचे यजमानपद यंदा भारताकडे आहे. या परिषदेचे आयोजन भारतात होण्याची ही चौथी वेळ. त्यामुळे या परिषदेच्या यशस्वीतेसाठी भारत गेल्या अनेक महिन्यांपासून काम करीत आहे. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून अशा जागतिक स्वरूपाच्या शिखर परिषदांचे आयोजन भारतात सुरू झाले आहे; त्यात जी-२० चा समावेश होता. भारत हा विश्वगुरू बनत असल्याचे म्हटले जाते, त्याचे हे प्रतीक मानायला हरकत नाही. रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू होऊन चार वर्षे झाली आहेत, पण हे युद्ध कधी संपेल हे कोणालाच सांगता येत नाही. दुसरीकडे ब्रिक्सचा सदस्य देश असलेल्या इराणवर अमेरिका आणि इस्रायल यांनी हल्ला केला आहे. मात्र, या दोन्ही मुद्यांवर ब्रिक्सला निश्चित अशी कोणती भूमिका घेता आली नाही. ब्रिक्सची रचना आणि त्याचे स्वरूपही याला कारणीभूत म्हटले पाहिजे. ब्रिक्समधील काही देशात लोकशाही आहे, काही देशात राजेशाही तर काही देशात हुकूमशाही आहे. यातील कोणत्याही मुद्यावर निश्चित अशी भूमिका घेणे ब्रिक्सला जड जाते. ब्रिक्समधील सदस्य देशांत वाद नाही, असे नाही. चीन आणि भारत या दोन देशांतील सीमावाद नेहमीच चर्चेचा तसेच दोन देशातील तणावाचा विषय राहिला आहे. सौदी अरब आणि संयुक्त अरब अमिरात या ब्रिक्सच्या दोन सदस्य देशातही गंभीर स्वरूपाचे मतभेद आहेत. ब्रिक्सला आपले महत्त्व वाढवायचे असेल तर आधी आपल्या सदस्य देशांमधील मतभेद आणि संघर्ष मिटवावे लागतील. ब्रिक्सच्या कोणत्याही एका सदस्य देशावर दुसऱ्या देशाचे आक्रमण होत असेल तर एकजुटीने त्या देशाच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका घ्यावी लागेल. सदस्य देशांमधील परस्पर विश्वास, सहकार्य आणि एकतेची भावना कमी पडत आहे.

वेगाने बदलत असलेल्या जागतिक परिस्थितीत आज संयुक्त राष्ट्र सारख्या संघटना कालबाह्य आणि निरुपयोगी ठरत आहेत. त्यांचे अस्तित्वही कोणाला जाणवत नाही. जगात सुरू असलेल्या एकाही संघर्षावर त्या संघटनेला आतापर्यंत कोणतीही ठाम भूमिका घेता आली नाही. युद्ध थांबवत जगात मोठ्या संख्येत होत असलेली प्राणहानी थांबवता आली नाही.

ब्रिक्सचे यावर्षीचे अध्यक्षपद भारताकडे असल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या मुद्यावर ठाम अशी भूमिका घेत भारत हा ग्लोबल साऊथचा आवाज होत असल्याचे दाखवून दिले आहे. युद्ध हे कोणत्याच समस्येचे समाधान नाही, त्यामुळे युद्ध संपवण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न केले पाहिजे, असे आवाहन मोदी यांनी केले आहे. युद्ध संपवण्याचा होणारा एक दिवसाचाही विलंब अधिक प्राणहानी घडवून आणतो आणि मोठ्या प्रमाणात नुकसान करतो, अशी भूमिका मोदी यांनी मांडली आहे. एकेकाळी जगात रशिया आणि अमेरिका अशा दोनच महाशक्ती होत्या. काळाच्या ओघात रशिया महाशक्ती राहिली नाही, पण अमेरिका महाशक्ती म्हणून कायम आहे, नव्हे जगातील एकमेव महासत्ता झाली आहे. रशिया महाशक्ती नसली, तरी जगातील रशियाची ताकद आणि महत्त्व कमी लेखता येणारे नाही. तर, चीन अतिशय वेगाने महाशक्ती म्हणून समोर येत आहे. रशिया हा नेहमीच भारताचा जुना आणि विश्वासू मित्र राहिला आहे. जेव्हा जेव्हा भारतावर संकट आले तेव्हा तेव्हा रशिया भारताच्या मदतीला धावून आला आहे, पण चीनने प्रत्येक वेळी भारताचा विश्वासघात केला आहे. एकदा तर चीनने भारतावर आक्रमणही केले होते. आज ब्रिक्समुळे चीनशी आपले संबंध पूर्वीसारखे तणावपूर्ण राहिले नसले, तरी चीन हा कधीच भारतासाठी विश्वासार्ह मित्र राहिला नाही आणि कोणत्या वेळी चीन काय करेल, हे सांगता येत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर परराष्ट्र धोरणाचे आपले संतुलन अतिशय चांगले राखले आहे. चीन, रशिया आणि अमेरिका या देशांची भारताला जेवढी गरज आहे, त्यापेक्षा जास्त गरज या तीन देशांना भारताची आहे, याकडे आपल्याला डोळेझाक करता येणार नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर एखादा देश तुमचा मित्र होऊ शकत नसेल तर तो किमान शत्रू होणार नाही, एखाद्याशी मतभेद झाले तरी तो तुमचे दीर्घकालीन नुकसान करणार नाही, याची काळजी घ्यावी लागते. मोदी यांच्या सरकारने गेल्या १२ वर्षांत अशी काळजी घेतली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यामुळे जी-२० देशांची शिखर परिषद असो की ब्रिक्स देशांची, भारताशिवाय जगातील अनेक देशांसमोर पर्याय नसतो. ब्रिक्स शिखर परिषदेमुळे जगात एका नव्या कालखंडाची सुरुवात होईल, यात शंका नाही. ब्रिक्स शिखर परिषदेतून आंतरराष्ट्रीय पातळीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नेतृत्व आणखी झळाळून निघेल आणि भारताचे महत्त्व वाढण्यासाठी ही शिखर परिषद मैलाचा टप्पा ठरेल, असा विश्वास आहे. ■

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# उत्सवाच्या उन्मादाची गोष्ट...

सावरकरी विचारांचे लेखक, साहित्यिक पु. भा. भावे लिखित 'ठरीव ठशाची गोष्ट' या पुस्तकात 'जोसेफ' नावाची एक गोष्ट आहे. वाचनाची सवय असेल तर भावेंची भाषा आजच्या जेन-झीलाही कळू शकेल इतकी ओघवती आहे. ही कथा सर्वांनीच वाचली पाहिजे; मात्र हिंदुत्ववादी मंडळींनी आणि उत्सवप्रिय हिंदूंनी तर वाचलीच पाहिजे. भावे हे हिंदुत्ववादी, सावरकरवादी लेखक होते. हा हिंदुत्ववादी लेखक स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात काय बदल घडला, हे या कथेच्या माध्यमातून आपल्याला सांगतो. आज हिंदूंच्या उत्सवांमध्ये जो उन्माद दिसून येतो. दहीहंडीला बायका नाचवल्या जातात, लावणीच्या नावाखाली गलिच्छ नृत्य केले जातात, गणेशोत्सवात कर्णकर्कश डीजे लावला जातो आणि धिंगाणा घातला जातो, हे असं का होतं? याचं उत्तर आपल्याला या 'जोसेफ' नावाच्या कथेत मिळतं. जोसेफ या कथेतील पात्र कलेक्टर बंगल्यावर चाकरी करतो. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यामुळे त्याचे मूळ मालक जॅक्सन साहेब आपल्या मायदेशी निघून गेले. मात्र जोसेफ तिथेच राहिला. जॅक्सन साहेब हे कडक शिस्तीचे, पण प्रेमळ माणूस. जोसेफमध्ये जी शिस्त आहे, ती जॅक्सनसाहेबांमुळेच आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि जॅक्सन साहेबांच्या जागी कावळे साहेब बंगल्यावर राहायला आले. कावळे साहेब माणूस म्हणून वाईट नाहीत. पण जॅक्सन साहेबांसारखा कुणावर धाक दाखवू शकत नाहीत आणि शिस्तही लावू शकत नाहीत. जॅक्सन गेले आणि कावळे आले. म्हणजे रुपक अर्थाने गोरे गेले आणि भारतीय आले. बरं कावळे साहेब आल्यानंतर बंगल्याचं चित्रच पालटतं. कावळे साहेबांच्या सासऱ्यांना सात-आठ वर्षांचा मुलगा आहे. तो खेळ म्हणून घंटा वाजवतो. जॅक्सन साहेब असताना ही हिंमत कुणीच करत नसे. घंटा ही नोकरांना बोलावण्यासाठीच वाजे. आता विशेष म्हणजे घंटा वाजली, ती गरज नसताना मुलांनी वाजवली असली तरी जोसेफने सगळी कामे बाजूला ठेवून धावत आले पाहिजे, असा सासऱ्यांचा आग्रह आहे. पूर्वी बंगल्यावर सगळे हळू आवाजात बोलत. आता बंगल्यावर नुसता आरडाओरडा होतो. ही मुलं बागेची नासधूस करतात, गवत, फुले उपटतात. सोफ्यावर घाणेरडी पावले घेऊन चढतात. बरं, समस्या केवळ मुलांमध्ये आहे का? तर नाही. मुलं ही मोठ्या माणसांचं अनुकरण करत असतात. कावळे साहेबांचे सासू-सासरे दोघेही आगाऊ. त्यांचाही प्रचंड त्रास. पूर्वी शिस्तीत वागणारा कारकून आता तंबाखू खाऊन कुठेही थुंकतो. मेजावर तंगड्या पसरवून बसतो. दाढी वाढवून येतो. कुणीही बंगल्यावर येऊन ओरडतो. अशा ओरडणाऱ्या लोकांसाठी भावे गमतीने 'देशभक्त' असा शब्द वापरतात. भावे लिहितात, 'पूर्वी कलेक्टरच्या बंगल्याच्या आसपास फिरण्याची छाती नसलेले एक देशभक्त आजकाल वारंवार कावळे साहेबांकडे येत व मोठमोठ्याने बोलत.' या गोष्टी जॅक्सन साहेब असताना होत नसत. जॅक्सन साहेबांनी सुरू केलेल्या धरणाचे काम थांबले आहे. त्यांच्या प्रामाणिक कुत्र्याची हाडं दिसू लागली आहेत. दगडाचे पूल कोसळत आहेत. या सर्व गोष्टींचा त्या प्रामाणिक चाकराला जोसेफला त्रास होतोय. या त्रासाचं वर्णन करताना भावे जोसेफच्या 'काळजावर कुऱ्हाडीचा घाव घातला' असं करतात. यातून या बेशिस्त वागण्याचा जोसेफ कंटाळाच नव्हे तर प्रचंड वैताग आलाय, हे दिसून येतं. शेवटी तो इतका वैतागतो की 'कृपा करा, कसेही करा, पण मला आपल्या देशात घेऊन जा' असं पत्र जॅक्सन साहेबांना लिहितो.

ही कथा खरोखर वाचली पाहिजे. विशेष म्हणजे हिंदू संस्कृतीवर श्रद्धा असणाऱ्या व्यक्तीने ही कथा लिहिली आहे, कुण्या सेक्युलरिस्टाने नव्हे. आज आपण जो उन्माद पाहतो, त्याचे सार आणि त्याचा अर्थ या कथेत दडला आहे. आपण स्वातंत्र्याचा अर्थ 'गलिच्छ वागणूक' असा घेतला आहे, असे दिसते. अगदी साधी गोष्ट पाहा ना, तुम्ही मुंबईच्या लोकलमध्ये विंडो सिटवर बसलाय आणि अचानक एक माणूस येतो नि खिडकीतून बाहेर पचकन थुंकतो. हे थुंकण्याचं स्वातंत्र्य आपल्याला हवं होतं म्हणून आपले महापुरुष फासावर लटकले होते काय? आज हिंदूंचे सार्वजनिक उत्सव-सण काढून पाहा. विशेषतः दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्री, होळी (होळीदेखील आता सार्वजनिकच झालीय) या उत्सवांमध्ये श्रद्धा कुठे दिसतेय तुम्हाला? श्रद्धा असेल तर ती जेवणात मिठाचं प्रमाण असतं तेवढीच. बाकी दिसतो तो उन्माद, वाह्यातपणा, अश्लीलता... याचं कारण आपल्याला स्वातंत्र्याचा अर्थ कळाला नाही. १९३० नंतर हिंदू नागरिकांच्या मनात पुरता गोंधळ निर्माण करण्यात आला. ज्या छत्रपतींचा आदर्श घेऊन अनेक वर्षे स्वातंत्र्याचा लढा सुरू होता, त्या छत्रपतींचा आदर्श राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आला नाही. काँग्रेस ही त्या काळची मोठी संघटना. त्यामुळे सुरुवातीचा दोष तिच्याकडे जातोच. मात्र आजचा हा उन्माद सर्वपक्षीय आहे. व्होट बँकेसाठी अनेक मंडळं चालवली जातात. स्थानिक गुंड-मवाल्यांना राजकीय आश्रय दिला जातो. पूर्वी उत्सवांचं नेतृत्व टिळक-सावरकर-आंबेडकर अशा विभूतींकडे असल्यामुळे आपल्याला त्यात देशभक्ती आणि सामाजिक समरसता दिसून यायची; आज नेतृत्व गल्लीछाप लोकांकडे गेल्याने हा उन्माद दिसून येतो. नेतृत्व बदलले आणि उत्सवांतील चांगला उद्देशही हरवला. नुसताच उद्देश नाही तर उत्सवांचे सुंदर स्वरूपही बदलले. अर्थात आजही अनेक लोक श्रद्धेने आणि सुसंस्कृतपणे उत्सव साजरे करत असतील; पण त्यांची संख्या खूपच कमी आहे. आज इतकी मंडळे झाली आहेत, ज्यांची आवश्यकताच नाही. दडीहंडीला रस्त्यांवर हेल्मेट न घालता मुद्दाम कर्णकर्कश हॉर्न वाजवत जाणारी मुलं पाहिली, वेड लागायची पाळी येईल असा डीजेचा आवाज ऐकला, उत्सवांमध्ये बायका नाचताना पाहिल्या आणि थिल्लर गाणी गणपती बाप्पाच्या कानात वाजवताना पाहिली की, आपणही 'जोसेफ' झालो आहोत असे वाटते. जोसेफ त्याच्या मालकाला पत्र लिहून त्याच्या देशात घेऊन जाण्याची विनंती तरी करू शकतो. पण हा पर्याय आपल्याकडे नाही. हा उन्माद कसा थांबवायचा याचं उत्तरही आपल्याकडे नाही. आपण मनःस्ताप करून घेण्यापलीकडे अथवा या उन्मादाचे साक्षीदार होण्यापलीकडे काहीही म्हणजे काहीही करू शकत नाही, असं जेव्हा आपल्याला कळतं, तेव्हा सर्व थोर महापुरुषांना हात जोडून विचारावसं वाटतं की, 'अहो महापुरुषांनो, का दिलेत आम्हाला स्वातंत्र्य?' ■

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**निशिकान्त मायी**

# निसर्गराजा ऐक सांगतो... !

प्रत्येक क्षेत्रात आज मानवाने हनुमान उडी घेतली आहे. अनेक शिखरे पादाक्रांत केली आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आमूलाग्र बदल घडविला आहे. अगदी अवकाश संशोधनापासून आताच्या एआयपर्यंत आणि वैद्यकशास्त्रापासून डिजिटल युगापर्यंत सर्वच ठिकाणी झेप घेतली असली आहे. मानवाने एवढी दिव्य प्रगती केली असली, तरी निसर्गावर मात्र अद्यापही तो मात करू शकला नाही. पर्यावरणाचे संतुलन धोक्यात येण्यासाठी मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड, वाढते प्रदूषण, पाण्याची कमतरता, जमिनीचा होणारा ऱ्हास, दिवसागणिक होणारा हवामानातील बदल हे सारे घटक कारणीभूत ठरले आहेत. पृथ्वीवरील मानवाचे अस्तित्व निसर्गाशिवाय अशक्य आहे. आपल्याला निसर्गाकडून शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, सुपीक जमीन, अन्नधान्य, औषधी वनस्पती, जंगलातील संसाधने आणि अनुकूल हवामान मिळत असते. मात्र, विकासाच्या नावाखाली आपण संसाधनांचा अमर्याद वापर करून जगासमोर मोठे संकट उभे करीत आहोत. पृथ्वीचे वाढते तापमान, बेभरवशाचा पाऊस, वाढता उष्मा, अतिवृष्टी, दुष्काळ आदींचे परिणाम जसे मानवावर होत आहेत, तसेच ते शेतीवरही मोठ्या प्रमाणात होत असून कृषिप्रधान देशात शेती उत्पादनच धोक्यात आले आहे. भाजीपासून भातापर्यंतचे भाव गगनाला भिडले आहेत. एकूणच महागाई हातघाईवर आलेली आहे.

खरं तर पर्यावरणीय संतुलनात महत्त्वाची भूमिका बजावणारे जंगल असंतुलित होत असल्याने पावसाचे चक्र दुभंगले आहे. अन्नसुरक्षा, रोजगार आणि अर्थव्यवस्था विस्कळीत झाली आहे. वृक्षतोडीवर जर नियंत्रण आणले तर स्थानिक प्रजातींचे संवर्धन आणि जंगलांचे पुनरुज्जीवन करणे सोयीचे होणार आहे. केवळ वृक्षारोपणाचे कार्यक्रम घेऊन काही होणार नाही; प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता आहे. नागरिकांनी स्वतःहून वृक्षांची काळजी घेऊन वृक्षप्रजातींना प्रोत्साहन द्यायला हवे. सोबतच पाण्याचे संरक्षण हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. मर्यादित असलेला पाण्याचा साठा गोड्या पाण्यासाठी अमर्याद करणे काळाची गरज आहे. वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरविणे, जलसंधारणाची कामे करणे, पारंपरिक जलस्रोत पुनरुज्जीवित करणे आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे हे मानवी हितासाठी हितावह ठरणारे आहे. पाणी हे जीवन आहे ही जाणीव प्रत्येक मनात रुजली पाहिजे. दिवसेंदिवस गंभीर होत असलेले प्रदूषणाचे संकटही आव्हान ठरत आहे. वाहनांची वाढती संख्या, बांधकामांमुळे निर्माण होणारी धूळ आणि कचऱ्याचे अयोग्य नियोजन यामुळे हवा प्रदूषित होत आहे. प्लॅस्टिक कचरा साचून राहत आहे. यासाठी शासनाने कठोर होऊन अंमलबजावणीला चालना द्यावी व नागरिकांनीही प्लॅस्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे आणि पुनर्वापराला प्रोत्साहन देणे निसर्ग वाचविण्यासाठी मदतगार ठरणार आहे. पर्यावरण संवर्धनासाठी प्राण्यांचा नैसर्गिक अधिवास जपणे आणि धोक्यात आलेली प्रजाती, वन्यजीवांचे संरक्षण करायलाच पाहिजे.

मानवाने डिजिटल युगात तसेच विज्ञानात प्रगती केली असली, तरी सर्व जबाबदारी केवळ सरकारवर सोडून भागणार नाही. नागरिकांनीही आपली भूमिका लक्षात घ्यायला हवी. वाहतुकीच्या नियमांसोबतच पर्यावरणाचे संरक्षण करणे तसेच निसर्ग वाचविण्यासाठी सामूहिक प्रयत्न समाजजीवनातून होणे ही नैसर्गिक गरज आपण लक्षात घ्यायला हवी. निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न होऊ नये. निसर्ग जोपासला जावा. शाळांमधून याबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती व्हायला हवी. विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातून पर्यावरण, निसर्ग जपण्याचे, प्रदूषणाची माहिती देण्याऐवजी प्रत्यक्ष कृतीतून त्याचे महत्त्व समजावून सांगितले पाहिजे. विद्यार्थ्यांनी जलसंधारण, वृक्षसंवर्धन, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, प्लॅस्टिकमुक्त परिसर आणि जैवविविधता आदी विषयांवर उपक्रम राबविण्यासाठी आपल्या शाळा व्यवस्थापनाला उद्युक्त करायला पाहिजे. कारण आजचा विद्यार्थी हा उद्याचा नागरिक आहे. निसर्ग जपणुकीविषयीची संवेदनशीलता त्यांच्याही अंगात भिनायला हवी. लक्षात घ्या, आज आपल्याकडे नैसर्गिक संपत्ती अमाप आहे. मात्र तिचा वापर बेलगाम केला, निसर्गाचे नुकसान केले तर भविष्यातील पिढ्यांना त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात थोडाफार बदल केला तर निश्चितच सामूहिकरीत्या मोठा बदल आपण घडवू शकतो. ■

९८८११ ५२४३९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# स्वार्थाची गुलामी आणि राजकीय बेईमानी

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर सध्या सिद्धांतांपेक्षा सोयीला, मूल्यांपेक्षा मतपेढीला आणि आचारांपेक्षा लांगूलचालनाला ज्या बेधडकपणे प्राधान्य दिले जात आहे, ते पाहून कोणत्याही सुजाण नागरिकाच्या मनात संतापाचा डोंब उसळणे अटळ आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे उबाठा सेनेचे युवा नेते आदित्य ठाकरे यांनी गरबा प्रवेशाच्या निमित्ताने केलेले ताजे वक्तव्य. आगामी नवरात्रोत्सवाच्या पृष्ठभूमीवर विश्व हिंदू परिषदेने गरबा आणि दांडियाच्या आयोजकांना एक आवाहन केले. उत्सवाचे धार्मिक पावित्र्य टिकावे, प्रांगणातील सुरक्षितता अबाधित आणि कोणत्याही अप्रिय घटना घडू नयेत, यासाठी गरबा मंडपात येणाऱ्या प्रत्येकाचे ओळखपत्र तपासले जावे, त्याच्या कपाळावर टिळा लावला जावा आणि गैरहिंदूंना, विशेषतः धार्मिक भावना नसलेल्या तत्त्वांना तिथे प्रवेश देण्याबाबत काळजी घेतली जावी, असा एक अत्यंत स्वाभाविक विचार व्हीएचपीने मांडला. हा काही राज्य सरकारचा कायदा नव्हता किंवा कोणताही अध्यादेश नव्हता; एका हिंदू संघटनेने श्रद्धाळू भगिनींच्या सुरक्षेसाठी आयोजकांना दिलेला तो एक मैत्रीपूर्ण सल्ला होता. परंतु, या आवाहनावर प्रतिक्रिया देताना आदित्य ठाकरेंनी ज्या प्रकारे टाहो फोडला, ते पाहून अवघा महाराष्ट्र अचंबित झाला आहे. गरबा असो वा गणेशोत्सव, मुंबईत राहणारा प्रत्येक जण हा 'मुंबईकर' असतो; तिथे जात, धर्म, प्रांत किंवा भाषा पाहिली नाही. त्यामुळे मुस्लिमांना गरब्यात बंदी घालणे चुकीचे आणि निषेधार्ह आहे, असा तथाकथित सर्वसमावेशकतेचा जावईशोध आदित्य ठाकरे आणि त्यांच्या वडिलांनी लावला.

आदित्य, उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पक्षाच्या राजकीय इतिहासाची पाने उलटून तर त्यांच्या तोंडी असणारा 'मुंबईकर' हा शब्द किती पोकळ आणि राजकीयदृष्ट्या सोयीचा आहे, हे क्षणात स्पष्ट होते. काही महिन्यांपूर्वी जेव्हा मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर होत्या, तेव्हा याच उबाठा पक्षाला कोणता मुद्दा आठवला होता? तेव्हा त्यांनी अत्यंत जाणीवपूर्वक हिंदी विरुद्ध मराठी असा बनावट, विषारी आणि हिंसक वाद पेटवला होता. राज्य शाळांमध्ये तिसरी भाषा म्हणून हिंदीचा पर्याय उपलब्ध करून देणारा एक जीआर जारी झाला, ज्या निर्णयाला मंजुरीदेखील हे स्वतः मुख्यमंत्री असताना त्यांनीच दिली होती. चिथावणीखोर विधाने करून मुंबईचे वातावरण गढूळ केले गेले. इतक्यावरच हे थांबले नाही, तर उबाठाच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून निष्पाप हिंदी भाषिक दुकानदारांना, रिक्षाचालकांना, फेरीवाल्यांना आणि हातावर पोट असणाऱ्या मजुरांना गाठून मारहाण केली. ज्याच्या तोंडून अस्खलित मराठी उमटत नव्हती, त्याची कॉलर पकडणे, त्याला धमकावणे, त्याची गचांडी धरून त्याला विचारणे हेच यांचे तथाकथित मराठी प्रेम होते. त्यावेळी उत्तर भारतातून, बिहारमधून, मध्य प्रदेशातून आलेल्या प्रामाणिक नागरिकांना विरोध करताना उद्धव आणि आदित्य ठाकरेंची ही 'मुंबईकर' भावना कुठे गवत चरायला गेली होती? आज जेव्हा गरब्यात मुस्लिमांच्या प्रवेशाचा मुद्दा येतो, तुम्हाला 'आपण सगळे एक आहोत, आपण सगळे मुंबईकर आहोत' या उथळ तत्त्वज्ञानाच्या मेख आठवतात का? जेव्हा मराठी आणि उत्तर भारतीय यांच्यात फूट पाडून मराठी मते लाटायची असतात, तेव्हा उत्तर भारतीयांचा द्वेष पसरवायचा; जेव्हा मुस्लिम मतपेढीला चुचकारायचे असते, तेव्हा 'सर्वधर्मसमभावाचा' आणि 'सर्वसमावेशक मुंबईकरत्वाचा' झेंडा फडकवायचा. हा सोयीचा बाजार आता उघडा तर पडलाच आहे. तरीदेखील आता यांचा समूळ बाजार उठवायची वेळ आली आहे.

विश्व हिंदू परिषदेने नवरात्रोत्सवात गरबा आयोजकांना जे आवाहन केले, त्यामागे एक अत्यंत गंभीर सामाजिक आणि सुरक्षेची पृष्ठभूमी आहे. नवरात्र हा काही निव्वळ मौजमजेचा, नाचण्या-गाण्याचा किंवा करमणुकीचा इव्हेंट नाही. नवरात्रोत्सव हा जगदंबेचा, दुर्गेचा, अंबामातेचा महान उपासना पर्व आहे. ती हिंदू धर्मातील स्त्रीशक्तीच्या पूजनाची, पावित्र्याची आणि भक्तीची श्रेष्ठ परंपरा आहे. गेल्या काही वर्षांत देशभरातील गरबा प्रांगणांमध्ये घडलेल्या घटनांचा तटस्थपणे अभ्यास केला, तर असे दिसून येते की, काही विशिष्ट विकृत मनोवृत्तीचे तरुण आपली खरी ओळख लपवून, बनावट नावे सांगून या पवित्र कार्यक्रमांमध्ये प्रवेश करतात. धार्मिक श्रद्धेशी किंवा मातेच्या पूजेशी त्यांना कसलेही देणेघेणे नसते. त्यांचा हेतू केवळ उपद्रव माजवणे, हिंदू महिलांची छेडछाड करणे आणि 'लव्ह जिहाद'सारख्या अपप्रवृत्तींना खतपाणी घालणे हाच राहिलेला आहे.

या पृष्ठभूमीवर जर एखाद्या हिंदू संघटनेने आयोजकांना विनंती केली की, तुमच्या कार्यक्रमात येणाऱ्या प्रत्येकाची ओळख तपासा, त्याच्या कपाळावर टिळा असू द्या, तर त्यात गैर ते काय? हा काही शासनाचा कायदा नाही, पण आयोजकांनी स्वतःच्या आणि सहभागी होणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसाठी घेतलेली ती एक रास्त खबरदारी आहे. पण, या आवाहनामुळे मिरच्या कोणाला झोंबल्या? ज्यांना स्वतःला निधर्मी म्हणवून घ्यायचे आहे, पण ज्यांची नजर केवळ मुस्लिम व्होटबँकेवर खिळलेली आहे, अशा राजकीय नेत्यांना!

आदित्य ठाकरे आणि व्हीएचपीच्या आवाहनाला विरोध करणाऱ्या तथाकथित निधर्मी नेत्यांना एक रोकडा आणि अत्यंत महत्त्वाचा प्रश्न विचारणे आवश्यक आहे. जर तुम्हाला वाटत असेल की, गरबा हा एक सांस्कृतिक उत्सव आहे आणि त्यात मुस्लिमांना प्रवेश मिळालाच पाहिजे, तर हा अधिकार केवळ मुस्लिम पुरुषांपुरताच का मर्यादित असावा? महिलांनी, मुलींनी, आई-बहिणींनीसुद्धा गरब्याच्या मैदानात उतरून दांडिया खेळायला हवा, अशी भूमिका आदित्य ठाकरे का घेत नाहीत? गरबा हा असा उत्सव आहे जिथे हिंदू घरातील पुरुष, महिला, तरुण, वृद्ध सगळे एकत्र येऊन, पारंपरिक पोशाख परिधान करून भक्तिभावाने नृत्य करतात. तिथे स्त्री आणि पुरुष असा कोणताही भेदभाव नसतो. पण, जेव्हा गरब्यातील प्रवेशाचा मुद्दा येतो, तेव्हा मैदानात फक्त आणि फक्त मुस्लिम तरुणच का दिसतात? त्यांच्या घरातील महिलांना आणि मुलींना बुरख्याच्या आणि हिजाबच्या साखळदंडात डांबून ठेवायचे, त्यांना संगीताला आणि नृत्याला परवानगी द्यायची नाही; आणि स्वतः मात्र हिंदूंच्या पोरी जिथे खेळतात, तिथे जाऊन नाचायचे! हा कसला समभाव? हा कसला संस्कृतीचा आदर? जर उबाठा आणि त्यांचे समर्थक खरोखरच समानतेचे पुरस्कर्ते असतील, तर त्यांनी मुस्लिम समाजातील या पुरुषसत्ताक कट्टरतेला आव्हान दिले पाहिजे. त्यांनी उघडपणे सांगितले पाहिजे की, जर मुस्लिमांनी गरब्यात यायचे असेल, तर त्यांनी त्यांच्या कुटुंबातील महिलांना, बहिणींना आणि मुलींना सोबत घेऊन यावे. त्यांनीही हिंदू महिलांसोबत मनमोकळेपणाने गरबा खेळावा. अशी भूमिका घेण्याची धमक उद्धव, आदित्य ठाकरे या बापलेकांमध्ये आहे का? अहो ठाकरे, 'मुस्लिम महिलांनाही गरब्यात आणा!' असे आवाहन करा ना... तुम्ही ते करणार नाही. कारण तसे बोललात, तर तुमच्या मागे उभे राहिलेले कट्टरपंथी मुल्ला-मौलवी भडकतील आणि तुमची मते निघून जातील. म्हणजे हिंदूंच्या धार्मिक कार्यक्रमात मुस्लिम पुरुषांच्या प्रवेशासाठी बोंबाबोंब करायची; मुस्लिम महिलांच्या स्वातंत्र्यावर मात्र मौन बाळगायचे! हा प्रकार स्वार्थाची गुलामी आणि राजकीय बेईमानी आहे. ■

९२७०३३३८८६

### डीजेबंदी हवीच, पण राजकारण नको

गणेशोत्सव जवळ आला की डीजे, ध्वनी प्रदूषण आणि बंदीचा मुद्दा पुन्हा चर्चेत येतो. उत्सवाचा आनंद साजरा



करण्याचा अधिकार मंडळांना आहे; त्याचवेळी नागरिकांच्या शांततेचा अधिकारही महत्त्वाचा आहे. प्रश्न डीजेचा कमी आणि नियमांच्या समान अंमलबजावणीचा जास्त आहे. गणेशोत्सव असो, दहीहंडी असो, लग्न असो किंवा राजकीय सभा ध्वनिप्रदूषणाचे नियम सर्वांसाठी समान असले पाहिजेत. नियम मोडणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे; मात्र कारवाई करताना राजकीय दबाव, पक्षीय भूमिका किंवा भेदभावाला जागा नसावी. डीजेबंदी कराच, पण त्यासाठी धर्माचा किंवा राजकारणाचा मुद्दा बनवू नका. मंडळांनीच उत्सवाचा जल्लोष करताना वृद्ध, लहान मुले, रुग्ण आणि विद्यार्थ्यांचा विचार करावा. प्रशासनाने स्पष्ट नियम, निश्चित वेळ आणि ध्वनी मर्यादा जाहीर करून त्यांची कठोर अंमलबजावणी करावी. राजकारणासाठी आवाज वाढवण्यापेक्षा नियमांसाठी आवाज उठवला, तरच गणेशोत्सव खऱ्या अर्थाने आदर्श ठरेल.

**सचिन नागरे**/किनगाव जट्टू, ९६०४३२१४३२

■■■

### प्रवासी गाडी पुन्हा सुरू करा

अकोला हे एक महत्त्वाचे रेल्वे जंक्शन आहे, तरीही अनेक लांब पल्ल्याच्या सुपरफास्ट गाड्या येथे थांबत नाहीत. अकोला रेल्वे स्थानकावर खालील गाड्यांना दोन मिनिटांचा थांबा देण्याची प्रवाशांची दीर्घकाळापासूनची मागणी आहे- १२९९३/१२९९४ गांधीधाम-पुरी सुपरफास्ट एक्सप्रेस, २२८६५/२२८६६ एलटीटी-पुरी सुपरफास्ट एक्सप्रेस, २२८२७/२२८२८ सुरत-पुरी सुपरफास्ट एक्सप्रेस या गाड्यांच्या थांब्यामुळे विदर्भातून ओडिशा, गुजरात आणि मुंबईला जाणाऱ्या हजारो प्रवाशांना थेट कनेक्टिव्हिटी मिळेल, ज्यामुळे वेळ आणि पैसा या दोन्हींची बचत होईल. कोविड-१९ महामारीमुळे बंद असलेली नागपूर-भुसावळ-नागपूर प्रवासी गाडी पुन्हा सुरू करावी. ही गाडी रोज प्रवास करणारे प्रवासी, विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी अत्यंत उपयुक्त होती. जर नागपूरहून रेल्वेसेवा शक्य नसेल, तर अजनी-भुसावळ-अजनी मेमू ट्रेन सुरू करावी, ज्याला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळेल. अशी आशा आहे की, रेल्वे विभाग जनहितासाठी या मागणीवर लवकरच सकारात्मक निर्णय घेईल.

**राजेश कारिया**/अकोला

■■■

## वाचक पत्रे

### स्क्रीनच्या पलीकडचे जग

आजच्या तंत्रज्ञानाच्या आणि वेगाने बदलणाऱ्या युगात मानवी जीवन अतिशय सोपे व जलद झाले आहे. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून संपूर्ण जग एका क्लिकवर उपलब्ध आहे. मात्र, या सोयीसुविधांच्या आणि डिजिटल क्रांतीच्या मागे एक भीषण वास्तव दडलेले आहे- आजची तरुण पिढी नकळतपणे या स्क्रीनच्या जगात अडकत चालली आहे आणि स्वतःपासून तसेच समाजापासून दुरावत आहे. सोशल मीडियावरील 'लाईक्स', 'कमेंट्स' आणि सतत येणाऱ्या नोटिफिकेशन्स'च्या माऱ्यामुळे तरुण मनांवर एक अनामिक ताण निर्माण होत आहे. स्क्रोलिंगच्या या न संपणाऱ्या चक्रात माणसाला स्वतःशी संवाद साधायलाही वेळ उरलेला नाही. आभासी जगातील इतरांचे झगमगाटी आयुष्य पाहून स्वतःची तुलना करणे आणि त्यातून मानसिक अस्वस्थता ओढवून घेणे, हे आजच्या तरुणाईसमोरील मोठे आव्हान बनले आहे. आपण तंत्रज्ञानाद्वारे जगाशी तर जोडले गेलो आहोत, पण प्रत्यक्ष आयुष्यातील माणसे, निसर्ग आणि स्वतःचे अंतर्मन यांच्यापासून दूर जात आहोत. तेव्हा मानसिक शांतता, स्पष्टता आणि आत्मपरीक्षणासाठी 'डिजिटल डिटॉक्स' ही आज काळाची गरज बनली आहे. आठवड्यातून किंवा महिन्यातून किमान एक दिवस सोशल मीडिया आणि मोबाईलपासून पूर्णपणे दूर राहण्याचा संकल्प करायला हवा. पुस्तकांचे वाचन, डायरी लेखन, ध्यान-धारणा किंवा निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवल्यास अंतर्मनाचा खरा आवाज ऐकू येईल. यामुळे खरा आनंद आणि समाधान स्क्रीनच्या आत नसून आपल्या आत आहे, याची जाणीव व्हायला लागेल. डिजिटल डिटॉक्सचा हेतू केवळ मोबाईल बंद ठेवण्यापुरता मर्यादित नसून, त्यातून मिळणाऱ्या वेळेचा वापर सामाजिक हितासाठी करणे हा अपेक्षित आहे. प्रत्यक्ष आयुष्यात माणसे जोडण्याचा प्रयत्न करावा. समाजकार्याकरिता समाजात उतरून लोकांच्या अडचणी समजून घ्या आणि एकमेकांना मदतीचा हात द्या, वृद्धाश्रमात सेवा देणे, गरजू मुलांना मोफत शिकवणे, वृक्षारोपण करणे किंवा परिसर स्वच्छ ठेवणे अशा उदात्त कार्यात, उपक्रमात स्वतःला गुंतवा. सोशल मीडियाचा उपयोग केवळ मनोरंजनासाठी न करता समाजप्रबोधन, पर्यावरण संवर्धन आणि सकारात्मक विचारांचा प्रसार करण्यासाठी करा. तंत्रज्ञान हे मानवाच्या सोयीसाठी बनवले गेले आहे; माणसाने तंत्रज्ञानाचा गुलाम होता कामा नये. ■

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ‘चलो मुंबई’च्या पार्श्वभूमीवर मराठा सेवकांची आज तातडीची बैठक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ सप्टेंबर : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी ‘चलो मुंबई’ची हाक दिल्यानंतर लातूर जिल्ह्यातील हजारो मराठा बांधव मुंबईकडे जाण्याच्या तयारीत आहेत. या पार्श्र्वभूमीवर मुंबई दौऱ्याचे नियोजन आणि पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी जिल्ह्यातील मराठा सेवकांची तातडीची बैठक रविवारी (१३) औसा रोड येथील शासकीय विश्रामगृहात दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

मुंबईकडे जाणाऱ्या मराठा बांधवांची संख्या, प्रवासाचे नियोजन, वाहन व्यवस्था तसेच आंदोलनाच्या अनुषंगाने करावयाच्या तयारीबाबत बैठकीत चर्चा होणार आहे. जिल्ह्यातील मराठा सेवकांनी बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## विविध वृत्त.....

## महसूल लोक अदालतचे ३० सप्टेंबर रोजी आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १२ सप्टेंबर : राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये जमिनींशी संबंधित व इतर प्रलंबित असलेले विविध महसुली दावे व अपीले सामंजस्याने व कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी लातूर जिल्ह्यात येत्या ३० सप्टेंबर २०२६ रोजी महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या मार्गदर्शनानुसार अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा वकील मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसोबत पूर्वतयारी बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीस उपजिल्हाधिकारी (भूसंपादन समन्वय) श्रीमती संगिता टकले, विधी अधिकारी ड. वर्षा खोडसे यांच्यासह जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड. शिवकुमार जाधव, उपाध्यक्ष ड. लहु चामे, सचिव ड. गुरुप्रसाद येरटे व सहसचिव ड. सिद्धेश्र्वर धायगुडे उपस्थित होते. या अभियानात जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी व पक्षकारांनी आणि विधिज्ञांनी सहभागी होऊन आपले दीर्घकाळ प्रलंबित महसुली वाद तडजोडीने संपवावेत, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी श्रीमती करमरकर यांनी यावेळी केली.

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून तसेच त्यांच्या सामाजिक न्याय व शेतकरी कल्याणाच्या मूळ विचारांना स्मरून हे अभियान राज्यभरात राबविण्यात येत आहे. महसुली दाव्यांमध्ये एका स्तरावर निकाल लागल्यानंतर निकाल विरोधात लागलेले पक्षकार वरिष्ठ न्यायालयात अपील किंवा पुनरीक्षण अर्ज दाखल करतात, ज्यामुळे हे दावे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. विधी सेवा प्राधिकरणाच्या लोक अदालतीच्या धर्तीवर महसुली न्यायालयात प्रलंबित दावे दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने व कायदेशीर तडजोडीने निकाली काढल्यास अर्धन्यायिक यंत्रणेवरील ताण कमी होऊन नागरिकांची मोठी बचत होणार आहे. या अभियानांतर्गत दर तीन महिन्यांतून एकदा मंडळ अधिकारी ते जिल्हाधिकारी अशा सर्व स्तरांवर लोक अदालतीचे नियमित आयोजन केले जाणार आहे.

# वाह रे वाह.. ! एसआयटीची कार्यपध्दतीही संशयाच्या भोवऱ्यात ?

# एका रात्रीत शिक्षण संचालकांनी तपासल्या पाच हजार फाईल्स.. !

तभा वृत्तसेवा / **श्रीधर स्वामी**

लातूर, दि. १२ सप्टेंबर : शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता बनावट शालार्थ आयडी प्रकरणाची कसून चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने एसआयटीची स्थापना केली आहे. एसआयटीची स्थापना करण्यात आल्याने शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार पुरता उजेडात येईल,अशी शक्यता व्यक्त करण्यात येत होती. परंतु, आता शासनाने नेमलेल्या एसआयटीची कार्यपध्दतीहीसंशयाच्या भोवऱ्यात सापडल्याचेनिदर्शनास येत आहे. लातूर विभागाच्या दौऱ्यावर आलेल्या शिक्षण संचालकांनी एका रात्रीत धाराशिव येथे तब्बल पाच हजार फाईल्स तपासल्या असून त्या योग्य आहेत म्हणून स्वाक्षऱ्या केल्याची धक्कादायक माहिती आहे. एका रात्रीत शिक्षण विभागातील शेकडो कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराच्या फाईल्स तपासणे कसे शक्य आहे ? असा प्रश्र्न कोणाहीसुजाण शिक्षण प्रेमी नागरिकाला पडू शकतो.शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना हाताशी धरून राज्यभरातील संस्था चालकांनी शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बनावट कागदपत्रांच्या मदतीने नियुक्त्या, वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडी घोटाळा केला आहे. राज्यभरातील भ्रष्टाचाराचा आकडा हजारो कोटींच्या घरात जाण्याची शक्यता आहे. किंबहुना हा त्यापेक्षाही मोठा घोटाळा असल्याने विद्यमान सरकारने या घोटाळ्याच्या कसून चौकशीसाठी एसआयटीचीस्थापना केली आहे. या एसआयटीला आपला तपास पूर्ण करण्यासाठी नुकतीच शासनाने कालमर्यादाहीवाढवून दिली आहे. एसआयटीच्या तपासात तरीशिक्षण विभागातील हजारो कोटींचा घोटाळा पुरता उजेडात येऊन दोषी संस्था चालक, शिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कार्यवाही होईल,असा अंदाज वर्तवला जात होता. काही मग्रूर संस्था चालक या घोटाळ्याच्या चौकशीसाठी एसआयटी नेमण्यात आल्याचे समजताच खाजगीतबोलताना एसआयटीहीआपल्याला काहीचकरू शकणार नाही,अशा उद्धट प्रतिक्रिया व्यक्त करत असल्याचे पाहण्यात आले होते. म्हणजे संस्था चालक भ्रष्ट कारभारात एवढे निगरगट्ट झालेले आहेत, की पैशाच्या बळावर आपण काहीही करू शकतो, या अविर्भावात वावरत




असतात.लातूर शिक्षण विभागातवैयक्तिक मान्यता आणि बनावट शालार्थ आयडीची अनेक प्रकरणे आहेत. लातूर शिक्षण विभागातएसआयटीच्या या चौकशीपेक्षाहीअधिक भयंकर प्रकरणे अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. संबंधित संस्था चालक आणि शिक्षण विभागातील तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांची मिलिभगत असल्यामुळे आतापर्यंत कोणत्याही प्रकरणावर ठोस निर्णय होऊ शकलेला नाही. एसआयटीचे पथक लातूर शिक्षण विभागात दाखल झाल्यानंतर भ्रष्ट संस्था चालकांचे धाबे तेवढ्यापुरते दणाणल्याचे दिसून आले. तक्रारी असलेल्या अनेक फाईल्स धावाधाव करून एकत्रित करण्यात आल्या. काही संस्था चालकांची एसआयटी पथकाने चौकशीही केली. चौकशी दरम्यान अधिकाऱ्यांसमोर नम्रतेचा आव आणून उभारलेले संस्था चालक तेथून बाहेर आल्यानंतर पुन्हा पहिल्याच मस्ती आणि तोऱ्यात दिसून आले. तेव्हाचअनेकांच्या मनात एसआयटीच्या चौकशीबद्दल संशयाचे दाट धुके निर्माण झाल्याचेदृष्टीपथास आले.

एसआयटी पथकाच्या विविध ठिकाणच्या कार्यवाहीबद्दल प्रसार माध्यमांकडून साशंकता व्यक्त केली जात आहेच. छत्रपती संभाजीनगरमध्येएसआयटी पथकाची बडदास्त अगदी पंचतारांकित केली गेल्याचे सचित्रवृत्त प्रसिद्धहीझाले आहे. असाच काहीसा प्रकार एसआयटीच्या लातूर शिक्षण विभागाच्या दौऱ्यात घडला आहे. एसआयटीचेपथक धाराशिव मध्ये असताना एका रात्रीत शिक्षण संचालकांनी तब्बल पाच हजार फाईल्स तपासल्या आणि त्या योग्य असल्याचा निर्वाळा देत त्यावर स्वाक्षऱ्या केल्याचीविश्र्वसनीय माहिती आहे. विशेष म्हणजे, आता अशा प्रकरणाची एक एक फाईल्स काळजीपूर्वक बघायला किमान एका तास किंबहुना त्याहूनही अधिक वेळ लागू शकतो. मात्र, रात्रीतून हजारो फाईल्स स्वाक्षऱ्या करुन हातावेगळ्या करणे म्हणजे संस्था चालक आणि संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्यासारखाचहा प्रकार आहे की काय ? असा संशय आता व्यक्त केला जात आहे. शासनाने शिक्षण विभागातील भ्रष्टाचार मुळापासून उखडून टाकण्याच्याउद्देशाने स्थापन केलेली एसआयटीच अशा पद्धतीने कार्यरत असेल तर शासनाचा उद्देश कदापि पूर्णत्वास जाणार नाही, अशा संतप्त भावना आता शिक्षण प्रेमींतून ऐकायला मिळत आहेत. एसआयटीतील सर्व सक्षम अधिकाऱ्यांनी चौकशी दरम्यान नागरिकांच्या मनात संशयाचे मळभ निर्माण होणार नाही व मुळात या प्रकरणात जे वास्तव दोषी आहेत, ते कितीही मोठे अधिकारी, संस्था चालक असलेले पदाधिकारी मग ते कितीही मोठे राजकीय नेते असले तरी त्यांच्यावर कठोर कार्यवाही करावी,अशी मागणी वाढीस लागली आहे. या बाबींचा एसआयटी प्रमुखांसह सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी अग्रक्रमाने विचार करून आपला तपास सुरु ठेवावा. याकामी शासनाने वाढवून दिलेलीमुदतहीकमी वाटत असेल तर ती पुन्हा वाढवून देण्याची मागणी करावी, पण अशा घिसाडघाईत या प्रकरणाचा निपटारा करण्याचा प्रयत्न करू नये,अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

## विशेष शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद; दोन दिवसांत १४२ अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १२ सप्टेंबर : जिल्ह्यातील पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र मिळणे अधिक सुलभ व जलद व्हावे, या उद्देशाने लातूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर संबंधित तलाठी, ग्रामसेवक आणि मंडळ अधिकारी यांच्या संयुक्त पथकांद्वारे विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या मोहिमेच्या पहिल्या दोन दिवसांत, म्हणजेच १० आणि ११ सप्टेंबर २०२६ रोजी संपूर्ण जिल्ह्यात एकूण २१ विशेष शिबिरांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरांमध्ये नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण १४२ अर्ज प्राप्त झाले आहेत, अशी माहिती या अभियानाच्या जिल्हास्तरीय नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांनी केले आहे.

तालुकानिहाय आकडेवारीनुसार, लातूर तालुक्यात ६ शिबिरांच्या माध्यमातून सर्वाधिक ११८ अर्ज प्राप्त झाले आहेत. रेणापूर तालुक्यात २ शिबिरांमध्ये १४ अर्ज प्राप्त झाले, निलंगा तालुक्यात ४ शिबिरांमध्ये ५ अर्ज प्राप्त झाले आहेत.

# लातुरात एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आक्रोश मोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

लातूर , दि. १२ सप्टेंबर : एमपीएससीच्या माध्यमातूनस्पर्धा परीक्षा देऊन आपले उज्वल भवितव्य घडविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना मध्यंतरी औषध निरीक्षक पदाच्या पेपरफुटीने मानसिक धक्का बसला. अन्न व औषध प्रशासन पेपरफुटी ही केवळ एक समोर आलेली घटना असून अशा प्रकारे आयोगाच्या इतर परीक्षांमध्येही घोटाळे होत असल्याच्या निषेधार्थ लातुरात शुक्रवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय असा भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आ. रोहित पवार यांनी केले.एमपीएससी स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतात. आपल्या घरापासून , परिवारापासून दूर राहतात. अनेक अडचणींचा सामना करत विद्यार्थी या परीक्षेची दिवसरात्र तयारी करत असतात. त्यातच




पेपर फुटीसारख्या अशा घटना विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण करतात. एवढा अभ्यास करूनही आपल्या पदरात काहीच पडत नाही, ही भावना त्यांच्यात नकारात्मकता निर्माण करून जात आहे. या बाबीचा निषेध करण्यासाठी स्पर्धा परीक्षा शिक्षक संघटना आणि स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वतीने या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्षाव सचिवांचा राजीनामा घेऊन त्यांची उच्चस्तरीय चौकशी करावी, गट ब परीक्षेच्या बाबतीत जे काही आक्षेप असतील त्यावर आठ दिवसांच्या आता एमपीएससीने स्पष्टीकरण द्यावे व काही गैर प्रकार झाला आहे का ? याची चौकशी करावी, राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५, कृषी सेवा परीक्षा यांचयासारख्या वर्णनात्मक पेपर तपासणीत मानवी चुका निदर्शनास येत आहेत, त्याची चौकशी करावी, मुंबई क्राईम ब्रँचने आयोगाला सुपूर्द केलेला प्राथमिक चौकशी अहवाल सार्वजनिक करण्यात यावा, आरोपी अवर सचिव अभिजित लेंडवे हे गोपनीय कक्षात कार्यरत असताना त्यांच्या कार्यकाळात झालेल्या सर्व एमपीएससी परीक्षांचे स्वतंत्र फॉरेन्सिक ऑडिट करण्यात यावे, तपासाची विश्र्वासार्हता टिकविण्यासाठी तपासातील महत्वाच्या घडामोडी आणि निष्कर्ष वेळोवेळी सार्वजनिक करण्यात यावेत, एमपीएससी च्या सर्व परीक्षांचे शुल्क शंभर रुपये आकारण्यात यावेत,अशा विद्यार्थ्यांच्या मागण्या आहेत.या आक्रोश मोर्चाने तमाम लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले.

## पीक परिस्थितीची पाहणी करण्यासाठी सहकार मंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १२ सप्टेंबर : चाकूर तालुक्यातील हिंपळनेर परिसरातील खरीप पीक परिस्थितीची सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांकडून पिकांबाबत माहिती घेतली.

यावेळी उपविभागीय अधीकारी मंजुषा लटपटे,तहसीलदार नरसिंग जाधव, गटविकास अधिकारी संतोष माने, तालुका कृषी अधिकारी शिवचंद्रपाल जाधव, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, सभापती प्रतिनिधी मच्छिंद्र नागरगोजे, उपसभापती भुजंग शिंदे, जिल्हा परिषद सदस्य भानुदास पोटे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक यशवंत जाधव, राहुल सुरवसे, पंचायत समिती गटनेते गजानन होनराव, प्रतीक केदार, संजय गांधीचे अध्यक्ष सिद्धेश्र्वर अंकलकोटे, गणपत कवठे,शिवदर्शन स्वामी, पपन कांबळे, बाळासाहेब पाटील, नितीन पाटील, बाळू पवार, मनोज पाटील, विश्र्वनाथ पाटील, नाथा मद्रेवार, विवेक शिंदे, गणेश पाटील, संदीप शेटे, श्रीनाथ सावंत, डी.के.कासले, बिलाल पठाण, अनिल वाडकर, सचिन तोरे, आदित्य लवटे यांच्यासह संबंधित शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या पाहणी दौऱ्यादरम्यान सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जात त्यांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली आणि कृषी विभागाच्या उपस्थित अधिकाऱ्यांनाकडून चाकूर तालुक्यातील पीक परिस्थितीची माहिती घेतली. नैसर्गिक संकटामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांनी काळजी करू नये, राज्य सरकार संपूर्ण संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे शेतकऱ्यांना ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## स्व. कांताप्रसाद राठी यांच्या स्मरणार्थ कुटुंबियांची श्रीकिशन सोमाणी शाळेच्या बालवाडीला देणगी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ सप्टेंबर : येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचलित श्रीकिशन सोमाणी शाळेच्या बालवाडीच्या विकासासाठी शाळेचे संस्थापक सदस्य स्व. कांताप्रसाद राठी यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र डॉ. अनिल राठी यांनी देणगी दिल्याबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी राठी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा हृद्य सत्कार केला.

याप्रसंगी श्रीमती अयोध्यादेवी कांताप्रसाद राठी, डॉ. अनिल राठी, नंदकिशोर राठी, रमेश राठी, सुनील राठी,मनिष राठी, सौ. मधू राठी यांच्यासह कुटुंबातील सर्व सदस्य उपस्थित होते. सर्वांचा अभिनव मानव विकास संस्थेच्या वतीने अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, उपाध्यक्ष सीए प्रकाश कासट , विवेक रेड्डी, कोषाध्यक्ष जयेश बजाज, सहसचिव सुभाष कासले , डॉ. हरिप्रसाद सोमाणी, व्यंकट गर्जे, रमेश भुतडा, रामप्रसाद राठी, हुकूमचंद कलंत्री, सूर्यकांत कर्वा , दिलीप माने, संजीव भार्गव, एड. लक्ष्मीकांत सोमाणी, डॉ. ओमप्रकाश भोसले, डॉ. सुरेश भट्टड, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी सत्कार केला. यावेळी बोलताना कमलकिशोर अग्रवाल यांनी श्रीकिशन सोमाणी शाळेच्या उभारणीसाठी स्व. कांताप्रसादजी राठी यांनी दिलेल्या अतुलनिय योगदानाचे स्मरण करून त्यांचे या संस्थेप्रती असलेले प्रेम शब्दात व्यक्त करता येणार नाही,असे सांगितले. तत्पश्र्चातही राठी कुटुंबियांकडून संस्थेला केल्या जात असलेल्या सहकार्याबद्दल संस्थेच्या वतीने आपण अंतःकरणपूर्वक ऋण व्यक्त करत असल्याचे अग्रवाल यांनी नमूद केले. राठी कुटुंबियांनी दिलेल्या या आर्थिक देणगीतून बालवाडीचा सर्वंकष विकास केला जाणार आहे.

## राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष पाटील यांचा अपघाती मृत्यू



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १२ सप्टेंबर : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी तहसील कार्यालयात निवेदन देऊन परतत असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विठ्ठलराव पाटील यांचा भीषण मोटारसायकल अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. तहसील कार्यालयाजवळील आरी मोड-शिरूर अनंतपाळ रस्त्यावर हा अपघात झाला. अपघाताची तीव्रता एवढी होती की, विठ्ठलराव पाटील यांची जागीच प्राणज्योत मालवली.

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. हे निवेदन देऊन विठ्ठलराव पाटील मोटारसायकलवरून परतत होते. याचदरम्यान तहसील कार्यालयाजवळील आरी मोड-शिरूर अनंतपाळ रस्त्यावर त्यांच्या मोटारसायकलचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला.

विठ्ठलराव पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष म्हणून सक्रियपणे कार्यरत होते. राजकीय क्षेत्रासोबतच सामाजिक प्रश्र्नांमध्येही त्यांचा सक्रिय सहभाग होता. लढा आरक्षणाचा याबद्दल त्यांच्या डोक्यात नेहमीच विचारांचे वादळ असायचे या प्रसंगी त्यांच्या डोक्यात याच आरक्षण विषयक लढ्याचे टेन्शन असलेले दिसून येत होते असे त्यांच्या चहात्याकडून माहिती प्राप्त झाली मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी निवेदन देऊन परतत असतानाच त्यांच्यावर काळाने घाला घातल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## लातूर जिल्ह्यावर दुष्काळाचे संकट; पक्ष बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र यावे : निलंगेकर



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ सप्टेंबर : जिल्ह्यात दुष्काळजन्य परिस्थिती नसून आता थेट दुष्काळाचे संकट निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील १४५ प्रकल्प मृतसाठ्यात गेले असून, उपलब्ध असलेले पाणी भविष्यातील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन राखीव ठेवण्यात यावे, अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. या मागणीच्या अनुषंगाने शासनाने आवश्यक पावले उचलण्यास सुरुवात केली असल्याची माहिती भाजप आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.

लातूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्ह्यातील सध्याच्या दुष्काळी परिस्थितीवर त्यांनी चिंता व्यक्त केली. पावसाअभावी खरीप हंगाम पूर्णपणे संकटात सापडला असून, विशेषतः सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक भागांत सोयाबीन पीक पूर्णपणे वाळून गेले असून शेतकऱ्यांच्या हातातून खरीप हंगाम निघून गेला आहे. या नुकसानीचे पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत मिळावी यासाठी शासन सकारात्मक असल्याचे निलंगेकर यांनी सांगितले.

जिल्ह्यातील जलसाठ्यांची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. अनेक प्रकल्पांमध्ये पाणीसाठा अत्यल्प राहिल्याने आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्र्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे नियोजन करताना सर्वप्रथम पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, लातूर आणि धाराशिव जिल्ह्याला भविष्यात शाश्र्वत पाण्याची उपलब्धता करून देण्यासाठी वॉटर ग्रीड प्रकल्पाचे काम सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली. या प्रकल्पामुळे भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना होण्यास मदत होईल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

दुष्काळाचे संकट हे कोणत्याही एका पक्षाचे किंवा व्यक्तीचे नसून संपूर्ण जिल्ह्याचे संकट आहे. त्यामुळे या काळात राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र येणे गरजेचे आहे. शेतकरी, नागरिक आणि जिल्ह्याच्या हितासाठी सर्व लोकप्रतिनिधी एकत्रितपणे प्रयत्न करून लातूर जिल्ह्याला या दुष्काळाच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी काम करणार असल्याचे संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले.

## 'शेतकरी मेळावा अपडेट

### चरस, एमडी ड्रग्ज विक्रीप्रकरणी तरुणास अटक

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील खंडोबा बाजार रस्त्यावरील मराठवाडा हायस्कूल परिसरात चरस व एमडी पावडर या अंमली पदार्थांची विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या तरुणास नानलपेठ पोलिसांनी गुरुवारी (दि. १०) ताब्यात घेतले. या कारवाईत ७.२० ग्रॅम एमडी पावडर, चरस, चिलीम, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, स्कूटी व मोबाईल असा एकूण १ लाख ७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी तिघांविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस नाईक संतोष सानप यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, खंडोबा बाजार रस्त्यावरील मराठवाडा हायस्कूल परिसरात अंमली पदार्थांची विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून गुरुवारी दुपारी पोलिसांनी सापळा रचला. यावेळी मोहम्मद अन्वर मोहम्मद यासीन (वय २५, रा. सुभेदारनगर, दर्गारोड, परभणी) यास ताब्यात घेण्यात आले. पंचांसमक्ष केलेल्या झडतीत त्याच्याकडून ७.२० ग्रॅम एमडी पावडर, चरस, चिलीम, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, होंडा कंपनीची स्कूटी आणि टेक्नो कंपनीचा मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी अंमली पदार्थांबाबत चौकशी केली असता, हे पदार्थ नशेसाठी वापरत असून विक्रीसाठी शेख शोएब शेख गौस (रा. इरमगल्ली, पारवागेट, परभणी) आणि शेख गौस (रा. सुभेदारनगर, कौडगावगेट, परभणी) यांच्याकडून घेतल्याचे आरोपीने सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्यावरून मोहम्मद अन्वर मोहम्मद यासीन, शेख शोएब शेख गौस आणि शेख गौस या तिघांविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २०(ब) (क) आणि २१(ब) अन्वये नानलपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन राजगुरू करीत आहेत.

### घरकुलाच्या थकीत रकमेसाठी खळी येथील लाभार्थ्यांचे जलसमाधी आंदोलन

**परभणी,/प्रतिनिधी :** गंगाखेड तालुक्यातील खळी येथील अनेक लाभार्थींनी घरकुलाचे बांधकाम पूर्ण करून संबंधित विभागाकडे काम पूर्ण झाल्याचे पुरावे सादर केले आहेत. मात्र, त्यानंतरही घरकुलाची थकीत रक्कम देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप करीत लाभार्थींनी शुक्रवारी (दि. ११) गोदावरी नदीपात्रात जलसमाधी आंदोलन केले.

या आंदोलनाचे नेतृत्व किसान सभेचे जिल्हा सेक्रेटरी ओंकार पवार यांनी केले. आंदोलनात विजय सोन्नर, उमाजी जाधव, तुकाराम पवार, ज्ञानदेव पवार, दादाराव राठोड, लक्ष्मण जाधव, बापूराव पवार, उत्तम हरिश्चंद्र पवार, विष्णू राठोड, आंतराम जाधव आदी लाभार्थी सहभागी झाले होते. घरकुलाचे काम पूर्ण झाल्यानंतरही प्रलंबित अनुदान मिळत नसल्याने लाभार्थींमध्ये नाराजी असून, प्रशासनाने तातडीने दखल घेऊन थकीत रक्कम अदा करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### पावसाच्या खंडाने खरीप पिके संकटात; परभणीत कोरडा दुष्काळ जाहीर करा : शेतकरी कामगार पक्षाची मागणी : जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** पावसाने मोठा खंड दिल्याने जिल्ह्यातील खरीप पिके संकटात सापडली असून, शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे परभणी जिल्ह्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून दुष्काळी पूरक योजना लागू कराव्यात, अशी मागणी भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष भाई कीर्तिकुमार बुरांडे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

पावसाअभावी सोयाबीन, कापूस, ऊस आदी पिकांना मोठा फटका बसत असून, पिकांना आवश्यक पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. पावसाचा खंड आणखी कायम राहिल्यास पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने परिस्थितीची तातडीने दखल घेऊन दुष्काळी उपाययोजना सुरू कराव्यात, अशी मागणी पक्षाने केली आहे. जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून पूरक योजना लागू कराव्यात, तातडीची मदत म्हणून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी, मागील वर्षी जाहीर केलेला पीकविमा तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा तसेच संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचे नियोजन करावे, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.

प्रशासनाने केवळ पंचनाम्यांपुरते मर्यादित न राहता शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळेल, अशा उपाययोजना तातडीने राबवाव्यात, असेही पक्षाच्या वतीने नमूद करण्यात आले आहे. निवेदनावर भाई कीर्तिकुमार बुरांडे, भाई पंढरीनाथ मुळे, भाई रामराज महाडिक, नामदेव लोखंडे, अंबरीबुवा पुरी, मनोहर काळे, भागवत आळसे, कुंडलिक भिसे, रामेश्वर जाधव, विश्वनाथ मगर, भीमाशंकर खंदारे, नागोराव मोरे, जफ्रुल्ला पठाण, शिवाजी कदम, उमेश महाडिक आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### दसरा, दिवाळी, छठ पूजेनिमित्त विशेष रेल्वेगाड्यांना मुदतवाढ : नांदेड-तिरुचानुरसह जालना-तिरुपती विशेष गाड्यांच्या अतिरिक्त फेऱ्या; सणासुदीच्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर निर्णय

परभणी,दि.११(प्रतिनिधी) : दसरा, दिवाळी आणि छठ पूजेच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने ट्रेन ऑन डिमांड (टीओडी) विशेष रेल्वेगाड्यांच्या फेऱ्यांना मुदतवाढ दिली आहे. या विशेष गाड्या १.३ पट भाड्याने, सध्याची डब्यांची रचना, देखभाल व्यवस्था, वेळापत्रक आणि थांबे कायम ठेवून धावणार आहेत. गाडी क्रमांक ०७८१४ जालना-तिरुपती विशेष रेल्वेची २४ सप्टेंबर रोजी शेवटची अधिसूचित फेरी होती. आता या गाडीला १ ऑक्टोबर ते २६ नोव्हेंबरदरम्यान आणखी नऊ फेऱ्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. ही गाडी १, ८, १५, २२, २९ ऑक्टोबर तसेच ५, १२, १९ आणि २६ नोव्हेंबर रोजी जालना येथून सुटेल. परतीची गाडी क्रमांक ०७८१५ तिरुपती-जालना विशेष रेल्वे २ ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबरदरम्यान नऊ अतिरिक्त फ ऱ्या करणार असून, ती २, ९, १६, २३, ३० ऑक्टोबर तसेच ६, १३, २० आणि २७ नोव्हेंबर रोजी तिरुपती येथून सुटेल. गाडी क्रमांक ०७६०३ हुजूर साहिब नांदेड-तिरुचानुर विशेष रेल्वेला २४ नोव्हेंबरपर्यंत आठ अतिरिक्त फेऱ्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. ही गाडी ६, १३, २०, २७ ऑक्टोबर तसेच ३, १०, १७ आणि २४ नोव्हेंबर रोजी नांदेड येथून सुटेल. तर गाडी क्रमांक ०७६०४ तिरुचानुर-हुजूर साहिब नांदेड विशेष रेल्वे ७ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबरदरम्यान आठ अतिरिक्त फेऱ्या करणार असून, ती ७, १४, २१, २८ ऑक्टोबर तसेच ४, ११, १८ आणि २५ नोव्हेंबर रोजी तिरुचानुर येथून सुटेल, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली. दरम्यान, या विशेष रेल्वेगाड्यांच्या फेऱ्यांना मुदतवाढ मिळाल्याने दसरा, दिवाळी आणि छठ पूजा काळात प्रवाशांना अतिरिक्त प्रवास सुविधा उपलब्ध होणार असून, सणासुदीच्या वाढती गर्दी कमी करण्यास मदत होणार आहे.

# दुष्काळाच्या छायेत महादेवाला साकडे महिलांनी केली महादेव कोंडण्याची प्रथा पाऊस पडू दे बळीराजाला वाचव अशी भावनिक प्रार्थना

**मानवत,/प्रतिनिधी:-** मानवत शहरासह परिसरात पावसाने दडी मारल्याने शेतीपिके अडचणीत आली असून दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकरी कुटुंबांच्या व्यथा आता देवाच्या दारी पोहोचल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर मानवत शहरातील श्री खंडेश्वर महादेव मंदिरात महिलांनी पारंपरिक महादेव कोंडण्याची प्रथा पार पाडत महादेवाला साकडे घातले.

महिलांनी महादेवाच्या पिंडीवर पाणी भरून देवा आता तरी पाऊस पडू दे बळीराजाच्या शेतात हिरवाई येऊ दे पिकांना जीवदान मिळू दे अशी प्रार्थना केली. जुन्या परंपरेला उजाळा देत करण्यात आलेल्या या प्रार्थनेत महिलांनी पावसासाठी मनोभावे महादेवाचा धावा केला.

एकीकडे आभाळाकडे डोळे लावून बसलेला शेतकरी आणि दुसरीकडे पावसासाठी देवाच्या चरणी साकडे घालणाऱ्या महिला असे चित्र यावेळी पाहायला मिळाले. देवा पाऊस दे सरकारनेही शेतकऱ्यांच्या मदतीला धावून यावे अशी अपेक्षा शेतकरी व नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पावसाअभावी शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले असून शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही नागरिकांमधून होत आहे. देवाकडे साकडे आणि सरकारकडे मदतीची हाक आता बळीराजाला केवळ पावसाच्या थेंबांचीच नव्हे, तर शासनाच्या मदतीचीही आस लागली आहे.





## पावसासाठी ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज व दुआ

**पूर्णा,/प्रतिनिधी-** दडी मारलेल्या पावसामुळे शेतकरी चिंतेत असून खरीप पिकांवर दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. पाऊस पडावा आणि शेतकरी व नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी शुक्रवारी (दि. ११) दुपारी ईदगाह मैदानावर मुस्लिम समाजातर्फे सामूहिक नमाज व विशेष दुआ करण्यात आली.

जामा मस्जिदचे इमाम शमीम अहमद रिजवी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या सामूहिक प्रार्थनेत मुस्लिम समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी अल्लाहकडे वरुणराजाची कृपा व्हावी आणि सर्वत्र पाऊस पडावा, अशी विनवणी करण्यात आली.

दरम्यान, शनिवारी सकाळी ९ वाजता ईदगाह मैदानावर पुन्हा सामूहिक नमाज व दुआ आयोजित करण्यात आली होती यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.







**सार्वजनिक बांधकाम मंत्री मा.ना. श्री.शिवेंद्रराजे भोसले यांना मुंबई मंत्रालय येथे सुधारित कामाचे निवेदन देतांना राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री आदरणीय सौ.मेघना साकोरे बोर्डीकर समवेत सुनिल भोंबे पाटील.**

### परभणीत रिमझिम पावसाच्या सरी

**परभणी,/प्रतिनिधी-** शहरात दुपारी १२ वाजल्यापासून रिमझिम अशा पावसाच्या सरी आल्या असून या पावसामुळे अनेकांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

परभणीत गेल्या एक महिन्यापासून पावसाचा खंड पडला होता.त्यामुळे येत्या काही दिवसांत पाऊस पडणार असे वाटत असतांना या पावसामुळे अनेकजणांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी बळीराजाला मोठया पावसाचीगरज आहे.

## परभणी जिल्हयातील रखडलेल्या विकासकामांबाबत उबाठाकडून तहसीलदारांना निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी-** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून व मराठवाड्याचा विकास अनुशेष भरून काढण्यासाठी विविध सरकारांच्या काळात छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकांमध्ये परभणी जिल्ह्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण विकासकामांच्या घोषणा करण्यात आल्या होत्या. मात्र, बऱ्याच वर्षांचा काळ लोटूनही यातील अनेक कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत, काही कामे कागदावरच असून काही प्रगतीपथावर आहेत.

यामुळे परभणी जिल्ह्यातील जनतेला घोषणांचा प्रत्यक्ष लाभ कधी मिळणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मराठवाड्याचा विकास, तुम से ना हो पायेगा या घोषवाक्याखाली १ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत



मराठवाडाव्यापी जनआंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनाद्वारे विविध सरकारांनी केलेल्या विकासाच्या घोषणांपैकी किती कामे पूर्ण झाली, किती कामे सुरू आहेत आणि किती कामे अद्याप रखडली आहेत, याची वस्तुस्थितीदर्शक शिदोरी जनतेसमोर मांडण्यात येत आहे. प्रमुख मागण्या व घोषणा . पाथरी येथील श्री साईबाबा तीर्थक्षेत्र विकास आराखडा. . परभणी जिल्हा क्रीडा संकुलासाठी कृषी विभागाची जागा. . परभणी जिल्हा क्रीडा संकुलाचे आधुनिकीकरण. सोनपेठ व पालम येथे कस्तूरबा गांधी बालिका विद्यालय. जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प, बंधारे व पाणीपुरवठा योजनांचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करणे. जिंतूर तालुक्यातील रखडलेले रस्ते, पूल व पायभूत सुविधांची कामे सत्वर पूर्ण करणे. जिंतूर तालुक्यात दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार मदत द्यावी, संपूर्ण वसुली थांबावी, सरमजेट कर्जमाफी करावी, शैक्षणिक शुल्क माफ करावे, या मागण्यांचा समावेश आहे. तरी परभणी जिल्ह्यातील वरील सर्व रखडलेल्या विकासकामांना तातडीने प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देऊन ती कामे वेळेत पूर्ण करावीत, अन्यथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. हे निवेदन जिंतूरचे तहसीलदार यांना देण्यात आले असून यावेळी गंगाप्रसाद घुगे (सह संपर्क जिंतूर), भारत पवार (उप जिल्हा प्रमुख परभणी), किरण देशमुख (ता. प्रमुख जिंतूर), अरविंद कटार (शहर प्रमुख जिंतूर), रितेश पाडे (ता. प्रमुख जिंतूर / बोरी गट), कताराव धानोकर (शहर संघटक जिंतूर) व मुरली मस्के (उपतालुका प्रमुख) परमेश्वर ठोंबरे कैलास गायकवाड गजानन पायगनआदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिंतूर, येलदरी, सावळी, इटोली, पोखर्णी, पाचेगाव असा मार्ग वळवा- सांगळे

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील रस्ते विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या जिंतूरयेलदरीसेनगाव मंजूर रस्त्याऐवजी जिंतूरयेलदर ीसावळीइटोलीपोखर्णीपाचेगाव असा मार्ग वळविण्यात यावा, अशी मागणी पंचायत समिती सदस्य सौ. रंजना बालाजी सांगळे यांनी पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या मागणीसंदर्भात देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिंतूरयेलदरीसेनगाव या रस्त्याचे काम मंजूर झालेले असून, या रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. मात्र, सदर रस्त्याचा मार्ग बदलून ि जतूरयेलदरीसावळीइटोलीपोख र्णीपाचेगाव या मार्गाने नेल्यास या भागातील अनेक गावांना त्याचा थेट लाभ मिळू शकतो.



सध्या या परिसरातील नागरिकांना दळणवळणासाठी विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्याचा मार्ग अधिक गावांना जोडणारा केल्यास ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था सुधारण्याबरोबरच नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होईल, असा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. अनेक गावांना मिळणार थेट फायदा जिंतूरयेलदरीसावळीइटोलीपोख र्णीपाचेगाव असा मार्ग केल्यास या मार्गावरील गावांना मुख्य रस्त्याशी जोडणी मिळेल. त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांना प्रवासासाठी अधिक सोयीचा मार्ग उपलब्ध होईल. ग्रामीण भागातील बाजारपेठ, शिक्षण, आरोग्य व इतर आवश्यक सेवांपर्यंत पोहोचणेही सुलभ होण्याची शक्यता आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्याची गरज असून, ओढा रोड ते सेनगाव असा नवीन रस्ता निर्माण झाल्यास जिंतूर शहरातून होणारी अनावश्यक वाहतूक कमी होऊन शहरातील वाहतूक व रहदारीच्या समस्यांवरही काही प्रमाणात तोडगा निघू शकतो. त्यामुळे मंजूर झालेल्या जिंतूरयेलदरीसेनगाव रस्त्याचा मार्ग जिंतूरयेलदरीसावळीइटोलीपोखण ीपाचेगाव असा वळविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. पालकमंत्र्यांकडून सकारात्मक निर्णयाची अपेक्षा या मागणीमुळे संबंधित गावांतील नागरिकांना चांगल्या रस्ते सुविधेचा लाभ मिळण्यास मदत होईल. त्यामुळे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी या मागणीची दखल घेऊन संबंधित विभागाला आवश्यक निर्दे श द्यावेत, अशी अपेक्षा निवेदनकर्त्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, जिंतूर तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते व दळणवळणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, या पर्यायी मार्गाच्या मागणीवर शासन व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काय निर्णय घेतला जातो, याकडे संबंधित गावांतील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## विश्व

डॉ. विष्णू अरविंद

# अमेरिकेतील परिसीमन



अमेरिकेत २०२६ च्या मध्यावधी निवडणुकांपूर्वी १० राज्यांनी त्यांच्या काँग्रेसच्या सीमा बदलून दशकाच्या मध्यभागी पुनर्वितरणाचा असामान्यपणे मोठा अभ्यास पाहिला आहे. या घडामोडींनी अमेरिकन राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी निवडणूक मतदारसंघांचे रेखांकन आणि पुनर्रचना केली आहे; कारण राज्ये प्रतिनिधीगृहात प्रतिनिधित्वाचा आकार बदलू पाहत आहेत.

अमेरिकेत प्रक्रिया सामान्यतः पुनर्वितरण म्हणून ओळखली जाते. सामान्य प्रणाली अंतर्गत दहा वार्षिक जनगणनेनंतर दर १० वर्षांनी एकदा काँग्रेसचे जिल्हे पुन्हा रेखाटले जातात. सध्याचे चक्र मात्र त्या पॅटर्नपासून झपाट्याने दूर गेले आहे. राज्य विधानमंडळांच्या नॅशनल कॉन्फरन्सनुसार, २०२५ च्या उन्हाळ्यापासून १० राज्यांनी त्यांचे काँग्रेसचे नकाशे बदलले आहेतः अलाबामा, कॅलिफोर्निया, फ्लोरिडा, लुझियाना, मिसूरी, नॉर्थ कॅरोलिना, ओहायो, टेनेसी, टेक्सास आणि यूटा.

यूएस जनगणना ब्युरोने स्वतंत्रपणे पुष्टी केली आहे की, १२० व्या काँग्रेससाठी काँग्रेसच्या जिल्हा योजना या १० राज्यांनी सादर केल्या होत्या. त्याच्या रेकॉर्डमध्ये अलाबामा, कॅलिफोर्निया, फ्लोरिडा, लुझियाना, मिसूरी, नॉर्थ कॅरोलिना, ओहायो, टेनेसी, टेक्सास आणि उटाहसाठी नवीन जिल्हा योजनांचा समावेश आहे.

पुनर्वितरण मोहिमेचे महत्त्वपूर्ण राजकीय परिणाम आहेत. रॉयटर्सच्या विश्लेषणात असे आढळून आले की, रिपब्लिकनने नवीन नकाशांद्वारे १६ काँग्रेसच्या जिल्ह्यांमध्ये त्यांच्या संभावनांमध्ये सुधारणा केली आहे, तर डेमोक्रॅट्सना सहा नव्याने तयार केलेल्या जिल्ह्यांमध्ये फायदा झाला आहे. त्यामुळे एकूण बदल रिपब्लिकनना मोठा निवडणूक फायदा देतात.

बदल रिपब्लिकन-नियंत्रित राज्यांपुरते मर्यादित नाहीत. कॅलिफोर्नियाने देखील आपला काँग्रेसचा नकाशा पुन्हा तयार केला, ज्यामुळे लोकशाहीचा फायदा झाला. हे स्पष्ट करते की, पुनर्वितरणाची लढाई एका व्यापक राजकीय स्पर्धेमध्ये विकसित झाली आहे, ज्यात दोन्ही पक्ष त्यांच्याकडे राजकीय क्षमता असलेल्या राज्यांमध्ये निवडणूक सीमा तयार करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

टेक्सास, फ्लोरिडा, नॉर्थ कॅरोलिना, ओहायो, टेनेसी, अलाबामा आणि इतर रिपब्लिकन नेतृत्वाखालील राज्यांनी काँग्रेसमधील पक्षाची स्थिती मजबूत करण्यासाठी डिझाईन केलेल्या नकाशांचा पाठपुरावा केला आहे. त्याच वेळी कॅलिफोर्नियाचे रीड्राईंग दाखवते की, डेमोक्रॅट्सनी अधिक प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी पुनर्वितरण प्रक्रिया देखील वापरली आहे. २०२६ च्या मध्यावधी निवडणुकांमध्ये मतदार मतदानाला जाण्यापूर्वी काँग्रेसचे मतदारसंघ कसे कॉन्फिगर केले जावेत, यावरील राष्ट्रीय स्पर्धा आहे. या प्रक्रियेमुळे मोठ्या कायदेशीर लढायाही निर्माण झाल्या आहेत. मिसूरी हे सर्वांत स्पष्ट उदाहरणांपैकी एक बनले आहे. रिपब्लिकन-समर्थित राज्य विधानसभेने नवीन काँग्रेस नकाशा मंजूर केला, ज्यामुळे पक्षाला अतिरिक्त सभागृहाची जागा मिळू शकेल. तथापि, मिसूरी सर्वोच्च न्यायालयाने ३ सप्टेंबर रोजी निर्णय दिला की, मतदारांनी सार्वमतांमध्ये त्यांना मान्यता दिल्याशिवाय नवीन सीमांचा वापर केला जाऊ शकत नाही.

त्यानंतर मिसूरी वाद आणखीच गुंतागुंतीचा झाला. ८ सप्टेंबर रोजी अमेरिकन सुप्रीम कोर्टाने रिपब्लिकनने काढलेला नकाशा पुनर्संचयित करण्यास नकार दिला, तर फेडरल जिल्हा न्यायाधीशांनी स्वतंत्रपणे एक आदेश जारी केला, ज्यात मिसूरीला नोव्हेंबर २०२६ च्या मध्यावधी निवडणुकांसाठी नवीन सीमा वापरण्याची आवश्यकता होती. विरोधाभासी निर्णयांमुळे अनिश्चितता निर्माण झाली आहे की, राज्याच्या निवडणुकीवर काँग्रेसचा कोणता नकाशा अंतिमतः शासन करेल.

विवाद असूनही व्यापक चित्र स्पष्ट आहे की, अमेरिकेमधील निवडणुकीच्या सीमा पारंपारिक जनगणनेच्या वेळापत्रकाच्या बाहेर सक्रियपणे पुन्हा तयार केल्या जात आहेत. १०-राज्यांच्या अभ्यासातून असे दिसून येते की, जेव्हा राज्ये त्यांच्या निवडणूक जिल्ह्यांची रचना बदलण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा काँग्रेसचे प्रतिनिधित्व महत्त्वपूर्ण राजकीय आणि कायदेशीर चर्चेचा विषय बनू शकते.

अमेरिकन नोव्हेंबर २०२६ च्या मध्यावधी निवडणुकांची तयारी करीत असताना, नवीन नकाशे थेट ज्या जिल्ह्यांमध्ये उमेदवार स्पर्धा करतात आणि ज्या मतदारसंघांचे ते प्रतिनिधित्व करू इच्छितात त्यावर प्रभाव टाकतील. विलक्षण व्यापक पुनर्वितरण व्यायामामुळे २०२६ च्या अमेरिकन मध्यावधी निवडणूक चक्राच्या परिभाषित संस्थात्मक लढाईंपैकी एक निवडणूक सीमा रेखाटण्यात आली आहे.

(ऑर्गनायझरवरून साभार)

---

## दखल

लेफ्टनंट शिवम अहलावत

# पाच पिढ्या, एक रेजिमेंट, १४० वर्षांची सेवा



अहलावत कुटुंब भारतीय लष्कराच्या इतिहासात एक असा अध्याय जोडणार आहे, जो पिढ्यानपिढ्या एक उदाहरण राहील. एकाच प्रतिष्ठित घोडदळ रेजिमेंट १ हॉर्स (स्किनर्स हॉर्स) मध्ये कार्यरत असलेल्या अधिकार्यांच्या सलग पाच पिढ्यांची परंपरा आता नव्या पिढीत दाखल होत आहे. कुटुंबातील पाचव्या पिढीतील लेफ्टनंट शिवम अहलावत यांना ५ सप्टेंबर रोजी स्किनर्स हॉर्समध्ये कमिशन मिळेल.

सुमारे १४० वर्षांच्या देशसेवेच्या या लष्करी परंपरेत अहलावत कुटुंबाच्या पाच पिढ्यांनी युद्धे, मोहिमा आणि आव्हानात्मक परिस्थितीत आपली जबाबदारी पार पाडली आहे. हा क्रम लेफ्टनंट शिवचंद अहलावत (१८८६-१९१८) पासून सुरू झाला, ज्यांनी अफगाणिस्तानमध्ये सेवा करण्याबरोबरच चीनमधील बॉक्सर बंड आणि पहिल्या महायुद्धातही भाग घेतला.

यानंतर त्यांचा मुलगा कॅप्टन दर्यावसिंग अहलावत (१९१८-१९४८) यांनी हा वारसा पुढे नेला. ते दुसऱ्या महायुद्धातील दिग्गज होते. तिसऱ्या पिढीत लेफ्टनंट कर्नल समशेर सिंग अहलावत (१९५५-१९८२) यांनी स्वतंत्र भारताच्या लष्करी मोहिमांमध्ये भूमिका बजावली. १९६५ आणि १९७१ च्या भारत-पाक युद्धात त्यांनी गोवा मुक्ती मोहिमेसह भाग घेतला आणि युद्धादरम्यान ते गंभीर जखमी झाले.

### कारगिलपासून ईशान्येपर्यंत

चौथ्या पिढीतील कर्नल संदीप अहलावत (१९९३-२०२६) यांनी कारगिल संघर्ष आणि ईशान्येकडील बंडखोरी विरोधी ऑपरेशन्समध्ये काम केले. नंतर त्याच रेजिमेंटचे कमांडिंग करण्याचा मान त्यांना मिळाला. एकाच रेजिमेंटमध्ये चार पिढ्या सतत लष्करी सेवेत राहण्याचा हा विक्रम लिम्का बुक ऑफ नॅशनल रेकॉर्डमध्ये नोंदवला गेला.

आता लेफ्टनंट शिवम अहलावत यांच्या कमिशनमुळे हा वारसा पाचव्या पिढीपर्यंत पोहोचत आहे. म्हणजे एका कुटुंबाच्या पाच पिढ्या एकाच रेजिमेंटच्या गणवेशात देशाची सेवा करत आहेत - ब्रिटिश भारताच्या रणांगणापासून ते स्वतंत्र भारताच्या लष्करी मोहिमेपर्यंत.

### रेजिमेंटशी नाते कुटुंबाची ओळख बनले

२३ फेब्रुवारी १८०३ रोजी तयार झालेला पहिला घोडा (स्किनर्स हॉर्स) हा भारतीय सैन्याच्या सर्वांत जुन्या आणि प्रतिष्ठित घोडदळ रेजिमेंटमध्ये गणला जातो. अहलावत कुटुंबासाठी ही रेजिमेंट केवळ लष्करी तुकडी नसून ती जबाबदारी, अभिमान आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या शिस्तीचे प्रतीक बनली आहे.

ही कौटुंबिक कहाणी म्हणजे केवळ लष्करी सेवेतील सातत्य नाही तर कर्तव्य, धैर्य, त्याग आणि रेजिमेंटचा अभिमान यांचा वारसा आहे. दोन महायुद्धांपासून गोवा मुक्तीपर्यंत. १९६५ आणि १९७१ ची युद्धे, कारगिल आणि बंडखोरीविरोधी कारवाया, कुटुंबातील वेगवेगळ्या पिढ्यांनी देशाच्या संरक्षणात आपली भूमिका बजावली.

आता पाच पिढ्यांमधील हे विलक्षण सातत्य गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्येही नोंदवले जाईल, अशी आशा कुटुंबाला आहे. तसे झाल्यास ही कामगिरी अहलावत कुटुंबासाठी तसेच भारतीय लष्करी परंपरेसाठी अभिमानाची बाब ठरेल.

(पांचजन्यवरून साभार)

---

## राष्ट्रचिंतन

कुलदीप सिंग

# प्रदीर्घ युद्धासाठी भारताची क्षेपणास्त्रांची तयारी

ऑपरेशन सिंदूरनंतर भारत प्रदीर्घ युद्ध लक्षात घेऊन क्षेपणास्त्रांचा साठा वाढवत आहे. आकाश-एनजी, प्रलय, पिनाका, एस्ट्रा मार्क-२ आणि प्रकल्प कुशाबद्दल संपूर्ण माहितीसह उत्पादन आणि स्वदेशीकरणातील आव्हाने समजून घ्या.

भारत एका मोठ्या आणि दीर्घ युद्धासाठी सतत तयारी करीत आहे. युद्धाशी संबंधित जवळजवळ प्रत्येक मोठ्या कामासाठी देशाने स्वतःची क्षेपणास्त्र प्रणाली विकसित केली आहे. मग ते हवेतून हवेत, पृष्ठभागावरून हवेत, अँटी-टँक, अँटी-शिप किंवा लांब पल्ल्याचा हल्ला असो. पण खरे आव्हान आहे ते इतक्या मोठ्या संख्येने तयार करणे की, जेव्हा दीर्घ युद्धात साठा संपतो तेव्हा ते त्वरीत भरून काढता येतात. ऑगस्ट २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात सरकारने डीआरडीओच्या पारंपरिक क्षेपणास्त्र प्रणालीचे तंत्रज्ञान भारतीय कंपन्यांना देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भारताकडे कोणती क्षेपणास्त्रे आहेत, त्यांची श्रेणी काय आहे, किती स्वदेशी आहेत आणि कुठे कमतरता आहेत, असा प्रश्न उपस्थित झाला.

गेल्या वर्षी मे मध्ये ऑपरेशन सिंदूरने दीर्घ ऑपरेशनमध्ये अचूक शस्त्रे, हवाई संरक्षण आणि पुरेसा क्षेपणास्त्रांचा साठा किती महत्त्वाचा आहे हे दाखवून दिले. त्याच महिन्यात आंध्रप्रदेशातील नागयलंका येथे १,४६० कोटी रुपयांच्या नवदुर्गा डिफेन्स टेस्टिंग रेंजची पायाभरणी करण्यात आली. प्रकल्प कुशाची पहिली उड्डाण चाचणी जुलै २०२६ मध्ये घेण्यात आली. हे एक स्वदेशी लांब पल्ल्याच्या पृष्ठभागावरून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र आहे, ज्याचा पल्ला ४०० किलोमीटरपर्यंत असू शकतो. ऑगस्ट २०२६ मध्ये संरक्षणमंत्र्यांनी डीआरडीओ तंत्रज्ञान खाजगी कंपन्यांना हस्तांतरित करण्यास



मान्यता दिली. कुशा प्रकल्प २०२८ ते २०३० दरम्यान टप्प्याटप्प्याने राबविण्याची योजना आहे.

भारताकडील पारंपरिक क्षेपणास्त्रे?

हवाई संरक्षणात आकाश, आकाश-एनजी, ओआरएसएम२ यांचा प्रामुख्याने समावेश होतो. हवेतून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे विकसित केली जात आहेत. रडार आणि हवाई संरक्षण यंत्रणा नष्ट करण्यासाठी रुद्रम आहे. अँटी-टँकमध्ये नाग कुटुंब, संत आणि एमपी-एटीजीएम यांचा समावेश होतो. नौदलासाठी एनएसएम-एनआरसारखी जहाजविरोधी क्षेपणास्त्रे आहेत. जमिनीवर हल्ला करण्यासाठी, लाँग रेंज लॅण्ड अटॅक क्रूझ मिसाईल्स आणि डूम्सडे आहेत. पिनाका रॉकेट आर्टिलरी म्हणून काम करतो. ब्रह्मोस हा भारत-रशियाचा संयुक्त कार्यक्रम आहे आणि एमआरएसएम२ भारत-इस्रायलचा आहे. अग्नी आणि के-सिरीज ही सामरिक क्षेपणास्त्रे आहेत, जी आण्विक प्रतिबंधाचा भाग आहेत, म्हणून त्यांचे तंत्रज्ञान उघडलेले नाही.

या क्षेपणास्त्रांच्या प्राणघातक क्षमतेवर नजर टाकल्यास, स्ट्रा मार्क-१ ची रेंज १०० किलोमीटरहून अधिक आहे. मार्क-२ ची रेंज सुमारे २०० किलोमीटर असेल आणि मार्क-३ (गांडीव) खूप पुढे जाईल. प्रलय ५०० किलोमीटरपर्यंत धडकू शकतो. ब्रह्मोसची रेंज सुमारे ४५० किलोमीटर असून ८०० किलोमीटरची बांधणीही सुरू आहे. पिनाका मार्गदर्शित रॉकेट सुमारे १२० किलोमीटरपर्यंत जातात. क्यूआरएसएमची श्रेणी सुमारे ३० किलोमीटर आहे. लांब पल्ल्याच्या हवाई संरक्षणासाठी रशियन एस-४०० आहे आणि प्रकल्प कुशा हा त्याचा स्वदेशी पर्याय बनवला जात आहे.

कमतरता कुठे आहे?

मात्र, सरकारच्या या प्रयत्नांचे फलित म्हणजे अनेक बड्या खाजगी कंपन्याही या क्षेत्रात उतरल्या आहेत. पण, तरीही मुख्य समस्या उत्पादन क्षमतेची आहे. भारत क्षेपणास्त्रांची रचना, विकास आणि चाचणी करू शकतो, परंतु दीर्घकाळापर्यंत मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्यात आणि युद्धादरम्यान साठा पुन्हा भरण्यात समस्या आहे. जर एखादे क्षेपणास्त्र केवळ एक किंवा दोन कारखान्यांवर अवलंबून असेल, तर तेथे व्यत्यय आल्यास पुरवठा साखळी प्रभावित होऊ शकते. आपण अनेक कंपन्या स्थापन केल्यास अधिक चांगले होईल. अनेक वेळा क्षेपणास्त्र भारतात असेंबल केले जाते; परंतु साधक, प्रणोदन, इलेक्ट्रॉनिक्स किंवा विशेष साहित्य बाहेरून येतात.

### स्वदेशीकरण म्हणजे काय?

फक्त भारतात जमणे म्हणजे स्वदेशीकरण नाही. क्षेपणास्त्रात एअरफ्रेम, प्रोपल्शन, साधक, मार्गदर्शन, इलेक्ट्रॉनिक्स, वॉरहेड आणि सॉफ्टवेअर यांचा समावेश आहे. आजही अनेक गोष्टी परदेशातून येतात. सरकारच्या मते, १५,७०० हून अधिक संरक्षण वस्तू स्वदेशी आहेत, ज्यामुळे सुमारे ९,००० कोटी रुपयांची आयात कमी झाली आहे. २०२५-२६ मध्ये देशांतर्गत संरक्षण उत्पादन १.७८ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल. त्यात खाजगी क्षेत्राचा वाटा सुमारे २४ टक्के आहे.

(पांचजन्यवरून साभार)

---

## अन्वयार्थ

# भारताची नवीन औद्योगिक क्रांती

जेफरीजच्या ताज्या अहवालात देशांतर्गत मागणी, खाजगी गुंतवणूक आणि मोदी सरकारच्या धोरणांमुळे चालत असलेल्या अंतराळ, सेमीकंडक्टर्स, डेटा सेंटर्स, इलेक्ट्रॉनिक्स, सौर आणि एरोस्पेसमध्ये भारताच्या वेगवान विस्ताराला भारताची नवीन औद्योगिक क्रांती असे म्हटले आहे.

रॉकेट्स आणि सेमीकंडक्टरपासून डेटा सेंटर्स, इलेक्ट्रॉनिक्स, सोलर आणि एरोस्पेसपर्यंत, भारत केवळ एक विशाल ग्राहक बाजारपेठ बनण्यापलीकडे जगासाठी एक उत्पादन आणि तंत्रज्ञान पॉवरहाऊस बनत आहे. जागतिक गुंतवणूक बँक जेफरीजने देशांतर्गत मागणी, खाजगी गुंतवणूक आणि शाश्वत सरकारी धोरण समर्थन यांच्या शक्तिशाली संयोजनाकडे लक्ष वेधून भारताची नवीन औद्योगिक क्रांती म्हणून हे परिवर्तन ओळखले आहे. जेफरीजच्या ताज्या अहवालानुसार, भारत मोठ्या औद्योगिक वाढीच्या उंबरठ्यावर उभा राहू शकतो. जागतिक गुंतवणूक बँकेने भारताच्या औद्योगिक विस्ताराच्या पुढील टप्प्यातील संभाव्य इंजिन म्हणून सहा धोरणात्मक क्षेत्रे स्पेस, सेमीकंडक्टर्स, डेटा सेंटर्स, इलेक्ट्रॉनिक्स, सोलर मॅन्युफॅक्चरिंग आणि एरोस्पेस ओळखली आहेत. मध्यवर्ती संदेश असा आहे की, भारत आता केवळ औद्योगिक परिवर्तनाची तयारी करत नाही; तो अंमलात आणू लागला आहे.

जेफरीजचा असा युक्तिवाद आहे की, भारताची मोठी देशांतर्गत बाजारपेठ, खाजगी-क्षेत्राचा वाढता सहभाग, अनुकूल खर्चाचे अर्थशास्त्र, सरकारी प्रोत्साहने आणि पर्यायी पुरवठा साखळींचा जागतिक शोध यामुळे एक अभूतपूर्व संधी निर्माण होत आहे.

स्पेस, सेमी आणि इलेक्ट्रॉनिक्स, डेटासेंटर्स आणि सोलरमधील भारतातील उदयोन्मुख उद्योगांमध्ये खाजगी सहभागासाठी मोठ्या देशांतर्गत संधी चालविल्या जात आहेत, अहवालात असे म्हटले आहे की, अवकाश क्षेत्र खाजगी कंपन्यांसाठी खुले करण्यापासून ते अर्धसंवाहक, इलेक्ट्रॉनिक्स आणि सौर उत्पादनासाठी मोठ्या प्रोत्साहन कार्यक्रमांपर्यंतच्या सरकारी उपाययोजनांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**भारत विकासाच्या मार्गावर :** ग्लोबल इन्व्हेस्टमेंट बँक जेफरीजने ९ सप्टेंबर रोजी प्रकाशित केलेल्या एका अहवालात भारताची नवीन औद्योगिक क्रांती याला हायलाईट केले आहे, ज्याला मोठ्या देशांतर्गत बाजारपेठ, खाजगी-क्षेत्रातील वाढत्या सहभागामुळे चालना मिळते. हा ट्रेंड कायम राहिल्यास भारत देशांतर्गत औद्योगिक क्षमता, अधिक मूल्यवर्धन, मजबूत पुरवठा-साखळी लवचिकता आणि जागतिक उत्पादनात मोठ्या भूमिकेसह २०३० मध्ये प्रवेश करू शकेल.

वर्षानुवर्षे उच्च-तंत्रज्ञान उत्पादनातील भारताच्या महत्त्वाकांक्षांवर संभाव्यतेच्या दृष्टीने चर्चा केली जात होती. जेफरीज आता पॉलिसीच्या हेतूपासून प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे, विशेषतः स्पेस आणि सेमीकंडक्टर सारख्या क्षेत्रांमध्ये संक्रमण पाहत आहेत. मोदी सरकारच्या धोरणात्मक रचनेने या बदलात मध्यवर्ती भूमिका बजावली आहे. भारताला जागतिक गुंतवणूकदारांसाठी अधिक आकर्षक बनवताना आयात तंत्रज्ञान आणि घटकांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी प्रोत्साहन, स्थानिकीकरण आवश्यकता, उत्पादनाशी संबंधित योजना, कर समर्थन आणि नियामक सुधारणांचा वापर केला जात आहे.

**व्यापक उद्दिष्ट :** कदाचित अंतराळ क्षेत्रापेक्षा हे परिवर्तन कुठेच दिसत नाही. सरकारने २०२० मध्ये हे क्षेत्र खाजगी सहभागासाठी खुले केले, भारतीय अंतराळ स्टार्टअप्ससाठी ऑपरेटिंग वातावरणात मूलभूत बदल केला. खाजगी कंपन्यांना त्यांचे स्वतःचे व्यावसायिक तंत्रज्ञान विकसित करताना राष्ट्रीय क्षमतांचा वापर करण्याची परवानगी देण्याच्या उद्देशाने या हालचालीचा उद्देश होता. ईन-स्पेसच्या निर्मितीने खाजगी सहभागासाठी एक नियामक आणि सुविधा यंत्रणा प्रदान केली, तर एनएसआयएलने भारतीय अंतराळ तंत्रज्ञान उद्योगात नेण्यात व्यावसायिक भूमिका स्वीकारली. २०२३ च्या भारतीय अंतराळ धोरणाने नंतर अंतराळ मूल्य साखळीमध्ये खाजगी कंपन्यांची भूमिका विस्तृत केली.

जेफरीजचा विश्वास आहे की, हे उद्घाटन आता मूर्त परिणाम देत आहे, जे स्कायरूट, पिक्सल आणि दिगंतरा यासारख्या कंपन्यांकडे लक्ष वेधून स्टार्टअप्सच्या सुरुवातीच्या नवकल्पना पासून व्यावसायिक अंमलबजावणीच्या दिशेने वाटचाल करत आहेत.

स्कायरूटकडे प्रगत कक्षीय प्रक्षेपण क्षमता आहे, पिक्सल उच्च-रिझोल्यूशन पृथ्वी निरीक्षण उपग्रह विकसित करीत आहे, अग्निकुलने ३डी-प्रिंट केलेले रॉकेट-इंजिन तंत्रज्ञान विकसित केले आहे, तर दिगंतरा अवकाश-निरीक्षण क्षमतांवर काम करत आहे. जेफरीजची अपेक्षा आहे की, भारताची अंतराळ अर्थव्यवस्था २०२३ ते २०३० दरम्यान पाचपटीने वाढेल आणि सुमारे ४५ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचेल. या परिवर्तनामुळे भारताला प्रक्षेपण वाहने, उपग्रह, पृथ्वी-निरीक्षण



प्रणाली आणि अवकाश-निरीक्षण तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी सरकारी-खाजगी औद्योगिक इकोसिस्टम विकसित करता येईल.

**सेमीकंडक्टर :** जर अंतराळ भारताची अंतिम सीमारेषेवर झेप घेते, तर सेमीकंडक्टर तंत्रज्ञानाच्या सार्वभौमत्वासाठी त्याचा प्रयत्न दर्शवतात. जेफरीजचा अंदाज आहे की सुमारे २० अब्ज डॉलर्स सेमीकंडक्टर गुंतवणूक आधीपासूनच सुरू आहे, ज्यात चिप फॅब्रिकेशन सुविधा आणि एकाधिक ओएसटी आऊटसोर्स सेमीकंडक्टर असेंब्ली आणि चाचणी प्रकल्प समाविष्ट आहेत. अहवालात परिसंस्थेचा विस्तार करण्यासाठी आणि अर्धसंवाहक डिझाइनसह देशांतर्गत मूल्यवर्धन वाढवण्यासाठी आणखी १३ अब्ज डॉलर्स प्रोत्साहन योजना अपेक्षित आहे. जागतिक उत्पादकांना आकर्षित करण्यासाठी फॅब्स आणि पॅकेजिंग सुविधा स्थापन करण्यासाठी आणि देशांतर्गत पुरवठा साखळी विकसित करण्यासाठी सरकारने २०२१ मध्ये भारत सेमीकंडक्टर मिशन सुरू केले, ज्याला ७६,००० कोटी रुपयांच्या प्रोत्साहन पॅकेजचा पाठिंबा आहे.

देशांतर्गत सेमीकंडक्टर स्टार्टअप्सना आर्थिक सहाय्य आणि प्रगत डिझाइन टूल्स आणि बौद्धिक संपत्तीत प्रवेश देण्यासाठी २०२२ मध्ये सुरू करण्यात आलेल्या डिझाईन लिंक्ड इन्सेंटिव्ह स्कीमद्वारे भारताने चिप डिझाईन मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. महत्त्वाकांक्षा आता आणखी वरच्या दिशेने सरकली आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये जाहीर केलेल्या इंडिया सेमीकंडक्टर मिशन २.० अंतर्गत सेमीकंडक्टर उपकरणे आणि साहित्य, पूर्ण-स्टॅक भारतीय सेमीकंडक्टर बौद्धिक संपदा आणि मजबूत देशांतर्गत आणि जागतिक पुरवठा साखळी यावर लक्ष केंद्रित केले आहे.

जेफरीज कबूल करतात की, आव्हाने कायम आहेत, विशेषतः पुरवठा-साखळी खोली, प्रतिभा आणि जागतिक स्पर्धा. तरीही त्याचे मूल्यांकन महत्त्वपूर्ण आहेः भारत एका विश्वासार्ह सेमीकंडक्टर इकोसिस्टमचा पाया रचत आहे. भारताचे औद्योगिक परिवर्तन केवळ भौतिक उत्पादनापुरते मर्यादित नाही. त्यासाठी मोठ्या प्रमाणात डिजिटल पायाभूत सुविधांचीही गरज आहे. क्लाऊड अवलंबन, डिजिटायझेशन आणि डेटा-लोकॅलायझेशनच्या आवश्यकतांमुळे गेल्या पाच वर्षांत भारताची कोलोकेशन क्षमता आधीच पाचपटीने वाढलेली आहे, जेफरीज डेटा सेंटर्सना धोरणात्मक पायाभूत सुविधा विभाग म्हणून ओळखतात. परिणामी संधी लक्षणीय आहे, जेफरीजने डेटा-सेंटर ऑपरेटरसाठी सुमारे ९ अब्ज डॉलर्स कमाईच्या संधींचा अंदाज लावला आहे आणि पॉवर, कूलिंग, बांधकाम आणि नेटवर्क पायाभूत सुविधांमध्ये सुमारे ४५ अब्ज डॉलर्स गुंतवणुकीच्या संधी आहेत. सरकारी धोरण, कर प्रोत्साहन, वाढता डिजिटल वापर आणि जागतिक हायपरस्केलर्सची वाढती मागणी यामुळे हा विस्तार वाढेल अशी अपेक्षा आहे.

डेटा सेंटर्सच्या वाढीमुळे ऊर्जा, बांधकाम, कूलिंग सिस्टम, नेटवर्किंग आणि तंत्रज्ञान पायाभूत सुविधांसह मोठ्या प्रमाणात औद्योगिक परिसंस्थेमध्ये संधी निर्माण होतील. भारताचा डिजिटल विस्तार ही एक औद्योगिक संधी बनत आहे.

### इलेक्ट्रॉनिक्सः असेंब्लीपासून मूल्यवर्धनापर्यंत

विशेषतः मोबाईल-फोन उत्पादनात भारत हा इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचा प्रमुख आधार म्हणून आधीच उदयास आला आहे. तथापि, पुढील आव्हान असेंब्लीच्या पलीकडे जाणे आणि देशांतर्गत मूल्यवर्धन वाढवणे हे आहे. जेफरीज या संक्रमणातील महत्त्वाची साधने म्हणून इलेक्ट्रॉनिक्स घटक उत्पादन योजना आणि मोबाईल फोन उत्पादन योजना ओळखतात. तयार इलेक्ट्रॉनिक उत्पादनांमध्ये जाणारे घटक विकसित करणे, आयात अवलंबित्व कमी करणे आणि देशांतर्गत पुरवठा साखळी अधिक सखोल करणे हे उद्दिष्ट आहे. जेफरीजची अपेक्षा आहे की, ईसीएमएस पुढील सहा वर्षांत मोबाईल-फोन घटक मूल्यातील देशांतर्गत उत्पादनाचा हिस्सा २० टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्यास मदत करेल.

एचडीआय आणि मल्टीलेयर पीसीबीसह मुद्रित सर्किट बोर्ड, एक प्रमुख संधी दर्शवतात. जेफरीजचा अंदाज आहे की, संभाव्य ५ अब्ज डॉलर्स एकूण ॲड्रेसेबल मार्केट आहे, तर भारत सध्या यातील बहुतांश घटक आयात करतो. त्यामुळे शिफ्ट तयार उत्पादनांवर मेड इन इंडिया लेबल लावण्यापलीकडे आहे. त्या उत्पादनांमधील तंत्रज्ञान आणि घटकांचा वाढता वाटा देखील देशांतर्गत उत्पादित केला जाईल, हे सुनिश्चित करणे हा मोठा उद्देश आहे.

**उत्पादन साखळी तयार करणे :** भारताच्या सौर क्षेत्रात गेल्या दशकात मोठे परिवर्तन झाले आहे. जेफरीज आता भारताला जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सोलर पीव्ही उत्पादक म्हणून ओळखतात, ज्यात सुमारे ३५ जीडब्ल्यू सोलर सेल क्षमता कार्यरत आहे आणि आणखी १०० जीडब्ल्यू बांधकामाधीन आहे. स्थानिकीकरणाची मोठी महत्त्वाकांक्षा आहे. २०३० पर्यंत सुमारे ९० टक्के सौर उत्पादन मूल्य साखळी स्थानिकीकृत होण्याची जेफरीजची अपेक्षा आहे.

मॉडेल्स आणि मॅन्युफॅक्चरर्सची मंजूर यादी, देशांतर्गत-सामग्री आवश्यकता आणि उत्पादन-लिंक्ड प्रोत्साहन योजना यासारखे सरकारी उपाय सेल, वेफर्स आणि इनगॉट्समध्ये मोठ्या प्रमाणावर देशांतर्गत उत्पादनास प्रोत्साहन देत आहेत. भारताची सौर-उत्पादन क्षमता उत्पादनाबरोबरच विस्तारली आहे. अनेक वर्षांच्या जलद वाढीनंतर मार्च २०२६ अखेर देशाने १५० जीडब्ल्यू सौर क्षमता ओलांडली. पुढचा टप्पा म्हणजे देशांतर्गत उत्पादनाशी या प्रचंड विस्ताराला जोडून एक परिसंस्था निर्माण करणे ज्यात भारत केवळ सौरऊर्जेची निर्मितीच करीत नाही, तर ती निर्माण करण्यासाठी आवश्यक उपकरणांचाही वाढता वाटा आहे.

**एरोस्पेस :** जेफरीजने ओळखलेला सहावा स्तंभ एरोस्पेस आहे, जिथे मागणी आणि उपलब्ध उत्पादन क्षमता यांच्यातील जागतिक असंतुलनाचा फायदा घेण्यासाठी भारत वाढत्या स्थितीत आहे. भारतातील स्पर्धात्मक उत्पादन खर्च आणि अभियांत्रिकी प्रतिभा विस्तारासाठी एक मजबूत पाया प्रदान करते. जेफरीजच्या मते, बोईंग आणि एअरबस आधीच भारतातून दरवर्षी सुमारे १.४-१.६ बिलियन डॉलर्स सोर्स करीत आहेत, तर काही महत्त्वाच्या भारतीय कंपन्या जागतिक मूळ उपकरणे उत्पादक आणि टीयर-१ कंपन्यांना पुरवठादार म्हणून विस्तारत आहेत. जागतिक एरोस्पेस कंपन्या त्यांच्या पुरवठा साखळ्यांमध्ये विविधता आणण्याचा प्रयत्न करत असताना, भारताला केवळ कमी किमतीचे उत्पादन गंतव्य म्हणून नव्हे तर एक अत्याधुनिक अभियांत्रिकी आणि उत्पादन केंद्र म्हणून स्थापित करण्याची संधी आहे.

एरोस्पेस मॅन्युफॅक्चरिंगमध्ये कठोर गुणवत्ता आवश्यकता आणि प्रगत अभियांत्रिकी क्षमता देखील येतात, याचा अर्थ जागतिक एरोस्पेस पुरवठा साखळींमध्ये अधिक सहभाग भारताच्या व्यापक उच्च-मूल्य उत्पादन परिसंस्था मजबूत करू शकतो.

(ऑर्गनायझरवरून साभार)

# कोरडा दुष्काळ जाहीर करण्यासाठी शेतकऱ्यांचा तहसीलवर धडक मोर्चा



**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. १२ सप्टेंबर -**

निसर्गाच्या लहरीपणामुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतीचा प्रश्न ऐरणीवर घेत आज हदगाव शहरात शेतकरी व शेतमजुरांचा एल्गार पाहायला मिळाला. शुक्रवारी ११ सप्टेंबर रोजी माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी, शेतकऱ्यांनी हाती तिरंगी झेंडे घेत शहरातील मुख्य रस्त्यांवरून जोरदार निदर्शने केली.

मागील काही दिवसांपासून पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगामातील पिके करपून गेली असून, बळीराजा पुरता हतबल झाला आहे. या पार्श्वभूमीवर हा मोर्चा काढण्यात आला. घोषणाबाजी करत शहर पिंजून काढल्यानंतर आंदोलक तहसील कार्यालयाच्या पायरीवर धडकले. तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना उद्देशून एक निवेदन सुपूर्द करण्यात आले. यामध्ये तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, एकरी ५० हजार रुपयांची तात्काळ मदत मिळावी, शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी व्हावी, नवीन पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशा प्रमुख मागण्यांचा समावेश आहे. याशिवाय शेतीपंपांना बारा तास वीज, मनरेगातून मजुरांच्या हाताला काम, पीकविम्याची तात्काळ आगाऊ रक्कम, मजुरांना ५० किलो धान्य, जनावरांसाठी चारा छावण्या, वादग्रस्त शक्तिपीठ महामार्ग रद्द करणे आणि ई-पीक पाहणीचे जाचक निकष शिथिल करणे यांचाही आग्रह धरण्यात आला.

यावेळी बोलताना माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी, शासन शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप केला. शेतकरी उद्ध्वस्त झाला असताना सरकार डोळ्यावर पट्टी बांधून बसले आहे. आमच्या मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. मोर्चात तालुकाध्यक्ष किशोर पाटील कदम नगरसेवक अमित अडसूळ, नगरसेवक अजय सूर्यवंशी, नगरसेवक शेख कलीम शेख चाँद , नगरसेवक प्रतिनिधी फिरोज पठाण, नगरसेवक संदीप शिंदे, आनंदराव मस्के, संदीप काळबांडे, श्याम पाटील, यशवंत प्रधान यांच्यासह परिसरातील शेकडो शेतकरी, शेतमजूर व काँग्रेस पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# काँग्रेस कमिटीच्यावतीने उत्कृष्ट बैलजोडी व शेतकरी मालकांचा गौरव



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. १२ सप्टेंबर -**

शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १५ वा उत्कृष्ट बैलजोडी व शेतकरी मालक गौरव सोहळा उत्साहात पार पडला.

स्पर्धेत विलास चंद्रे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना गिरीष कोत्तावार यांच्या वतीने रु. ५,१०१ चे पारितोषिक देण्यात आले. संतोषकुमार कालानी यांना द्वितीय (रु. ३,५०१), लक्ष्मण वडजे यांना तृतीय (रु. २,५०१), बाळू चंद्रे यांना चतुर्थ (रु. २,१०१) आणि गजानन चौधरी यांना पाचवे (रु. १,५०१) पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. प्रोत्साहनपर पारितोषिक दर्शन जंगीलवाड व संजय आऊलवार यांना प्रत्येकी रु. १,१०१ देण्यात आले.

कार्यक्रमास तहसीलदार आनंद देवुळगावकर, पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेतील बैलजोडींचे निरीक्षण व परीक्षण करण्यासाठी पंच समिती सदस्य म्हणून सदाशिव मोरे, चंदर शेटे, गंगाधरराव राचेवाड, रामजी कमळे व बाबू मलगे यांनी काम पाहिले.

शेतकरी, शेती आणि ग्रामीण संस्कृतीचा सन्मान करण्याची ही परंपरा यापुढेही सुरू ठेवण्यात येईल, असा विश्वास शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

यावेळी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगरपरिषद उपाध्यक्ष करीम खान साब, गोविंद सेठ कालानी, सूर्यकांत चौदंते सर, जिल्हा सचिव गंगाधर डांगे, जिल्हा सहसचिव गिरीष कोत्तावार, इलियास अब्बासी, माजी नगरसेवक महावीर कंधारकर, सुधाकर आडकीने, आनंदराव पा. ढगे, मारोती संबोड, सेवादल तालुकाध्यक्ष गंगाधर पा. मगरे, गटनेते प्रतिनिधी मुजीब पठाण, गजानन संबोड, रमेश बोडके, विठ्ठल आचार्य, पत्रकार अतिक अहमद, बालाजी पा. सूर्यवंशी, सुभाष चौदंते, युवक काँग्रेस उपाध्यक्ष वेदांत शेवटे, गंगाधर पंगीरवार, नाना टाक, धनंजय आदमाने यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुदखेड येथे यावर्षी बैलपोळा सणानिमित्त भाजपच्या वतीने शेतकरी व बैलजोडींचा सन्मान करण्यात न आल्याने शहरात चर्चेला उधाण आले आहे. भाजपमधील अंतर्गत मतभेदांमुळे हा कार्यक्रम झाला नसल्याची चर्चा असून, निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांचा सन्मान केला जातो, मात्र इतर वेळी त्याकडे दुर्लक्ष होते का, असा प्रश्न काही शेतकरी व नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## दुष्काळाच्या सावटाखाली ग्रामीण भागात बैलपोळा साजरा

**आदमपूर** -बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर,नवी,जुनी थडीसावळी,नवे गळेगांव आदि ग्रामीण परिसरात गुरूवार दि.१० सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ ते ६ वाजे दरम्यान गावोगावी व घरीदारी कषृक परंपरेतील बैलपोळा हा सण कोरड्या दुष्काळाच्या सावटाखाली शेतकरी कुणबी बळीराजा व गावकऱ्यांकडून वाजत गाजत साजरा करण्यात आला.मात्र परिसरात पाऊस नसल्याने शेतकरीवर्गांत चिंतेचे ढग पसरले आहेत.हनुमान मंदिर गाभारी विधीवत पूजा झाल्यानंतर बैलांच्या मिरवणुकीस सुरूवात झाली.मारोतीच्या पाराभोवती रंगीबेरंगी गोंडे, झूल,नवीन कासरे,म्होरकी,रंगवलेली शिंगे,चमचमते बाशिंग,पायात घुंगरू आदि साहित्याने सजवलेल्या बैलांच्या प्रदक्षिणा पूर्ण करताना शेतकरी बैलजोड्यांसह उपस्थित होते.तद्नंतर मानकऱ्यांच्या हस्ते वेसीवरील तोरण तोडून पोळा सण घरीदारी रस्तोरस्ती पांगला.पोळा फुटल्याची ललकारी आसमंती गुंजत राहिली.शेवटी घरासमोर पुन्हा मग बैलांची विधिवत पूजा आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून बैलांप्रति कृतज्ञ भाव शेतकरी व्यक्त करताना दिसून येत होते. प्रत्येक गावातील पोळा सणाचे परंपरागत मानकरी,गावकरी,लहान मुलांची भरगच्च पाराभोवती प्रदक्षिणा पाहण्यासाठी गर्दी उसळलेली होती.गाव परिसरातील बस स्थानकावरील गर्दी आजदिनी काहिसी सुन्न होती. दरवर्षी गावोगावी बैलांची संख्या रोडावलेली पाहताना अगदी जीव आतून गदगदून येत होता.प्रत्येक गावी अगदी नगण्यंच बैलजोडी शेतकरी बाळगून होते. पूर्वी बैलांची मिरवणूक पाहताना एकंच खचाखच गर्दी दिसून येत होती.आता कृत्रिम बैलांच्या मूर्ती पूजन करून पोळा सण काही कुणबी घरादारांत साजरा होतो.कुटुंब,मित्र परिवार व सालगडी आदिंच्या सह सुग्रास पुरण पोळीच्या पंगतीचा आस्वाद शेतकरी वर्गांसह घेतला गेला.स्थानिक ग्रामपंचायत,संबंधित पोलीस विभाग,सरपंच,पोलीस पाटील इत्यादींनी चोख व्यवस्था तडीस नेली.



## प्रारूप मतदार यादी अंतिम नसून, पात्र मतदारांनी नोंदणीची संधी घ्यावी

**नांदेड**-राज्यात सध्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत प्रकाशित करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी ही अंतिम मतदार यादी नसल्याने, तिची २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील मतदारसंख्येशी अथवा मतदानाच्या आकडेवारीशी तुलना करणे अयोग्य व दिशाभूल करणारे ठरेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६ च्या पहिल्या टप्प्यात मतदार अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर सर्वसाधारणपणे वास्तव्यास असल्याची वस्तुस्थिती पडताळण्यावर विशेष भर देण्यात आला. त्यामुळे संबंधित पत्त्यावर प्रत्यक्ष वास्तव्यास नसलेल्या व्यक्तींची नावे प्रारूप यादीत समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. तसेच मृत मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. दरम्यान, सध्या सुरू असलेल्या पुढील टप्प्यात अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर उपलब्ध नसलेले किंवा दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित झालेले, मात्र राज्याच्या हद्दीतच वास्तव्यास असलेले मतदार त्यांच्या सध्याच्या निवासस्थानी मतदार म्हणून नोंदणीसाठी अर्ज करू शकतात. याशिवाय १ ऑक्टोबर २०२४ नंतर वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या पात्र नवमतदारांच्या नोंदणीची प्रक्रिया सुरू आहे. विशेष सखोल पुनरीक्षणाच्या पहिल्या टप्प्यात दीर्घकाळ घराबाहेर राहणे अथवा अन्य कारणांमुळे ज्यांची नावे प्रारूप यादीत समाविष्ट होऊ शकली नाहीत, अशा पात्र नागरिकांनाही आता मतदार म्हणून नोंदणीसाठी अर्ज करण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे सध्याचा टप्पा हा प्रामुख्याने पात्र मतदारांची नावे समाविष्ट करण्यावर केंद्रित आहे. एकही पात्र नागरिक मतदार यादीतून वंचित राहू नये, याची सुनिश्चिती या प्रक्रियेद्वारे केली जात आहे. विशेष सखोल पुनरीक्षणाची संपूर्ण प्रक्रिया नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला पूर्ण होणार आहे. त्यानंतर अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यामुळे सध्या प्रकाशित झालेल्या प्रारूप यादीतील मतदारसंख्या आणि पूर्वीच्या संक्षिप्त पुनरीक्षणावर आधारित अंतिम मतदार यादीतील आकडेवारी यांची तुलना करणे योग्य ठरणार नाही.

**अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतरच तुलना करावी**

विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी मतदारसंख्येबाबत कोणतेही निष्कर्ष काढणे अथवा तुलना करणे टाळावे. अंतिम मतदार यादी अधिकृतपणे प्रसिद्ध झाल्यानंतरच तिच्या आधारे कोणतेही विश्लेषण किंवा मूल्यमापन करणे योग्य ठरेल. त्यामुळे सर्व संबंधित घटक, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि नागरिकांनी अंतिम यादी प्रसिद्ध होईपर्यंत प्रतीक्षा करून त्यानंतरच मतदारसंख्येबाबत निष्कर्ष काढावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गणेशोत्सव शांततेत अन् डीजेमुक्त साजरा करा : किरण पोपळघट

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद, दि. १२ सप्टेंबर -**

गणेशोत्सव हा भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याचा सण असून, तो शांततेत, डीजेमुक्त आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा. गणेशोत्सव काळात शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून, गणेश मंडळांनीही प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट यांनी केले.




गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी मुक्रमाबाद पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्था, मिरवणूक मार्ग, ध्वनिप्रदूषण तसेच शासनाच्या विविध नियमांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

गणेश मंडळांनी मंडप उभारताना आवश्यक परवानग्या घेऊन नियमांचे पालन करावे. मिरवणुकीदरम्यान नागरिकांना त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी. ध्वनिक्षेपक व इतर बाबतीत प्रशासनाने घालून दिलेल्या मर्यादांचे पालन करावे. उत्सवाच्या काळात कोणत्याही प्रकारे कायदा हातात घेऊ नये, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

गणेशोत्सव हा सर्व समाजाला एकत्र आणणारा उत्सव असल्याने अफवा, गैरसमज आणि सोशल मीडियावरील अप्रमाणित संदेशांवर विश्वास न ठेवता शांतता व सलोखा कायम ठेवावा, असे आवाहन पोपळघट यांनी केले. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

बैठकीस सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक शंकरराव मोरे यांच्यासह मुक्रमाबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, गणेश मंडळांचे अध्यक्ष, प्रतिष्ठित नागरिक तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अफवांपासून सावध राहा; अनुचित प्रकार दिसताच पोलिसांना कळवा**

सण-उत्सवाच्या काळात कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. सोशल मीडियावरून प्रसारित होणाऱ्या अप्रमाणित संदेशांची खातरजमा केल्याशिवाय ते पुढे पाठवू नयेत. परिसरात कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास नागरिकांनी कायदा हातात न घेता तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन मुक्रमाबाद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू चव्हाण यांनी केले.

# गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, दि. १२ सप्टेंबर -**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी हिमायतनगर पोलीस ठाण्यात गुरुवारी (दि. ११) शांतता समितीची बैठक घेण्यात आली. जगदीश भंडारकर उपविभागीय पोलीस अधिकारी, भोकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत गणेश मंडळांचे पदाधिकारी, युवक, लोकप्रतिनिधी व नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

शासनाने डीजेवर बंदी घातलेली असून गणेशोत्सव काळात कोणीही डीजे वाजवू नये. डीजेमुळे ध्वनिप्रदूषण करून वातावरण दूषित केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई अटळ आहे, असा स्पष्ट इशारा उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी दिला. सर्वांनी कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून गौरी-गणेशोत्सव उत्साहात आणि शांततेत साजरा करावा. हिमायतनगर शहराची शांतता कायम ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले.बैठकीत गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील अतिक्रमणे हटविणे, मुख्य रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, वीजपुरवठ्यातील लपंडाव थांबविणे, स्ट्रीट लाईट सुरळीत करणे तसेच मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी होणार नाही यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, अशा विविध मागण्या उपस्थितांनी मांडल्या. यावेळी नायब तहसीलदार सिद्दीकी, पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, महावितरणचे अभियंता लाड, परमेश्वर ट्रस्टचे उपाध्यक्ष महावीरचंद श्रीश्रीमाळ, मुख्याधिकारी समाधान मसाळ, नगराध्यक्ष रफिक भाई, माजी नगरसेवक प्रभाकर मुधोळकर, माजी नगराध्यक्ष कुणाल राठोड, माजी जि.प. सदस्य समद खान पठाण, नगरसेवक आशिष सकवान, विठ्ठल ठाकरे, सरदार खान, सुभाष बल्पेलवाड, संजय माने, राम नरवाडे, अन्वर खान पठाण, विलास वानखेडे आदी उपस्थित होते.



# सिडकोतील घरांच्या हस्तांतरण चा प्रलंबित प्रश्न मार्गी ; सिडकोत भाजपा नगरसेवकांचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. १२ सप्टेंबर -**

नांदेड सिडको गृहनिर्माण योजनेतील मूळ मालकांच्या अनुपस्थितीत घरांच्या हस्तांतरण चा हा अनेक वर्षापासून नागरिकांसाठी मोठी समस्या झाली होती पण राजाचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाने सिडकोतील नागरिकांच्या हस्तांतरांचा प्रश्न मार्गी लागल्याने सिडकोतील भारतीय जनता पार्टीचे नगरसेवकांनी ढोल ताशाच्या गजर व फटाक्याची आतिशबजी करूनअशोकराव चव्हाण यांचे आभार मानले.



नांदेड सिडको येथील गृहनिर्माण संस्थेचे घरे बॉण्ड पेपर वर खरेदी विक्री करण्यात आली होती. त्यामुळे सदरील घरांची रजिस्ट्री होत नसल्यामुळे सदरील घरे मूळ मालकांच्या अनुपस्थितीत हस्तांतरण करून देण्याची मागणी सन २०१४ पासून राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी शासनाकडे वेळोवेळी लावून धरून सिडकोतील नागरिकांच्या घरांचा हस्तांतराचा लढा शेवटी मार्गी लागल्याने सिडकोतील भाजपचे नगरसेवक संजय पाटील घोगरे वैजनाथ देशमुख नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख राजू लांडगे सतीश बसवदे यांनी फटाक्यांचे आतिषबाजी करून राजाचे माजी मुख्यमंत्री अशोकरावजी चव्हाण यांचे सिडको वासियाच्या वतीने आभार मानले.

# विजेचा 'खेळखंडोबा' ; देगलूर तालुक्यात दोन ठिकाणी संतापाचा उद्रेक

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. १२ सप्टेंबर -**

देगलूर तालुक्यातील ग्रामीण भागातील विस्कळीत वीजपुरवठ्याचा प्रश्न आता आंदोलनाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. लोडशेडिंग, नादुरुस्त डीपी वेळेत न मिळणे आणि वारंवार वीज खंडित होण्याच्या प्रश्नावर कैलास येसगे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी व नागरिकांनी महावितरण कार्यालयावर हल्लाबोल केला; तर दुसरीकडे गेल्या सहा महिन्यांपासून वीज समस्येला सामोरे जाणाऱ्या करडखेडवाडी ग्रामस्थांनी मंजूर स्वतंत्र गावठाण फिडर प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याची मागणी करत आंदोलनाचा इशारा दिला. दोन वेगवेगळ्या ठिकाणी उमटलेल्या या संतप्त प्रतिक्रियांमधून ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याच्या प्रश्नाचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे.





**हल्लाबोल आंदोलनातून शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा**

ग्रामीण भागातील लोडशेडिंगचे वाढते प्रमाण, नादुरुस्त डीपी वेळेत उपलब्ध न होणे तसेच दुरुस्तीच्या नावाखाली तासनतास वीजपुरवठा खंडित केला जात असल्याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी नेते कैलास येसगे कावळगावकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकरी व नागरिकांनी देगलूर येथील महावितरण कार्यालयावर हल्लाबोल आंदोलन केले.

वीजपुरवठ्याच्या अनियमिततेचा थेट परिणाम शेतीच्या कामांवर होत असून सर्वसामान्य नागरिकांनाही मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे आंदोलकांनी सांगितले. संबंधित प्रश्न तातडीने सोडवून ग्रामीण भागातील वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली.

आंदोलनादरम्यान शेतकरी आक्रमक झाले. मागण्या तातडीने मार्गी न लावल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. संतप्त आंदोलकांनी कार्यालय व अधिकाऱ्यांच्या खुर्च्या जाळण्याचा इशाराही दिला. यावेळी करडखेड, होट्टल, मरखेल, वन्नाळी, सुगाव, शहापूर व हाणेगाव परिसरातील शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'मंजुरी कागदावर नको, फिडर प्रत्यक्ष सुरू करा'**

दरम्यान, करडखेडवाडी येथे स्वतंत्र गावठाण फिडरचा प्रश्नही महावितरणसमोर पुन्हा ऐरणीवर आला आहे. गावासाठी स्वतंत्र गावठाण फिडर मंजूर झाल्याचे सांगण्यात येत असतानाही प्रत्यक्षात वीजपुरवठ्याची समस्या कायम असल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला.

गेल्या सहा महिन्यांपासून गावात वारंवार वीज खंडित होत असून कमी दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे घरगुती उपकरणे आणि पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेवरही परिणाम होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसल्याचा आरोप करत 'कागदावरील मंजुरी नको, स्वतंत्र गावठाण फिडर प्रत्यक्ष कार्यान्वित करा', अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

वीजपुरवठ्याचा प्रश्न तातडीने मार्गी न लावल्यास महावितरण कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला. यावेळी जेजेराव पाटील शिंदे, विजय शिंदे, रघुनाथ शिंदे, धनराज मुदिराज, रणजीत शिंदे, बालाजी शिंदे, विठ्ठल शिंदे, योगेश शिंदे, पिंटूराम कोकेवार, व्यंकट शिंदे, नरसिंग शिंदे, अशोक शिंदे, शिवाजी शिंदे, शिवाजी कोकेवार, माधव शिंदे, गोविंद सुगावे, दत्ता कोकेवार, तेजराव तोटावाड, श्रीराम शिंदे, प्रकाश मुदिराज, विठ्ठलराव शिंदे, मुरलीधर मुदिराज, श्यामेश्वर कोकेवार, महादेव कोकेवार, संतोष शिंदे, नागनाथ गजलवार, नरहरी शिंदे, सुरेश शिंदे, दिलीप इंगोले, हनुमंत मुदिराज, राहुल शिंदे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.